६५ व्या वर्षात दमदार पदार्पण !

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक

# दैनिक गोदातीर समाचार

गुरुवार, दि.१ जानेवारी २०२६

## वर्धापनदिन - २०२६




**केशव घोणसे पाटील**
संपादक/ प्रकाशक

# विश्वासार्हता, निर्भिडता! प्रवासाचे खरे बळ !

**आजचा** काळ हा प्रचंड वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा, सोशल मीडियाच्या प्रभावाचा आणि माहितीच्या महापुराचा आहे. एका क्लिकवर बातमी उपलब्ध होते, पण ती खरी आहे की खोटी, याचा विचार करण्याइतका वेळ अनेकांकडे नसतो. अशा परिस्थितीत परंपरागत वर्तमानपत्रांचे महत्त्व अधिकच वाढले आहे. कारण वर्तमानपत्र म्हणजे केवळ बातम्यांचा संग्रह नसून, समाजाला दिशा देणारे, विचारप्रवृत्त करणारे आणि लोकशाहीची मूल्ये जपणारे प्रभावी माध्यम आहे. आजही ग्रामीण-शहरी वाचकांचा विश्वास ज्या माध्यमावर टिकून आहे, ते म्हणजे मुद्रित वर्तमानपत्र. मराठवाड्यासारख्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या आव्हानात्मक भागात मागच्या 64 वर्षांपासून सेवारत असलेले जनतेचे हक्काचे दैनिक गोदातीर समाचार हे केवळ वृत्तपत्र न राहता लोकांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेले आहे. विशेष म्हणजे 'गोदातीर'ची पत्रकारिता केवळ शहरकेंद्रित न राहता ग्रामीण भागालाही केंद्रस्थानी ठेवणारी राहिलेली आहे. गावातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, युवक, विद्यार्थी यांच्या प्रश्नांना येथे प्राधान्य दिले जाते. ग्रामीण वास्तव, अडचणी, संघर्ष आणि यशोगाथा प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो. दैनिक गोदातीर समाचार केवळ बातम्या देण्यापुरते मर्यादित नाही. त्यामध्ये प्रबोधनात्मक, सामाजिक जाणीव निर्माण करणारे विचार, मूल्याधिष्ठित लिखाण आणि समाज परिवर्तनासाठी आवश्यक घटकांचा समावेश असतो.

माध्यमाची भूमिका ही केवळ घडलेली घटना सांगण्यापुरती नसून समाजाला योग्य दिशा देण्याचीही आहे, ही भूमिका आम्ही समर्थपणे पार पाडण्याचा प्रयत्न करीत आलो आहोत . मुद्देसूद, सूचक आणि प्रभावी मांडणी करण्याचा आमचा प्रयत्न असतो. मराठी भाषेचे संवर्धन होऊन सुस्पष्ट, शुद्ध आणि सरस मराठी भाषेचा वापर करून वाचकांमध्ये भाषेविषयी आपुलकी निर्माण केली जात राहिली पाहिजे असे आम्हाला वाटते. नव्या पिढीला मराठी वाचनाची गोडी लागावी, स्थानिक बोलीचा सन्मान राखत भाषेचा दर्जा टिकून राहावा, यावर आमचा भर आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून संस्कृतीची ओळख असते, ही जाणीव 'गोदातीर' च्या माध्यमातून करून दिली जात असते.

आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात माध्यमांवर राजकीय, आर्थिक तसेच व्यावसायिक असे अनेक प्रकारचे दबाव असतात. अशा परिस्थितीतही आम्ही आपली स्वतंत्र ओळख आणि विश्वासार्हता अबाधित ठेवली आहे. लोकहिताला बाधा पोहोचवणाऱ्या बाबींवर आवश्यक तेव्हा ठाम भूमिका घेत विरोध करतानाच, हा विरोध कोणत्याही द्वेषातून किंवा पक्षपातातून न घेता वस्तुनिष्ठतेच्या आधारावर घेण्याचा आमचा कटाक्ष असतो. समाजातील चांगल्या उपक्रमांना, विधायक कामांना, सामाजिक प्रयत्नांना आणि सकारात्मक बदलांना प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न सातत्याने आम्ही करीत असतो. एकूणच चांगल्या गोष्टींना पाठिंबा आणि चुकीच्या बाबींना विरोध हीच आमची संपादकीय नीती राहिली आहे.

गेल्या वर्षभरात राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात अनेक उलथापालथी घडल्या. सत्ताबदल, आंदोलनं, आर्थिक चढउतार, सामाजिक प्रश्न, सांस्कृतिक घडामोडी यांचा समाजावर मोठा परिणाम झाला. मात्र या सर्व बदलांच्या पार्श्वभूमीवरही दैनिक गोदातीर समाचारने आपला तोल ढळू दिला नाही. कोणत्याही प्रवाहात वाहून न जाता समतोल, संयमी आणि जबाबदार पत्रकारिता करण्याचा प्रयत्न आम्ही कायम ठेवला. बातमी देताना तथ्य, संदर्भ आणि समाजहित यांचा विचार अग्रक्रमावर ठेवण्यात आला. आज 'गोदातीर समाचार' हे लोकांच्या मनात विश्वासार्ह माध्यम म्हणून बिंबले आहे. हा विश्वास अचानक मिळालेला नसून सातत्यपूर्ण, प्रामाणिक आणि निर्भीड पत्रकारितेच्या वाटचालीतून तयार झालेला आहे. वाचकांचा पाठिंबा हेच या प्रवासाचे खरे बळ आहे. जाहिराती, दबाव किंवा बाह्य प्रभावांपेक्षा वाचकांचा विश्वास जपणे हेच 'गोदातीर'चे खरे भांडवल राहिले आहे.



बदलत्या काळात वर्तमानपत्रांचे महत्त्व कमी झालेले नसून, उलट ते अधिक जबाबदारीचे झाले आहे. अफवा, अपप्रचार आणि अपूर्ण माहितीच्या गर्दीत सत्याचा दीप उजळून ठेवण्याचे काम आम्ही करत राहू. ग्रामीण, शहरी जनतेचा आवाज बनून, समाजप्रबोधनाची मशाल हातात घेऊन, मराठी भाषेचा सन्मान राखत, मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा मार्ग स्वीकारत ' गोदातीर समाचार' पुढेही अशीच विश्वासार्ह वाटचाल करीत राहील. स्वतःवरचा विश्वास, कर्तव्य कठोरता आणि आपले पाठबळ हेच आमचे भांडवल! याच भांडवलावर आमची वाटचाल सुरु राहील.

**दैनिक गोदातीर समाचार वर्धापन दिन आणि नववर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !**



बिबट्याच्या दहशतीमुळे शाळा काही दिवस बंद कराव्या लागल्या. ही घटना पाहता बिबट्या-मानव संघर्ष अटळ असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, या संघर्षात कायद्यामुळे मानव हतबल आहे. सरकार व वनखात्याकडूनच बिबट्यांवर नियंत्रण आणणे गरजेचे आहे.

### जनक्षोभ भडकण्याआधी करा...

गेल्या काही दिवसांपासून वनविभागाने त्यांना पकडण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न सुरू केले आहेत. बिबट्यांना पकडणे आहेच परंतु नागरिकांनाही स्वतःची काळजी घेण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. त्याबरोबर आवश्यक मदतही विभागाने सुरू केली आहे. यामध्ये शेतात काम करणाऱ्या व्यक्तीने गळ्यात खिळ्यांचे पट्टे लावून काम करणे, बिबट्यांचे स्थलांतर, बिबट्यांची नसबंदी, बिबट्याप्रवण क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांच्या घरांभोवती विजेचे किंवा सौरकुंपण लावणे, टेहळणी कॅमेरे, बिबट्याचे अस्तित्व समजण्यासाठी अॅलर्ट सिस्टिम बसवणे या उपायांचा समावेश आहे. एवढेच नव्हे तर 'वनतारा' मध्ये काही हजार बिबटे स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. हा प्रस्ताव 'वनतारा'ने स्वीकारला असून त्यावर बोलणी सुरू आहे. हे देखील तात्पुरते पर्याय आहेत, मात्र कायमस्वरूपी पर्यायांचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. बिबट्यांचा सुरक्षित अधिवास काढून घ्यावा तर ऊसशेती कमी करणे हे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे जनक्षोभ आणखी भडकून, जंगलाला आग लावण्यापर्यंत नागरिकांची मजल जाण्याआधीच तज्ज्ञांच्या मदतीने ठोस उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

# बिबट्या-मानव संघर्ष!

**अमर नाटेकर**

राज्यातील सध्याचा चिंतेचा विषय म्हणजे बिबट्या आणि त्याने केलेले मानवावरील हल्ले. पुण्यात दोन लहान मुलांसह एका वृद्धाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर बिबट्याला नरभक्षक संबोधून गोळी घालून मारूनही टाकण्यात आले. मानवी वस्तीपर्यंत नव्हे तर थेट वस्तीत येऊन घरात घुसलेल्या या बिबट्यांचे हल्ले हा चिंतेचा विषय झाला असून, या बिबट्याप्रवण क्षेत्रात यामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्यांची संख्या एक हजारांपेक्षा जास्त झाल्याचे वनविभागाकडील आकडेवारीतून दिसून येते. केरळसारख्या राज्यात एका बाजूला यांची संख्या कमी होतेय म्हणून उपाययोजना केल्या जात आहेत, तर यांची संख्या आटोक्यात आणण्याचे प्रयत्न महाराष्ट्रात सुरू झाले आहेत. 'वन्यप्राणी संरक्षण कायदा' हा भारतात गेल्या अनेक वर्षांपासून आहे, त्यामुळे त्या कायद्यानुसार सर्वसामान्यांना वन्यप्राण्यांचा 'बाल पण बाका' करता येत नाही. त्यामुळे बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात म्हणजेच त्यांना मारून टाकणे नागरिकांना शक्य नाही. यासाठी त्यांना वनविभागावरच अवलंबून राहावे लागते. वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या या खात्याकडे आता बिबट्यांनीच लक्ष वेधायला भाग पाडले आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

वाढत्या शहरीकरणासाठी, विकासकामांसाठी वारेमाप आर्थिक तरतूद केली जाते. मात्र, वनक्षेत्र सांभाळण्यासाठी म्हणावी तितकी तरतूद केली जात नाही. साधे वाढलेले गवत कापायचे म्हटले तरी वनविभागाला स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निधीवर अवलंबून राहावे लागते. एवढेच नव्हे तर गेल्या अनेक वर्षांपासून भरतीच नसल्यामुळे अपुऱ्या मनुष्यबळावर बिबट्यांचा बंदोबस्त करण्याचे आव्हान या विभागावर आहे. याशिवाय पिंजरेही कमी असल्याने नागरिकांच्या मागणीनुसार पुरवठा वनविभाग करू शकत नसल्याची सध्या स्थिती आहे. पकडून आणलेले बिबटे ज्या पिंजऱ्यातून आणले आहेत त्या पिंजऱ्यातच त्यांना ठेवले जात असल्याने, नवे बिबटे पकडण्यासाठी आणखी पिंजरे कोठून आणावेत असा प्रश्न वनविभागासमोर उभा ठाकला आहे. जंगलक्षेत्र कमी झाले आणि उसाचे क्षेत्र वाढले ही बिबट्यांच्या मानवी वस्तीत येण्याची कारणे सांगितली जात आहेत. ती आहेतच. याशिवाय बिबट्यांच्याही मानवी वावराला सरावलेल्या पुढच्या पिढीला सहज भक्ष्य मिळवण्याची कला अवगत झाली आहे, असे म्हणावे लागेल. जंगलात मानवाचे दर्शनही या प्राण्यांना होत नाही; परंतु बिबट्या मानवी वस्ती शेजारील असलेल्याच शेतात आपला घरोबा करत असल्यामुळे त्यांना माणसांचा वावर हा सहज जाणवणारा आहे. त्यामुळेच हे बिबटे भटकी कुत्री, घरांच्या समोरच असलेल्या गोठ्यांमधील जनावरे यांना भक्ष्य बनवतात. या बिबट्यांच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या दुभत्या जनावरांची संख्याही आता काही हजारात गेली आहे. मात्र, आता त्याही पुढे जाऊन या बिबट्यांनी माणसालाच लक्ष्य करण्याला सुरुवात केली आहे. शेतात काम करणाऱ्यांची बिबटे थेट मानगूट पकडूनच नेतात. यामुळे आता लहान मुले, शाळकरी मुले यांना बाहेर सोडण्याला नागरिक घाबरत आहेत. त्यामुळे शाळाही ओस पडल्या असून, त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर झाला आहे. वृद्ध व्यक्तींना घराच्या बाहेर पाय मोकळे करण्यासाठी जाणेही मुश्किल झाले



आहे. हा एका रात्रीतला बदल नाही आहे, तर हे गेल्या अडीच- तीन दशकातील स्थित्यंतर आहे. या सगळ्या बदलांची जाणीव वेळोवेळी वनविभागाला झालेली आहे. त्यावर उपाययोजना म्हणूनच रेस्क्यू सेंटरची निर्मिती झाली; परंतु या केंद्राच्या क्षमतेपेक्षा बिबट्यांचा प्रजननाचा दर हा कित्येक पटीने जास्त आहे. एक मादी वर्षातून दोन वेळा प्रसवते आणि प्रत्येकवेळी दोन ते तीन पिलांना जन्म देते. त्यामुळे हे प्रमाण झपाट्याने वाढले आणि ते वनविभागाच्या क्षमतेच्या बाहेरच गेले आहे.

# राज्ये का होताहेत कर्जबाजारी?


**गेल्या काही वर्षांत भारतातील अनेक राज्यांनी आपल्या भांडवली खर्चात लक्षणीय घट केली आहे. 2015-16 ते 2022-23 या कालावधीत राज्यांच्या भांडवली खर्चात तब्बल 51 टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. दिल्लीमध्ये 38 टक्के, पंजाबमध्ये 40 टक्के, आंध्रप्रदेशमध्ये 41 टक्के आणि पश्चिम बंगालमध्ये 33 टक्क्यांची घसरण नोंदवली गेली आहे. या प्रवृत्तीमुळे राज्यांच्या आर्थिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. कोणताही नागरिक, व्यापारी संस्था किंवा सरकार जेव्हा उत्पादक कामांसाठी कर्ज घेते, तेव्हा त्या कर्जातून मिळणारे उत्पन्न किमान व्याज आणि हप्त्यांच्या परतफेडीसाठी पुरेसे असणे आवश्यक असते. पण जर कर्ज अनुत्पादक क्षेत्रात म्हणजे मोफत वीज, पाणी, सवलती अथवा नागरिकांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यासारख्या योजनांवर खर्च होत असेल, तर त्या कर्जाचा भार पुढील काळात अधिकच वाढतो.**



**प्रा. दीपक मोहिते**

आज भारतातील काही राज्यांची अशीच अवस्था झाली आहे की, व्याज आणि हप्ते फेडण्यासाठीसुद्धा पुन्हा कर्ज घ्यावे लागत आहे. ही प्रवृत्ती पुढे कायम राहिली, तर ही राज्ये दिवाळखोरीच्या स्थितीला पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ राज्य सरकारच नव्हे, तर केंद्र सरकारनेही गेल्या काही वर्षांत बाजारातून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले आहे. 2019 मध्ये केंद्र सरकारवर 1.74 लाख कोटी अमेरिकी डॉलर इतके कर्ज होते, जे 2025 मध्ये दुप्पट वाढून 3.42 लाख कोटी डॉलरपर्यंत गेले आहे. 2029 पर्यंत हे कर्ज 4.89 लाख कोटी डॉलरपर्यंत पोहोचेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. आज भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन 4.19 लाख कोटी डॉलरच्या आसपास आहे, म्हणजे केंद्र सरकारचे कर्ज जीडीपीच्या 80 टक्क्यांपेक्षा अधिक झाले आहे. केंद्र व राज्य सरकारांचे कर्जावर वाढते अवलंबित्व अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन आरोग्यासाठी धोकादायक आहे. सध्या केंद्र सरकारवर सुमारे 200 लाख कोटी रुपये कर्ज असून, राज्य सरकारांवर 82 लाख कोटी रुपये इतके कर्ज आहे. एकत्रितपणे ही रक्कम 282 लाख कोटी रुपयांपर्यंत जाते, जी भारताच्या जीडीपीच्या 81 टक्क्यांच्या बरोबरीची आहे. भारतीय आर्थिक तत्त्वज्ञान कर्जाधारित विकासाला प्रोत्साहन देत नाही. आर्य चाणक्यांनी 'अर्थशास्त्र' या ग्रंथामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, राजाच्या कोषात अधिशेष असावा. कोष रिकामा असेल, तर राज्य नागरिकांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च कसा करणार? प्राचीन भारतातील राज्ये अधिशेष अर्थसंकल्पावर चालत होती, त्यामुळे त्यांचा विकास स्थिर आणि स्वावलंबी होता. परंतु आजची स्थिती पूर्णतः उलट आहे. काही राज्ये बाजारातून कर्ज घेऊन नागरिकांना मोफत सुविधा देत आहेत, पण भविष्यात या कर्जाची परतफेड कशी होईल, याचा विचार करत नाहीत. परिणामी देशातील काही राज्यांमध्ये अशी परिस्थिती आहे की, त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या 55 टक्क्यांहून अधिक रक्कम फक्त वेतन, पेन्शन आणि व्याजाच्या देयकांवर खर्च केली जाते. या राज्यांना आपल्या उत्पन्नात लक्षणीय वाढ घडवून आणता येत नाही. काही राज्ये तर आपल्या अपेक्षित महसुलापेक्षा 11 टक्क्यांनी कमी महसूल गोळा करतात, तरीही त्यांचा खर्च सतत वाढत असतो. परिणामी त्यांचे वित्तीय तुटीचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, ती अवस्था आता असह्य होत आहे. सध्या राज्यांच्या एकूण उत्पन्नातील 84 टक्के भाग स्थिर खर्चाच्या बाबींवर (वेतन, पेन्शन, व्याज इ.) खर्च होतो. त्यामुळे विकासकामांसाठी किंवा भांडवली गुंतवणुकीसाठी निधी शिल्लक राहत नाही. नवीन रस्ते, रुग्णालये, शाळा यांसारख्या पायाभूत प्रकल्पांवर खर्च न झाल्याने रोजगारनिर्मितीही घटली आहे. पंजाबमध्ये एकूण उत्पन्नाच्या 76 टक्के रक्कम केवळ वेतन, पेन्शन व व्याजावर खर्च होते. हिमाचल प्रदेशात हे प्रमाण 79 टक्के आणि केरळमध्ये 71 टक्के आहे. त्याशिवाय सबसिडीवरही प्रचंड खर्च होतो. पंजाबमध्ये उत्पन्नाच्या 24 टक्के, आंध्रप्रदेशात 15 टक्के, तामिळनाडूमध्ये 12 टक्के, राजस्थानमध्ये 13 टक्के आणि हिमाचल प्रदेशात 5 टक्के खर्च फक्त सबसिडीवर केला जातो. त्यामुळे पंजाबसारख्या राज्याकडे भांडवली गुंतवणुकीसाठी शून्य निधी उरतो. पेन्शन खर्चाचा विचार केल्यास, 1980-81 मध्ये राज्यांच्या एकूण उत्पन्नाच्या केवळ 3.4 टक्के रक्कम या खात्यावर खर्च होत होती. 2021-22 मध्ये हीच टक्केवारी वाढून 24.3 टक्क्यांवर गेली आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने पेन्शन धोरणात बदल केला. अन्यथा हा खर्च 30 टक्क्यांपर्यंत वाढला असता. या सर्व कारणांमुळे राज्यांच्या भांडवली खर्चात सतत घट होत आहे. दिल्ली, पंजाब, आंध्रप्रदेश आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये हे प्रमाण 30 ते 40 टक्क्यांच्या दरम्यान आहे.

भारतातील काही राज्ये आज अशा आर्थिक रचनेत अडकली आहेत, जिथे वाढत्या सबसिडीमुळे आणि घटत्या गुंतवणुकीमुळे त्यांची अर्थव्यवस्था कोसळण्याच्या मार्गावर आहे. वेतन, पेन्शन आणि व्याज यांसारख्या स्थिर खर्चांमुळे आज 15 राज्यांचा अर्थसंकल्पीय तूटदर कायदेशीर मर्यादा असलेल्या 3 टक्क्यांच्या पलीकडे गेला आहे. हिमाचल प्रदेशात हा तूटदर 4.7 टक्के, मध्यप्रदेशात 4.1 टक्के, आंध्रप्रदेशात 4.2 टक्के आणि पंजाबमध्ये 3.8 टक्के इतका आहे. याच पार्श्वभूमीवर मध्यप्रदेश सरकारने नुकताच 5200 कोटी रुपयांचे नवीन कर्ज घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय चर्चेत आला. कारण 'लाडली बहना योजना' अंतर्गत 1.27 कोटी महिलांच्या खात्यात भाऊबीजच्या दिवशी रक्कम वेळेत जमा होऊ शकली नव्हती. त्यानंतर राज्य स्थापनेदिनी निधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारला कर्ज घ्यावे लागले. एखाद्या राज्याला सामाजिक योजनांसाठीसुद्धा कर्ज घ्यावे लागते, तेव्हा ती परिस्थिती नक्कीच चिंताजनक असते. मध्यप्रदेशावर मार्च 2024 पर्यंत 3.7 लाख कोटी रुपये कर्ज होते, जे आता वाढून 4.8 लाख कोटी रुपयांवर गेले आहे. राज्याच्या उत्पन्नात मात्र या गतीने वाढ झालेली नाही.




# डिजिटल अटकेचे भयावह रुप...

**लुटमारीचे प्रकार कायमच चालत आले आहेत. सर्वसामान्यांना थेट फटका देणारे गुन्हे म्हणून पाकिटमारी किंवा गळ्यातली चेन लांबवणे हे प्रकार सुपरिचित आहेत. यात तुम्ही तुमच्यासोबत जी काही रोकड अथवा सोने बाळगत आहात त्यालाच धोका असतो. बँकांमधील अथवा घरातील रक्कम आणि अन्य ऐवज सुरक्षित असतो. नंतर घरातला ऐवजही सुरक्षित नसल्याचे सिद्ध झाले असले तरी बँकांमधील ऐवज मात्र सुरक्षित होता आणि आहे असे आजही मानले जाते. प्रगती जशी होत गेली तसे व्यवहारांचेही स्वरूप बदलत गेले. मोबाइलच्या एका क्लिकवर घरात बसून कोणत्याही वेळेत आर्थिक व्यवहार करता येतात. जसे व्यवहारांचे स्वरूप बदलले तसे गुन्ह्यांचेही स्वरूप बदलले. त्यामुळे बँकेतील ऐवजही सुरक्षित नसल्याचे आता स्पष्ट झाले.**

**रोहिणी पाटील**

गुन्हेगारीच्या या वाढत्या जाळ्यात 'डिजिटल अरेस्ट' नावाचा एक नवीन प्रकार सगळ्यांत मोठे आव्हान म्हणून समोर आला आहे. प्रत्येक समस्येचा मुकाबला करण्यासाठी काही उपाय केलेले असतात. डिजिटल अरेस्टच्या बाबतीत उपलब्ध असलेले सर्व उपाय खुजे किंवा कुचकामी ठरत असल्याचे दिसते. सायबर गुन्हेगार लूट करण्यासाठी रोज नवनवीन प्रकार अवलंबत आहेत. सुरुवातीला दुर्मिळात दुर्मिळ म्हणता येऊ शकणारा डिजिटल अरेस्टचा नामक गुन्हा पाहता पाहता आता अजगरासारखे सगळेच गिळंकृत करायला निघाला आहे. यातील सगळ्यांत धोकादायक बाब म्हणजे याच्या माध्यमातून जी लूट केली जाते त्यात तुम्हाला स्वतःला गुन्हेगाराला तुमची कमाई सोपवावी लागत असून बहुतांश प्रकरणात लुटणाऱ्याचा चेहराही तुम्हाला दिसत



नाही. व्हॉटस्अॅप, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून तुम्हाला धमकावले जाते. तुमच्या कथित काळ्या कृत्याची भीती घातली जाते आणि धमकावले जाते. गुन्हेगार स्वतःला पोलीस असल्याचे भासवतो आणि लोक त्याला बळी पडतात. यात कोणते संमोहन नसते, असते ती केवळ भीती. डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे तीन हजार कोटी रुपये गुन्हेगारांनी लुटले असल्याचे सीबीआयने म्हटले आहे. त्यामुळे खुद्द सर्वोच्च न्यायालयालाच याची दखल घ्यावी लागली. हरियाणातील एका ज्येष्ठ महिलेने अलीकडेच सरन्यायाधीशांना एक पत्र लिहिले होते. या महिलेला आणि तिच्या पतीला डिजिटल अटक करून गुन्हेगारांनी एक कोटींपेक्षा जास्त रक्कम हडपल्याची कैफियत या महिलेने मांडली. जेव्हा थेट मदतीची याचना करणारे पत्र येते तेव्हा न्यायालयांना अथवा न्यायाधीशांना मूक प्रेक्षक बनून राहता येत नाही.

सायबर गुन्हेगारांना आवरा, त्यांना वेसण घालण्यासाठी पावले उचला असे न्यायालयाने कठोर शब्दांत तपास संस्थांना सांगितले. राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो अर्थात एनसीआरबीनेही त्यांच्या अहवालात सायबर गुन्ह्यांशी संबंधित हादरवणारी आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार 2022 या वर्षात सायबर गुन्ह्यांची 65,983 प्रकरणे नोंदवली गेली होती. मात्र हेच प्रमाण 2023 मध्ये 86,420 पर्यंत वाढले. ही वाढ 31 टक्के एवढी होती. नियमितपणे सायबर गुन्ह्यांची प्रकरणे समोर येत असून लोकांची लुटमार सुरू आहे. या गुन्ह्यांमधील गुन्हेगारांची कार्यशैली ठरलेली असते तरीही त्यांना नियंत्रित करण्यात मोठी आव्हाने आहेत. तंत्रज्ञान हेच त्यांचे सगळ्यांत मोठे शस्त्र असल्यामुळे ते कोणत्याही भागातून अथवा भूमीतून आपल्या गुन्हेगारी कृत्याला चालना देऊ शकतात. अशा वेळी हद्द, सीमा, अधिकारक्षेत्र आदी बाबी अडथळे ठरतात. बहुतेकदा वेगवेगळ्या कायदेशीर चौकटी आणि नियमही अडथळे निर्माण करण्याचे काम करतात. चेहरा नसल्यामुळे गुन्हेगारांना शोधणे अवघड होते. तद्वतच कळत नकळत पीडिताकडूनही त्यांना मदत करण्याचेच काम केले जाते. बदनामीच्या भीतीने अथवा निव्वळ अज्ञानामुळे ज्यांना या गुन्ह्याची झळ पोहोचली आहे अशी मंडळी तक्रारी करण्यास पुढेच येत नाही. कायदा अथवा तपास संस्था आपल्याला यात मदत करू शकतात, असा विश्वास या पीडितांना असेल किंवा नसेलही; मात्र बदनामीची भीती किंवा टवाळीचा विषय ठरण्याची भीती त्यांच्यावर अधिक घट्ट कब्जा करून असते. स्मार्टफोन अथवा अन्य माध्यमे वापरणाऱ्यांची संख्या आज भलेही 80-90 कोटींच्या घरात असेल, पण प्रत्येकालाच प्रत्येक गोष्टीचे ज्ञान असत नाही. मोबाइलवरचे बोट चुकीच्या ठिकाणी जरी घसरले गेले तरी नको ते समोर येत वापरकर्ता त्यात ओढला जातो. गुन्हेगारांची या प्रगत तंत्रज्ञानावर असलेली पकड आणि अत्यंत प्रगत साधनांची असलेली उपलब्धता हेच त्यांचे बलस्थान आहे. त्यामुळे या स्वरूपाच्या गुन्ह्यांचा अन् गुन्हेगारांचा छडा लावण्यासाठी तपास संस्थांनी त्यांच्या दोन पावले पुढे असणे अपेक्षित आहे. 3 हजार कोटी लुटीची जी आतापर्यंतची ढोबळ आकडेवारी समोर आली आहे त्यापेक्षा कदाचित रक्कम कैकपटीने जास्तही असू शकते. त्याचे कारण गुन्हेगारांनी जे सावज हेरले असतात त्या प्रत्येकाला त्यांनी वेगवेगळ्या धमक्या देत वेगवेगळ्या सापळ्यात अडकवले असते. त्यात नागरिकांनी अडकू नये आणि स्वतःचा अभिमन्यू करून घेऊ नये याकरता त्यांनीच माहिती आत्मसात करणे आवश्यक आहे आणि याबाबत जागृती निर्माण करणे व प्रशिक्षण देणे अत्यावश्यक ठरले आहे. या घोटाळ्यांचा जागतिक स्तरावर सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य वाढवणे अपेक्षित आहेच, मात्र त्याच वेळी स्थानिक स्तरावरही पीडितांना सहजपणे तक्रार करता यावी यासाठी अधिक पर्याय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. गोपनीयतेचा पैलू विशेष ध्यानात घेतला गेला तर लोक वेळीच तक्रार दाखल करू शकतील. माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 सारखे कायदे या गुन्ह्यांचा मुकाबला करण्यासाठी पाया प्रदान करतात. तथापि, त्यात अधिक सुधारणा आणि बहुआयामी दृष्टिकोनाची गरज आहे. तसे केले तरच डिजिटल अटक घोटाळ्यांच्या वाढत्या धोक्यांपासून व्यक्तींचे संरक्षण करता येऊ शकेल.



# दैं. गोदातीर समाचार वर्धापन दिन आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!





# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १ * नांदेड * गुरूवार, दि. १ जानेवारी २०२६ * पृष्ठे ३६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211







# वित्तीय शिस्तीमध्ये बाधा

**चालू आर्थिक वर्षातील करकपातीमुळे देशाच्या महसुली उत्पन्नातील वाढ कमी झाली आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला वित्तीय पाठबळ देण्यासाठी कमी वाव राहिला असल्याचे निरीक्षण 'मूडीज' या जागतिक पतमानांकन संस्थेने नोंदवले आहे. भारत सरकारने याची गंभीर दखल घेतली पाहिजे. याचे कारण महसुलातील वाढ तुलनेने कमी असल्यामुळे वित्तीय शिस्तीला बाधा येऊ शकते. आता त्यासंदर्भात पावले उचलण्याची गरज आहे.**

**परामर्श**

**नंदकुमार काळे**

**भा**रताने २०२४ मध्ये तिसऱ्या क्रमांकाची शक्ती बनून जपानवर थोडीशी आघाडी घेतली. तथापि, चीनसोबतची महत्त्वपूर्ण शक्ती तफावत वाढली आहे. त्यामुळे बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेचे भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी दीर्घकालीन आव्हान निर्माण झाले आहे. आशिया पॉवर इंडेक्सच्या २०२५ आवृत्तीत भारताच्या आर्थिक आणि लष्करी क्षमतांमध्ये वाढ झाली आहे. अर्थव्यवस्था सतत वाढत असून आंतरराष्ट्रीय प्रभाव, कनेक्टिव्हिटी आणि तंत्रज्ञानाद्वारे परिभाषित केलेल्या भू-राजकीय प्रासंगिकतेच्या बाबतीत त्याने लहान नफा मिळवला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे भारताच्या लष्करी क्षमतांमध्येही सातत्याने सुधारणा झाली आहे. त्यामुळे भारताचा अलीकडील संरक्षणसिध्दतेचा अनुभव वाढला आहे. तथापि, भारताला त्याच्या राजनैतिक संबंध आणि संरक्षण नेटवर्कच्या बाबतीत समतुल्य यश मिळालेले नाही. आर्थिक आघाडीवर, भारत स्थिर प्रगतीच्या मार्गावर आहे. त्याचे स्थान सुधारत आहे. त्याचे रँकिंग वाढतच आहे. भारतासमोरील एक आव्हान म्हणजे इतर आशियाई देशांसोबत व्यापार संबंध वाढवणे. दुसरीकडे, भारतासाठी सकारात्मक बाबींमध्ये अमेरिकेनंतर सर्वात जास्त गुंतवणूक आकर्षित करणारा देश म्हणून चीनला मागे टाकणे समाविष्ट आहे. हे दहा वर्षांच्या संचयी प्रवाहाचे प्रतिबिंब दाखवते. हा बदल भू-राजकीय घटकांचा परिणाम आहे. त्यात




व्यवसाय पुरवठा साखळी विविधीकरण करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारताने राजनैतिक प्रभावात माफक सुधारणा पाहिली आहे. तथापि, जपानसारख्या इतर अनेक इंडो-पॅसिफिक मध्यम शक्तींनी नेतृत्वबदल अनुभवले आहेत.


द्विपक्षीय राजनैतिक संवादांच्या दृष्टीने मोजली जाणारी सक्रिय राजनैतिकता आणि भारताच्या राजनैतिक सेवेच्या सुधारित गुणवत्तेचे तज्ज्ञांचे मूल्यांकन या निकालात योगदान देत आहे. तथापि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रादेशिक किंवा जागतिक नेतृत्वाच्या अनुषंगाने भारताचे रँकिंग सुधारलेले नाही. बहु-संरेखन, धोरणात्मक स्वायत्तता आणि जागतिक दक्षिण यावर लक्ष केंद्रित करणारी भारताची सध्याची राजनैतिक रणनीती, त्याचा धोरणात्मक प्रभाव वेगाने वाढवण्याचा स्वयंचलित मार्ग देत नाही. आशिया पॉवर इंडेक्स देशांसोबत वाढत्या देवाणघेवाणीमुळे गेल्या वर्षभरात भारताचा सांस्कृतिक प्रभाव वाढला आहे. भारत प्रवास आणि पर्यटनस्थळ म्हणून अधिक प्रसिद्ध झाला आहे आणि आशिया पॉवर इंडेक्स देशांशी थेट उड्डाणे झाल्यामुळे प्रवासी कनेक्टिव्हिटीमध्येही सुधारणा झाली आहे. उदाहरणार्थ, भारत आणि ब्रुनेई दरम्यान एक नवीन थेट मार्ग सुरू होत आहे. आशिया पॉवर इंडेक्समधील भारताचे एकूण चित्र मिश्रित आहे. भारताची शक्ती हळूहळू वाढत आहे; परंतु देशाच्या महत्त्वाकांक्षा आणि त्याच्या प्रभावावरील सततच्या मर्यादांच्या वास्तवात, विशेषतः चीनच्या तुलनेत अजूनही अंतर आहे. महागाईमध्ये झालेली घट आणि पतधोरण शिथिलता यामुळे क्रयशक्तीला चालना मिळणार आहे.

परंतु सरकारने वस्तू व सेवा करात सप्टेंबरपासून कपात केल्यानंतर एकूण ३७५ वस्तूंवरील जीएसटी कमी करण्यात झाला आहे. त्यातच गेल्या अर्थसंकल्पात सरकारने प्राप्तिकरात बदल केल्यामुळे बारा लाख रुपयांच्या उत्पन्नावर कर भरण्याची आवश्यकता नाही. त्याआधी ही मर्यादा सात लाख रुपये इतकी होती.

सरकारच्या या निर्णयामुळे मध्यमवर्गाला एक लाख कोटी रुपयांचा दिलासा करात मिळाला. परंतु मुळातच कर कमी झाल्यामुळे, सरकारच्या महसुलावर मात्र परिणाम झाला आहे. तो महसूल कसा वाढेल, याची काळजी सरकारने केली पाहिजे. भारताचा विकासदर पुढील वर्षी ६.५ टक्के राहण्याची शक्यता आहे. २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षात तो सात टक्के राहील असा होरा आहे. चालू आर्थिक वर्षातील निव्वळ करमहसूल सप्टेंबर अखेरपर्यंत १२.२९ लाख कोटी रुपये आहे. गेल्या आर्थिक वर्षात याच काळात तो १२.६५ लाख कोटी रुपये होता. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक' या ऑक्टोबरच्या अहवालात, २०२५ मध्ये जागतिक विकासदर ३.३ वरून ३.२ वर तर २०२६ मध्ये ३.१ वर येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. प्रगत देशांमधील सकल राष्ट्रीय उत्पादन, म्हणजेच जीडीपीच्या वाढीचा दर हा चालू वर्षात ०.२ टक्क्यांनी घसरण्याची चिन्हे आहेत. परंतु उद्ययोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील अर्थव्यवस्था यांच्या वाढीचा वेग २०२४ मध्ये ४.३ टक्के होता. तो २०२५ मध्ये ४.२ टक्के असणार आहे. याचा अर्थ, अत्यंत विकसित झालेल्या अर्थव्यवस्थांपेक्षा उदयोन्मुख देशांच्या प्रगतीचा वेग अधिक आहे आणि या देशांमध्येदेखील भारताची कामगिरी तेजस्वी आहे. सरलेल्या जुलै ते सप्टेंबर या तिमाही कालावधीत भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर अर्थतज्ज्ञांच्या अनुमानाच्या तुलनेत सरस वठला आहे. अर्थव्यवस्था ८.२ टक्क्यांच्या भरधाव वेगाने घोडदौड करत आहे.

ताज्या आकडेवारीनुसार एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीमध्ये जीडीपी वाढीचा दर ७.८ टक्के होता, तर यंदाच्या दुसऱ्या तिमाहीमध्ये आपण ८.२ टक्क्यांपर्यंत आपण मजल मारली आहे. वर्षभरापूर्वीच्या जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीमध्ये हा दर फक्त ५.६ टक्के होता. म्हणजे सरलेल्या तिमाहीमध्ये मागील सहा महिन्यांमधील तिमाहींमधील उच्चांक आपण गाठला आहे. अमेरिकेने भारतावर २७ ऑगस्टपासून ५० टक्के शुल्कवाढ लागू केल्याचे प्रतिबिंब या आकडेवारीत कमी पडले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. कदाचित पुढील तिमाहीमध्ये त्याचा किंचित परिणाम जाणवू लागेल. एकूण जीडीपीमध्ये ५७ टक्के वाटा हा खासगी उपभोगखर्चाचा आहे. या खर्चात अगोदरच लक्षणीय वाढ झाली आहे. जेवढा लोकांचा उपभोग, म्हणजेच मागणी वर जाते, त्या प्रमाणामध्ये बाजारपेठेतील वस्तू आणि सेवांचा खपही वाढतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत उत्साह संचारतो. अलिकडे संपलेल्या तिमाहीमध्ये सर्वात समाधानकारक भाग म्हणजे मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादनक्षेत्रामध्ये झालेली ९.१ टक्के इतकी वाढ. एकीकडे अतिवृष्टी आणि महापुरामुळे यंदा शेतीचे अपरिमित नुकसान झाले. कृषी क्षेत्र फक्त ३.५ टक्क्यांनी वाढले. म्हणूनच उत्पादनक्षेत्रावर भरवसा होता आणि तो योग्य असल्याचे सिद्ध झाले आहे. सेवाक्षेत्राची वाढही उत्तम आहे. सेवाक्षेत्रात लाखो लोकांना नोकऱ्या मिळतात. बांधकामक्षेत्राचीही ७.६ टक्के दराने प्रगती झाली असून त्या क्षेत्रातही नोकऱ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे, ही समाधानाची बाब आहे.

सध्या भारताची अर्थव्यवस्था ३.९ लाख कोटी डॉलरच्या सकल देशांतर्गत उत्पन्नासह जगात पाचव्या क्रमांकावर आहे. सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि प्रख्यात अर्थतज्ज्ञ अरविंद पानगरिया यांनी, भारत हा २०४७ पर्यंत विकसित देश होण्याचे उद्दिष्ट गाठू शकेल असे म्हटले आहे. भारताचा सध्याचा विकासदर काय हे बघितल्यास आपली अर्थव्यवस्था पुढील दशकात दहा लाख कोटी डॉलर्सवर जाईल, असे जाणवते. सध्या दरडोई उत्पन्न २,५७० डॉलर आहे, ते २०४७ पर्यंत १४ हजार डॉलरवर जाईल. अर्थात त्यासाठी वार्षिक ७.३ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे. या सगळ्याचे प्रतिबिंब शेअर बाजारावर पडणे स्वाभाविक असते. रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २०२५ मध्ये परकीय चलन बाजारात ७.९१ अब्ज डॉलरची निव्वळ विक्री केली, जी ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत ०.२१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होती. रुपयाची आणखी घसरण होऊ नये, यासाठी हे करावे लागत आहे. अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे भारताच्या निर्यातीलाही फटका बसला आहे. त्यामुळे एका वर्षात भारताची व्यापारी तूट २६ अब्ज डॉलर्सवरून ४१ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचली आहे. भरीस भर म्हणून की काय, सरलेल्या ऑक्टोबरअखेर केंद्र सरकारची वित्तीय तूट संपूर्ण वर्षाच्या उद्दिष्टाच्या ५२.६ टक्के म्हणजे एकूण सव्वाआठ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. मागील वर्षाच्या याच पहिल्या सात महिन्यांमध्ये वित्तीय तूट ही अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ४६.५ टक्के इतकी होती.




केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यास दोन महिन्यांचा अवधी असून, त्या कालावधीमध्ये केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन कठोर पावले उचलतील, अशी अपेक्षा आहे. रशियातून भारतात होणारी खनिज तेलाची आयात डिसेंबर महिन्यात तीन वर्षांमधील नीचांकी पातळीवर येणार आहे. ही आयात नोव्हेंबरमध्ये उच्चांकी पातळीवर होती. अमेरिकेसह पश्चिमी देशांनी रशियावर घातलेल्या निर्बंधांमुळे भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी रशियातून खनिज तेलाची आयात कमी करून इतर देशांकडे मोर्चा वळवला आहे. मात्र रशियाकडून तेलाची आयात स्वस्तात होत होती, या वास्तवाचा फटका भारताला बसणार आहे.

✦✦✦

# रुपयाची घसरण, अर्थव्यवस्थेचा कोंडला श्वास

**अमेरिकन डॉलरच्या तुलनेत अलिकडेच झालेली रुपयाची मोठी घसरण भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एका मोठ्या धक्क्यापेक्षा कमी नाही. इतिहासात पहिल्यांदाच रुपयाने नव्वद रुपयांचा टप्पा ओलांडला. भारताचा जीडीपी मजबूत असूनही, रुपयाची ही घसरण भारतीय अर्थव्यवस्थेवर दबाव वाढवत आहे. ही चिंतेची बाब आहे. कारण त्यामुळे महागाईचा धोका आणखी वाढतो.**

**वेध**

**कैलास ठोळे,**
आर्थिक विषयांचे जाणकार

**अ**लिकडील काळात रुपयावरील वाढत्या दबावामागे अनेक कारणे आहेत, ज्यात डॉलरची मजबुती, जागतिक अनिश्चितता वाढणे आणि मजबूत परदेशी मागणी यांचा समावेश आहे. यापूर्वी अशी लक्षणीय घसरण २०२२ मध्ये दिसून आली होती. गेल्या काही दिवसांपासून बाजारातील अनिश्चितता वाढत आहे. डॉलर मजबूत होत आहे. परिणामी, गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक पर्याय शोधत असून डॉलरकडे वळत आहेत. याव्यतिरिक्त परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारपेठेतून पैसे काढण्याचा वेग वाढवला आहे. परिणामी, रुपया कमकुवत होत असून डॉलरची मागणी वाढत आहे. रुपया ९० च्या पुढे जाणे हे देखील बाजारातील बदल दर्शवते. अमेरिकन धोरणांचाही रुपयावर परिणाम होत आहे. अमेरिकेने भारतावर ५० टक्के कर लादला आहे. शिवाय, भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारात होणारा विलंब, अमेरिकेची आर्थिक धोरणे आणि अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'च्या व्याजदराबद्दल वाढत्या अटकळींमुळे रुपयावर दबाव वाढत आहे. रुपयाच्या कमकुवतपणामुळे केवळ आयात किमती वाढत नाहीत, तर पेट्रोल आणि डिझेल, यंत्रसामग्री, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक्स आणि अगदी परदेशी प्रवासाच्या किमतीही वाढतात. रुपया ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला असताना दबाव कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक डॉलर्सची विक्री करू शकते. तथापि, रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपाचा मर्यादित परिणाम होईल, कारण सध्या रुपयावर मोठा दबाव आहे. बाजार अजूनही रिझर्व्ह बँकेच्या पुढील पावलांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. अमेरिकेसोबतच्या एका मोठ्या व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्यास झालेल्या विलंबामुळे भारतीय रुपयात मोठी घसरण झाली आहे.

'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार गेल्या काही आठवड्यांमध्ये रुपया वाचवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने फारसा हस्तक्षेप केलेला नाही आणि परदेशी गुंतवणूकदार शेअर बाजारातून पैसे काढत आहेत. या दोन्ही घटकांमुळे रुपयावरही दबाव येत आहे. आयात महाग होत असल्याने सामान्य माणसाच्या खिशावर महागाईचा भार आणखी वाढू शकतो. मोठ्या कंपन्या, आयातदार आणि परदेशी गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात डॉलर खरेदी करत आहेत. म्हणूनच रुपया सतत कमकुवत होत आहे. या व्यतिरिक्त, कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडत आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांचा मूड आणखी बिघडत आहे. याचा अर्थ डॉलरची मागणी खूप जास्त आहे आणि पुरवठा कमी आहे. परिणामी, सतत घसरण होत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची भीतीदेखील आहे. त्याचा थेट परिणाम आपल्या खिशावर होईल. एरव्ही बाजारात डॉलर्स विकून रिझर्व्ह बँक रुपयाला घसरण्यापासून वाचवत असते; परंतु या वेळी रुपया थोडा मजबूत झाला, तेव्हा रिझर्व्ह बँकने स्वतः डॉलर्स खरेदी केले. भारताची अर्थव्यवस्था खूप मजबूत आहे. जीडीपीची वाढ ८.२ टक्के आहे. तथापि, डॉलरची मागणी वाढल्यामुळे, हे सकारात्मक पैलू झाकोळले गेले असून रुपया कमकुवत दिसत आहे. याचा अर्थ, प्रत्यक्षात परिस्थिती चांगली आहे; परंतु डॉलर्सची भूक जास्त आहे. चलनातील घसरणीचे कारण परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारां(एफपीआय) कडून दररोज होणारी विक्री हे आहे. गेल्या आठ महिन्यांपासून रुपया घसरत आहे आणि आता तो एका नवीन नीचांकावर पोहोचला आहे.




बराच काळ स्थिर असलेल्या रुपयाने गेल्या वर्षीच ८५-९० चा टप्पा ओलांडला आहे. अलिकडे डॉलरच्या तुलनेत रुपया २५ पैशांनी घसरून ९०.२१ च्या नवीन नीचांकावर बंद झाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी एक डॉलर एका रुपयाच्या बरोबरीचा होता असे अनेकदा ऐकायला मिळते. ही कल्पना चांगली वाटते; परंतु आर्थिक तथ्ये आणि ऐतिहासिक नोंदी वेगळेच सांगतात. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीचा विचार केल्यास भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी एक रुपया एक डॉलरच्या बरोबरीचा होता, हा दावा खरा नाही. केंद्रीय बँकेच्या 'आरबीआय, द १९९१ प्रोजेक्ट डेटा' या दस्तावेजानुसार स्वातंत्र्याच्या वेळी, भारतीय रुपया अमेरिकन डॉलरशी नव्हे, तर ब्रिटिश पाउंड स्टर्लिंगशी जोडलेला होता. रुपयाचा विनिमय दर पौंड या चलनाद्वारे निश्चित केला जात असे. त्या वेळी एक पौंड १३.३३ रुपयांच्या बरोबरीचा होता. त्या वेळी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ब्रिटिश पाउंडचे मूल्य ४.०३ डॉलर होते. १९६६ मध्ये भारतीय चलनाची पहिली मोठी घसरण झाली. या काळात डॉलरच्या तुलनेत रुपया ४.७६ वरून ७.५० वर आला. हे त्या काळातील अशांत काळामुळे झाले. चीन (१९६२) आणि पाकिस्तान (१९६५) सोबतच्या युद्धांमुळे देश समस्यांशी झुंजत होता. या युद्धांमुळे अर्थव्यवस्था बिघडली. १९६५-६६ मध्ये देशात तीव्र दुष्काळ पडून अन्नधान्य उत्पादनात घट झाली आणि महागाई गगनाला भिडली. या कठीण काळात भारताला परकीय मदतीची नितांत आवश्यकता होती. जागतिक बँक आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांनी निर्यात वाढवण्यासाठी भारताने आपल्या चलनाचे अवमूल्यन करावे असा आदेश दिला. त्यानंतर डॉलरच्या तुलनेत रुपया ७.५० वर घसरला.




१९९१ हे वर्ष रुपयाच्या घसरणीच्या दृष्टीने देशासाठी महत्त्वाचे ठरले. आर्थिक आव्हानांना तोंड देत देशाने आर्थिक उदारीकरणाला सुरुवात केली. या वेळी रुपया २१ वरून २६ च्या आसपास घसरला. हा भारताच्या आर्थिक इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा होता. देयकांच्या संतुलनाच्या संकटामुळे भारताकडे आयात (तेल, आवश्यक वस्तू) खरेदी करण्यासाठी फक्त तीन आठवड्यांचा परकीय चलन साठा होता. दुसरीकडे, आखाती युद्ध किंवा इराक-कुवेत युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या. त्यामुळे भारताचे आयात बिल लक्षणीयरीत्या वाढले. यामुळे रुपया आणखी कमकुवत झाला. राजकीय अस्थिरतेने देशाला वेढले आणि गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होत गेला. या संकटावर मात करण्यासाठी तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग आणि पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी अर्थव्यवस्था उदार करण्याचा आणि निर्यात स्वस्त करण्यासाठी आणि परकीय चलन आणण्यासाठी दोन टप्प्यात रुपयाचे अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. १९९१ नंतर देशात आघाडी सरकारांचा काळ आला. १९९१ ते २००८ दरम्यान रुपया ३९ रुपयांपर्यंत कमकुवत झाला. २००८ च्या मंदीनंतर रुपया घसरुन डॉलरच्या तुलनेत ५१ रुपये झाला. तथापि, ही घसरण जागतिक घटकांमुळे होती. अमेरिकेतील लेहमन ब्रदर्स बँकेच्या पतनामुळे जागतिक मंदी आली. जोखीम टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या परदेशी गुंतवणूकदारांनी भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांमधून पैसे काढून घेण्यास सुरुवात केली. डॉलरची मागणी वाढल्याने रुपया आणखी कमकुवत झाला.

रुपयात शेवटची मोठी घसरण २०१३ मध्ये झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर येण्यापूर्वी डॉलरच्या तुलनेत रुपया ५५ वरून ६८.८० वर आला. या वर्षी, अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'ने त्याचा प्रवाह कमी करण्याची घोषणा केली. या भीतीने गुंतवणूकदारांनी भारतातून लक्षणीय रक्कम काढून घेतली. या काळात 'मॉर्गन स्टॅनली'ने उच्च चालू खात्यातील तूट (कॅड) आणि महागाईमुळे भारताला 'नाजूक पाच' अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट केले. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून, डॉलरच्या तुलनेत रुपया ८४-८५ वर व्यवहार करत होता. २०२५ मध्ये डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाले आणि प्रत्युत्तरात्मक शुल्काचा खेळ सुरू झाला. अमेरिकेने जगभरातील देशांना शुल्काची धमकी देऊन व्यापार करार करण्यासाठी दबाव आणला. काही देशांनी माघार घेतली आणि शुल्क कमी केले किंवा काढून टाकले गेले. भारताने मात्र आपल्या व्यापार हितसंबंधांशी तडजोड करण्यास नकार दिला. त्यामुळे ट्रम्प प्रशासन नाराज झाले. ऑगस्टमध्ये अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क जाहीर केले. याचा अमेरिकेला होणाऱ्या भारतीय उत्पादनांच्या निर्यातीवर विपरीत परिणाम झाला. परदेशी गुंतवणूकदारांनीही मोठ्या प्रमाणात विक्री केली. त्यामुळे रुपया कमकुवत झाला.

अलिकडच्या काळात रुपयाच्या घसरणीने देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात मदत केली आहे, असा सरकारचा विश्वास असला तरी काही तज्ज्ञांचा विश्वास आहे, की रुपयाची घसरण नेहमीच कमकुवतपणाचे लक्षण नसते. १९९१ पासून बाजार रुपयाचे मूल्य ठरवतो. कधी कधी, रुपयाचे घसरण निर्यातदारांसाठी (जसे की आयटी कंपन्या आणि औषध कंपन्या) फायदेशीर असते, कारण ते डॉलरमध्ये कमावतात आणि रुपयात रूपांतरित केल्यावर जास्त पैसे मिळवतात. रुपया स्थिर करण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँकेने अमेरिकेसोबत व्यापार करार करण्याव्यतिरिक्त इतर मार्गांनी रुपया स्थिर करण्यासाठी एक मजबूत धोरण विकसित केले पाहिजे. देशाच्या निर्यातभिमूख सुविधांमध्ये सुधारणा करणे आणि मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार रोखणेदेखील रुपया स्थिर करण्यास मदत करू शकते.

✦✦✦

DEPOSITS OVER **2800** CRORES PLUS

# दैनिक गोदातीर समाचार

## वर्धापन दिनाप्रित्यर्थ मन:पूर्वक शुभेच्छा!

**5100+** CRORES BUSINESS




**• मुदत ठेव (F.D.) योजना •**

| गुंतवणूक कालावधी | व्याजदर |
|---|---|
| 30 ते 45 दिवस | 7.00% |
| 46 ते 180 दिवस | 8.00% |
| 181 ते 365 दिवस | 9.00% |
| 366 दिवसांहून अधिक | 10.00% |

2 वर्षापेक्षा जास्त
1 लाखावर मिळवा
**₹ 900/-**

2 वर्षापेक्षा कमी
1 लाखावर मिळवा
**₹ 850/-**

455 दिवस
10.00%

90 महिन्यात दाम दुप्पट

**प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार**
द्वारा महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँण्ड इकॉनॉमिकल डेव्हलपमेंट अँण्ड एस.एम.ई. चेंबर्स ऑफ इंडिया

**प्रतिबिंब पुरस्कार**
द्वारा सहकार सुगंध, पुणे

**दीपस्तंभ पुरस्कार**
२०१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०,२०-२१, २१-२२,२२-२३ द्वारा राज्य फेडरेशन, महाराष्ट्र राज्य

**अर्थरत्न पुरस्कार**
द्वारा सह्याद्री उद्योग समूह, अहमदनगर

**बँको पुरस्कार**
१५-१६,१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०, २०-२१, २१-२२ द्वारा अवीज् पब्लिकेशन, कोल्हापूर

**सहकार गौरव पुरस्कार**
२१-२२,२२-२३ द्वारा फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीज लिमिटेड

**राष्ट्रीय पुरस्कार-बेस्ट को-ऑप.सोसायटी**
द्वारा चेंबर ऑफ इंडियन मायक्रो स्मॉल अँन्ड मिडीयम इंटरप्राईजेस

**सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार**
२०२२ द्वारा मल्टिस्टेट फेडरेशन, पुणे

**धनंजय तांबेकर**
व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन
संचालक, मॅफको

**सौ. राजश्री हेमंत पाटील**
अध्यक्ष,
गोदावरी अर्बन

# गोदावरी अर्बन
**मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि. नांदेड**
**कार्यक्षेत्र :** महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, गुजरात, गोवा
Follow us on : www.godavariurban.com

**मुख्यालय :** 'सहकारसूर्य' एमएसईबी समोर, तरोडा नाका, पूर्णा रोड,नांदेड-४३१६०५.फोन:०२४६२-२६७२७७, ७७७५००५७७७
Email : officeadmin@godavariurban.com
**प्रशासकीय कार्यालय :** रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१

विश्वास तुमचा, जबाबदारी आमची!





# कुंडलवाडीतील जनतेचे जाहीर आभार

कुंडलवाडी नगर परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत
भारतीय जनता पक्षाच्या **सौ. प्रेरणाताई गजानन कोटलवार**
यांना विजयी करून कुंडलवाडी शहराच्या विकासाची संधी मिळवून
दिल्याबद्दल कुंडलवाडी शहरातील सर्व जनतेचे **जाहीर आभार**

**नववर्षाच्या** हार्दिक शुभेच्छा

**गोदातीर** समाचार च्या वर्धापन दिना निमित्त हार्दिक शुभेच्छा

■ आभारकर्ते/ शुभेच्छुक ■

**सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार**
नूतन नगराध्यक्ष नगरपरिषद कुंडलवाडी

# साहित्य मैफल

# भाजपचे लक्ष पश्चिम बंगालकडे

दृष्टिक्षेप

**डॉ. सुकृत खांडेकर,**
ज्येष्ठ पत्रकार

**बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर भाजपाचा जल्लोष सुरु असतानाच वेळी पक्षाच्या बिहार हँडलवर 'अब पश्चिम बंगाल की बारी है' असा संदेश झळकला. जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या भाजपाचा अजेंडा काय आहे, याचा शोध घेतल्यास देशातील सर्व राज्यांमधील सत्ता काबीज करणे, हेच उत्तर मिळेल. त्यामुळे आता पश्चिम बंगालमधील निवडणुकीसाठी पक्ष सज्ज होत आहे, असे म्हणता येते.**

बिहार निवडणुकीनंतर देशातील राजकारण थोडा निवांतपणा अनुभवेल आणि पुढील काही काळ निवडणुकांची चर्चा होणार नाही, अशी अपेक्षा होती. मात्र बहुदा तसे घडणार नाही. एक निवडणूक जिंकल्यावर भारतीय जनता पक्ष पुढच्या निवडणुकीच्या तयारीला सुरूवात करतो. निवडणूक लढवण्यासाठी पक्षाची यंत्रणा आणि त्या त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे जाळे सतत कार्यरत राहील याची काळजी घेत असतो. प्रत्येक निवडणूक जिद्दीने लढवायची आणि जिंकण्यासाठीच लढायची हा मोदी-शहा याचा मंत्र आहे. पुढील निवडणुकीचा बिगूल निवडणूक आयोगाच्या अगोदर भाजपामध्ये फुंकला जातो. बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर पाटणा आणि दिल्लीमध्ये भाजपाचा जल्लोष चालू होता, मुंबई-महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक लहान मोठ्या शहरात भाजपाच्या कार्यालयांसमोर गुलाल उधळला गेला आणि मिठाई वाटली गेली, पण त्याच वेळी पक्षाच्या बिहार हँडलवर 'अब पश्चिम बंगाल की बारी है' हा संदेश झळकला. जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या भाजपाचा अजेंडा काय आहे, याचा शोध घेतला तर देशातील सर्व राज्यात सत्ता काबीज करणे, हेच उत्तर मिळेल. एका राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर दुसऱ्या राज्यात सत्ता कशी स्थापन करता येईल, याकडे भाजपाची सर्व यंत्रणा जुंपली जाते. एके ठिकाणी यश मिळाले म्हणून या पक्षात कोणी समाधानी नसते. 'शत-प्रतिशत भाजप' हेच पक्षाचे ध्येय आहे मोदी-शहा-नड्डांनी अनेकदा याचा पुनरूच्चार केला आहे. एका राज्यात सरकार स्थापन केल्यावर पक्षाची यंत्रणा निवांत बसत नाही, हीच या पक्षाची मोठी ताकद आहे.



बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात पक्ष कार्यकर्त्यांचा विजयी मेळावा झाला. आपल्या गळ्यातील गमछा बाहेर काढून हाताने उंच फडकवत मोदी पक्षाच्या मुख्यालयात आले. देशाचा पंतप्रधान पक्षाच्या मेळाव्यात भाजपाचा एक कार्यकर्ता म्हणून विजयोत्सव कसा साजरा करतो, हे तेव्हा अवघ्या देशाने बघितले. या मेळाव्यात बोलताना मोदी म्हणाले, गंगाजी (नदी) यहां बिहार से बहते हुए बंगाल तक पहुँचती है. बिहार ने बंगाल मे बीजेपी की विजय का रास्ता भी बना दिया है. मैं बंगाल के भाई और बहनोंको आश्वस्त करना चाहता हूँ कि अब बीजेपी आप के साथ मिलकर, पश्चिम बंगाल से भी जंगलराज को उखाड फेकेंगी. भाजप आघाडीला निवडून न दिल्यास बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येईल, अशी भीती मोदी-शहांनी आपल्या प्रत्येक सभेत मतदारांना घातली होती. आता याच मुद्द्यावरून भाजपा पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणूक लढवणार आहे. बिहारमध्ये जंगलराज निर्माण करणारे लालूप्रसाद यादव होते, लालू-राबडीदेवींच्या काळात बिहार जंगलराज बनले होते, सूर्यास्तानंतर कोणत्याही शहरात-गावात सामान्य माणसाला घराबाहेर पडणे मुष्किल होते, आया बहिणींना कुठेही सुरक्षा नव्हती. लुटमार, हत्या, खंडण्यांनी बिहार ग्रासले होते. कायदा सुव्यस्था ढासळली होती. थोडीशी चूक केलीत तर बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येईल अशी भीती मोदी-शहांनी बिहारच्या मतदारांना निवडणूक प्रचारात घातली होती. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव आणि त्यांचा पुत्र तेजस्वी यादव तसेच त्यांचा पक्ष राजद यांना भाजपाने खलनायक ठरवले होते.

आता पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांचा पक्ष तृणमूल काँग्रेसला भाजपाने खलनायक ठरवायला सुरूवात केली आहे. बिहारमध्ये जंगलराज विरोधात भाजपाने रान पेटवले होते. आता पश्चिम बंगालमध्ये जंगलराज म्हणून आतापासूनच रान पेटवायला सुरूवात झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी एप्रिल महिन्यात विधानसभा निवडणूक होणार आहे म्हणूनच बिहारमध्ये एनडीएचे सरकार स्थापन होताच भाजपाने बंगालच्या निवडणूक प्रचाराचे फटाके फोडायला सुरूवात केली आहे. पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या २९४ जागा आहेत. महाराष्ट्र आणि बिहार विधानसभेपेक्षा बंगालमध्ये आमदारांची संख्या जास्त आहे. कोविडनंतर २०२१ मधे झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाने मोठ्या जिद्दीने बंगालमध्ये निवडणूक लढवली, आपला पाया विस्तारला आणि भक्कम केला, पण ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसचे सरकार या राज्यात सलग तिसऱ्यांदा स्थापन झाले. पाच वर्षापूर्वी झालेल्या निवडणुकीत भाजपाने तृणमूल काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे केले होते. ममता बॅनर्जींनी रस्त्यावर संघर्ष करून तब्बल तीन दशकांची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची राजवट उद्धवस्त केली. आपला गाशा गुंडाळण्याची पाळी डाव्या पक्षांवर आणली. आता भाजपा ममता यांचे नेतृत्व आणि त्यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष यांना नेस्तनाबूत करण्याची तयारी करत आहे. गेल्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचे २१५ आमदार निवडून आले होते. तेव्हा भाजपाचे ७७ आमदार विजयी झाले होते. ज्या राज्यात भाजपाचा नामोनिशाणा नव्हता त्या राज्यात आता हजारो कार्यकर्ते भाजपाचे झेंडे हाती घेऊन रस्त्यावर उतरताना दिसत आहेत.

गेल्या निवडणुकीमध्ये तृणमूल काँग्रेसला ४८ टक्के तर भाजपाला ३८ टक्के मते मिळाली होती. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये या दोन पक्षांमध्येच चुरशीची टक्कर होणार हे निश्चित आहे. बिहारमध्ये भाजपाने नितीशकुमार यांना बरोबर घेऊन सत्ता पुन्हा काबीज केली. पश्चिम बंगालमध्ये भाजपाला मित्रपक्ष नाही, तिथे भाजपाला स्वत:च्या बळावर निवडणूक लढवावी लागणार आहे. बिहारमध्ये नितीशकुमारसारखा प्रादेशिक नेता भाजपाबरोबर होता, पश्चिम बंगालमध्ये असा एकही तगडा प्रादेशिक नेता भाजपाबरोबर नाही. म्हणूनच भाजपाला अचूक रणनिती आखून स्वत:च्या कार्यकर्त्यांची फौज घेऊन तृणमूल काँग्रेसशी लढावे लागणार आहे.

बिहारमध्ये भाजपा सत्तेत होती, पश्चिम बंगालमधे सत्ता मिळवण्यासाठी भाजपा गेली अकरा वर्षे ममता बॅनर्जींच्या विरोधात लढत आहे. पश्चिम बंगालमध्ये गुंडाराज आहे, कायदा सुव्यवस्था पार ढासळली आहे. सत्ताधारी आणि भाजपा कार्यकर्त्यांमधे सतत राडे चालू असतात.



बांगलादेशमधून मोठी घुसखोरी होत असून तृणमूल काँग्रेसचे त्यांना संरक्षण आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांनी बंगाल पोखरून काढला आहे. बंगाली भाषिक नागरिकाला या राज्यात जीव मुठीत धरून जगावे लागत आहे. या मुद्द्यांभोवती भाजपाने आपला प्रचार केंद्रीत केला आहे. बिहारप्रमाणे बंगालमध्येही जंगलराज येऊ द्यायचे नसेल तर कोलकत्याच्या सिंहासनावर भाजपाची सत्ता येणे गरजेचे आहे, असे भाजपा सांगत आहे. बिहारप्रमाणे बंगालमध्येही जंगलराजचा मुद्दा आक्रमकपणे मांडण्याची भाजपाने रणनिती आखली आहे.

जंगलराजचा मुद्दा निवडणुकीत केंद्रस्थानी आणला जात असताना ममता यांना अँटी इन्कबन्सीचा मोठा तडाखा येत्या निवडणुकीत बसला तर भाजपाचा सत्ता काबीज करण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो अशी समिकरणे मांडली जात आहेत. महाराष्ट्र, हरयाणा, दिल्ली , बिहारमध्ये मुसंडी मारल्यानंतर भाजपाने आपले सारे लक्ष्य आता पश्चिम बंगालवर केंद्रीत केले आहे. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्यामुळे भाजपाला मुस्लिम तसेच मागास आणि अतिमागास मतदारांनी मतदान केले होते. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला मुस्लिम मतदान एकगठ्ठा मिळते, हा आजवरचा अनुभव आहे. मुस्लिम मते भाजपाकडे वळवण्यासाठी भाजपाकडे या राज्यात एकही मित्र नाही. बिहारप्रमाणे बंगालमध्ये जातीय आणि धार्मिक समीकरण सारखे नाही. म्हणूनच भाजपाला तृणमूल काँग्रेसच्या विरोधात लढताना शिकस्त द्यावी लागणार आहे. एसआयआर (मतदार यादी सुधारणा) च्या विरोधात ममता सतत आवाज उठवत आहेत. बिहारमध्ये एसआयआरनंतर ६५ लाख मतदारांनी नावे वगळण्यात आली तसेच बंगालमधेही घडू शकते. पण तृणमूल काँग्रेसकडे मुस्लिम मतदारांची व्होट बँक व लढाऊ केडर ही दोन मजबूत साधने आहेत. बंगालचे राजकीय भविष्य हे पाटणा किंवा दिल्लीत लिहिले जात नाही. बंगालमध्ये भाजपाचे 'बटेंगे तो कटेंगे' धोरण स्वीकारले जाते का आणि बंगालच्या मतदारांचा विश्वास ममतादीदींवरच आहे का, याचा पडताळा तेथिल येत्या निवडणुकीमध्ये दिसून येईल.

# भारताची भीती दाखवून चीनचा शस्त्रपुरवठा

विश्वभ्रमण

**प्रा. जयसिंग यादव**

**ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरनंतर भारताशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या चीनचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, हे वारंवार सिद्ध झाले आहे. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान चीनची शस्त्रास्त्रे किती कुचकामी आहेत, हे जगाने पाहिले; परंतु त्यानंतर मुस्लिम राष्ट्रांना भारताची भीती दाखवून चीनने आपली शस्त्रास्त्रे विकण्याची सोय केली आहे. त्याचा परिणाम आशिया आणि मध्य पूर्वेतील व्यूहात्मक बाबींवर होणार आहे.**

दोन देशांमध्ये संघर्षाचे परिणाम जगाला भोगावे लागत असतात. अशा वेळी मध्यस्थी करून संघर्ष मिटवण्याची अपेक्षा असते. शेजारच्या देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायचा असतो; परंतु चीन नेमके याविरोधात वागत असतो. 'दोघात भांडण, तिसऱ्याचा लाभ' असे म्हटले जाते. भारत आणि पाकिस्तानमधील तीव्र संघर्षाकडे चीनने सुवर्णसंधी म्हणून पाहिले. अमेरिकेच्या अलिकडच्या एका अहवालानुसार, चीनने पाकिस्तानच्या सहकार्याने या संघर्षाचे रूपांतर त्यांच्या शस्त्रांच्या युद्धभूमी चाचणीत केले. त्यानंतर त्यांनी मुस्लिम देशांना शस्त्रे विकण्यासाठी या चाचणी निकालांचे अतिरंजित वर्णन केले. अहवालात म्हटले आहे, की चीनने केवळ जमिनीवरच आपल्या शस्त्रांची चाचणी केली नाही, तर पाश्चात्य देशांविरुद्ध शस्त्रास्त्रांचा



बाजार मजबूत करण्यासाठी जगभरात आक्रमकपणे त्यांचा प्रचार केला. मे २०२५ च्या संघर्षादरम्यान, चीनच्या अनेक प्रगत शस्त्रांचा वापर प्रत्यक्ष युद्धात पहिल्यांदाच करण्यात आला. यामध्ये एचक्यू-९ हवाई संरक्षण प्रणाली, पीएल-१५ हवेतून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आणि जे-१०सी लढाऊ विमान यांचा समावेश आहे. भारतासमोर चीनची अनेक शस्त्रे निष्प्रभ ठरली; परंतु त्याची जगभर चर्चा होऊ नये, म्हणून आपली शस्त्रास्त्रे किती परिणामकारक ठरली, याचा आक्रमक प्रचार करून चीनने शस्त्रास्त्रांची जागतिक बाजारपेठ मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी पाकिस्तानचा उपयोग करून घेतला. पाकिस्तानने मुस्लिम राष्ट्रांचे मत परिवर्तन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

पाकिस्तान-भारत संघर्षावेळी चीनची आधुनिक शस्त्रे सक्रिय लढाईत तैनात करण्याची ही पहिलीच वेळ होती आणि चीनने संपूर्ण संघर्षाचा वापर एक प्रकारचा 'फील्ड एक्सपिरीमेंट' म्हणून केला. अहवालानुसार, चीनने पाश्चात्य शस्त्रांविरुद्ध आपल्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्करी यशाचा फायदा घेतला. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी संसदेत दावा केला, की पाकिस्तानी जे-१० सी विमानांनी राफेलसह भारतीय हवाई दलाची अनेक विमाने पाडली. अहवालात म्हटले आहे, की पाकिस्तानचे हे दावे अतिशयोक्तीपूर्ण आहेत; परंतु चीनी दूतावासांनी जगभरात शस्त्रास्त्र विक्री वाढवण्यासाठी हे दावे केले. चीनने 'सोशल मीडिया'वरील बनावट खात्यांद्वारे 'एआय' व्युत्पन्न प्रतिमा आणि व्हिडीओ-गेम ग्राफिक्स भारतीय विमानांचे अवशेष म्हणून प्रसारित केले. फ्रेंच राफेलची प्रतिमा खराब करण्यासाठी आणि स्वतःच्या जे-३५ लढाऊ विमानांचा प्रचार करण्यासाठी याचा वापर करण्यात आला होता. फ्रेंच गुप्तचर यंत्रणेचा हवाला देत, अहवालात दावा केला गेला, की चीनच्या प्रचार मोहिमेनंतर इंडोनेशियाने राफेल खरेदी प्रक्रिया थांबवली. अहवालात म्हटले आहे, की पाकिस्तान चीनी शस्त्रांवर खूप अवलंबून आहे. जूनमध्ये चीनने पाकिस्तानला ४० जे-३५ लढाऊ विमाने, केजे-५०० आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली विकण्याची ऑफर दिली. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' च्या मते, गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के शस्त्रे चीनमधून आली आहेत.

मध्य पूर्वेला चीनची वाढती शस्त्रास्त्र निर्यात चीनच्या व्यापक ऊर्जा सुरक्षेच्या प्रयत्नात रुजली आहे आणि ही प्रवृत्ती उदयोन्मुख बहुध्रुवीय जागतिक संरचना दर्शवते. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत एक प्रमुख खेळाडू म्हणून चीनचा उदय 'पीपल्स लिबरेशन आर्मी' (पीएलए) च्या क्षमता वाढवण्याच्या प्रेरणेने झाला. परिणामी, त्यांनी त्यांच्या संरक्षण उद्योगात सुधारणा केल्या आहेत आणि त्यांची संरक्षण उपकरणे सुधारण्यासाठी लष्करी खर्च सातत्याने वाढवला आहे. शस्त्रास्त्र बाजारपेठेतील चीनची भूमिकादेखील बदलत्या सुरक्षा वातावरणाची जाणीव करून देते. २०१२ ते २०१६ दरम्यान जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत चीनचा वाटा ३.८ टक्क्यांवरून ६.२ टक्क्यांपर्यंत वाढला. २०१६-२०२० या काळात तो ५.२ टक्क्यांपर्यंत घसरला असला, तरी चीन जगातील पाचव्या क्रमांकाचा शस्त्रास्त्र निर्यातदार राहिला आहे. अमेरिका आणि रशियाच्या तुलनेत त्याचा वाटा माफक असला, तरी नवीन तंत्रज्ञानासह नवीन बाजारपेठेत प्रवेश करण्यास सज्ज आहे. 'सेंटर फॉर नेव्हल ॲनॅलिसिस'च्या विश्लेषणानुसार चीनने शस्त्रास्त्रनिर्यातीत एक स्थान निर्माण केले आहे. २०२० च्या अमेरिकन संरक्षण विभागाच्या अहवालानुसार, टनेजच्या बाबतीत चीन जगातील अव्वल जहाज उत्पादक देश आहे. चीन आघाडीवर असणारे आणखी एक क्षेत्र म्हणजे सशस्त्र ड्रोन. (ज्याला मानवरहित हवाई वाहने, यूएव्ही असेही म्हणतात). २०१८ पर्यंत चीनने जगभरातील १० हून अधिक देशांना जड आणि सशस्त्र यूएव्हीज निर्यात केले होते. चीनने पाकिस्तानी हवाई दलासह संयुक्तपणे चीनी विंग लूंग २ ड्रोन तयार करण्यास सहमती दर्शविली आहे.

२०१३ च्या 'एसआयपीआरआय' अहवालानुसार चीन लहान शस्त्रे आणि हलक्या शस्त्रांचादेखील एक प्रमुख निर्यातदार आहे. चीन शस्त्रास्त्रे खरेदी करणाऱ्या देशांना लवचिक 'पेमेंट स्ट्रक्चर्स'देखील ऑफर करतो. ते विकसनशील देशांसाठी आकर्षक आहे. शिवाय लष्करी उपकरणांच्या स्त्रोतांमध्ये विविधता आणू इच्छिणाऱ्या देशांनाही चीनी शस्त्रे चांगली वाटतात. चीनी उपकरणांची गुणवत्ता आणि टिकाऊपणाबद्दल साशंकता असली, तरी पैसे, सवलती आणि संबंधित देशांमधील राज्यकर्त्यांना लाच देऊन खरेदी करणे भाग पाडले जाते. चीनला प्रामुख्याने शस्त्रास्त्रनिर्यातीच्या राजकीय नव्हे, तर व्यावसायिक फायद्यांमध्ये रस आहे; शिवाय हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की या व्यवहारातले आर्थिक फायदे खूप मोठे असून शस्त्रास्त्र निर्यातदार असण्याचा प्रभाव, विशेषतः कमकुवत देशांवर राहणारा वरचष्मा तितकाच शक्तिशाली आहे. चीनची व्यापक मध्य पूर्व रणनीती अशा उद्दिष्टांना समर्थन देते. २०१६ मध्ये त्यांनी अरब पॉलिसी पेपर जारी केला आणि मध्य पूर्वेला आपल्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'चा एक महत्त्वाचा भाग बनवले. मध्य पूर्वेतील अस्थिर प्रादेशिक परिस्थितीमुळे या प्रदेशातील देशांसोबत चीनच्या ऊर्जा सहकार्याला धोका वाढतो. हे अशा वेळी घडत आहे, जेव्हा अमेरिका मध्य पूर्वेवरील आपले लक्ष कमी करुन इंडो-पॅसिफिक क्षेत्रावर पुन्हा लक्ष केंद्रित करत आहे.

मध्य पूर्वेमध्ये, चीनी ड्रोन्स विशेष लोकप्रिय आहेत. इजिप्त, इराक, जॉर्डन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या सर्वांना विंग लून आणि सीएच-४ ड्रोनसह सशस्त्र चीनी यूएव्ही मिळाले आहेत. अशा प्रकारे चीन मध्य पूर्वेतील यूएव्ही शस्त्रास्त्रांच्या शर्यतीला चालना देत आहे. शिवाय, अमेरिकेने मध्य पूर्वेतील अरब देशांना सशस्त्र ड्रोन विकण्यासाठी प्रतिबंधात्मक निर्यात धोरण लागू केले आहे. चीनने या संधीचा फायदा घेत या प्रदेशात आपली उपस्थिती वाढवली आहे. अमेरिकेने जॉर्डनला प्रीडेटर एक्सपी ड्रोन देण्यास नकार दिला. त्यानंतर हा देश सीएच-४ बी ड्रोन खरेदी करण्यासाठी चीनकडे वळला. इराकनेही अशीच भूमिका घेतली. अमेरिकेचा दृढ मित्र असलेला सौदी अरेबिया हा चीनी शस्त्रास्त्रांच्या सर्वोच्च आयातदारांपैकी एक आहे. सौदी अरेबियाने चीनी डीएफ-२१ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि विंग लूंग ड्रोन खरेदी केले आहेत. तसेच चीनने सौदी अरेबियामध्ये संयुक्तपणे सीएच ड्रोन तयार करण्याचा करार केला आहे. सौदी अरेबिया सध्या चीनला होणाऱ्या तेलाचा सर्वोच्च पुरवठादार आहे. या वस्तुस्थितीवर आधारित हे संबंध आहेत. इराण हा चीनी शस्त्रास्त्रनिर्यातीचा पहिला खरेदीदार होता. आतापर्यंत चीनने इराणला सिल्कवर्म आणि सी-८०२ क्षेपणास्त्रे विकली आहेत. ही दोन्ही जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आहेत. शिवाय, इराणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे चीनी डिझाइनवर आधारित विकसित केली गेली आहेत. चीनी तंत्रज्ञांनी या विकासात मदत केल्याचे वृत्त आहे.




**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक

# गोदातीर समाचार च्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा




# रेणुकाई

## क्रिटीकल केअर सेंटर & मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

कॅथ लॅब- अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी | रेणुकाई रिसर्च सेंटर

- महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)
- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY)
- लेबर कर्मचारी विमा योजने अंतर्गत मोफत उपचार

**बाफना रोड, एल.आय.सी., ऑफिसच्या पाठीमागे, महाराणा प्रताप चौक जवळ, नांदेड.**
**02462-222666 9767284883, 9921784992, 9404617666, 9730712666**

- संचालक
  डॉ. निलेश जयराम बास्टेवाड
  M.B.B.S., M.D. Medicine (Pune) Fellowship In GI Endoscopy (Delhi) CCGDM, Certified For Diabetes Management (Cleveland Clinic) USA
- कार्डीयोलॉजी विभाग
  डॉ. सुनील कांबळे
  M.B.B.S., MD, Medicine, DNB Cardiology (हृदयरोग तज)
- प्लास्टिक सर्जरी विभाग
  डॉ. सुशांत चौधरी
  M.B.B.S. MS MCH Plastic surgery
- अतिदक्षता व मेडिसीन विभाग
  डॉ. निलेश जयराम बास्टेवाड
  M.B.B.S., M.D. Medicine (Pune) Fellowship In GI Endoscopy (Delhi) CCGDM, Certified For Diabetes Management (Cleveland Clinic) USA
  डॉ. गजानन अल्पेवाड
  M.B.B.S. MD Medicine
  डॉ. हेमंत लखमावाड
  M.B.B.S. MD Medicine
- स्त्री रोग विभाग
  डॉ. जयराम तुकाराम बास्टेवाड
  MBBS DGO
  डॉ.सौ.सि.जे.बास्टेवाड
  MBBS DGO
  डॉ. सौ. नेहा बास्टेवाड
  MBBS DGO
- कर्करोग विभाग
  डॉ. माधव फोले
  MBBS, MS. DNB Oncology
  डॉ. प्रिती कदम
  Consultant Medical Oncologist M.B.B.S. (SCGMC, Nanded) M.D. General Medicine DNB Super specialty in Medical Oncology (Delhi)
- नॅफ्रॉलॉजी विभाग
  डॉ. विजय मैदपवाड
  M.B.B.S. MD Medicine. DNB (Nephrology).
- अस्थिरोग व स्पाईन सर्जरी विभाग
  डॉ. विलास मुसळे
  M.B.B.S, MS (Ortho) Nagpur, Fellow in Spine Surgery
- युरोलॉजी व सर्जरी विभाग
  डॉ. राजीव राठोड M.B.B.S, DNB Surgery DNB Urology FMAS
  डॉ. संतोष अंगरवार
  M.B.B.S, MS. General Surgery
- न्यूरो सर्जरी विभाग
  डॉ. तुषार तानाजीराव सुरोशे
  M.B.B.S.M.S. MCh Neurosurgery (Mumbai)
- भूल तज विभाग
  डॉ. राहुल थोरात
  M.B.B.S. MD Anesthesia
  डॉ. श्रीहरी गुट्टे
  M.B.B.S. MD Anesthesia
- पॅथॉलॉजी विभाग
  डॉ. किरण खैराटकर
  M.B.B.S, MD Pathology

## प्रत्येक रुग्ण महत्त्वाचा... रुग्ण तुमचा, काळजी आमची !


Delux Room


Consulting Room


ICU


Laser Machine for Stone Surgery


Moduler Operation Theater


Suit Room

### INSURANCE

- Star Health • महावितरण • महापारेषण • SBI General • ESIC
- Medi-assist • Care insurance • लेबर विभाग आणखी 33 इन्शुरन्स सोबत Tie up आहे

### अत्याधुनिक सेवा

- Delux Room • Suit Room • Special Room • प्रशस्त सेंन्ट्रल AC ICU
- 100 बेड रुग्णालय • लेबर रुम • Modular Operation Theater

## उपलब्ध सुविधा

- सर्व सुविधांनी सुसज्य 100 बेडेड हॉस्पिटल
- प्रशस्त 28 बेडेड (आय.सी.यु.) अतिदक्षता विभाग
- स्वतंत्र मेडिकल, सर्जिकल स्त्रीरोग व सायकॅट्रीस्ट (मनोपचार)आय.सी.यू.
- मेंदूवरचे मेंदूज्वर आजार, मज्जासंस्थेचे आज इ. वर उपचार
- अपघातातील रुग्णांवर विशेष काळजी घेण्याकरिता अत्याधुनिक यंत्रसाम्रगी
- विषबाधा व सर्पदंश रुग्णांचे निदान व उपचार
- इन्व्हेजीव व नॉन इन्व्हेजीव व्हेंटिलेटर्स
- सेंट्रल ऑक्सीजन व सक्शन सुविधा
- किडणीच्या आजारा सबंधीत तपासणी
- 24 तास फिजीशयन उपलब्ध
- श्वसनविकार व छातीच्या रोगांचे निदान व उपचार
- मधुमेहाचे (Diabetes) निदान व उपचार
- रक्तदाब, धायरॉईड निदान व उपचार
- नांदेड मध्ये प्रथम मुतखडया वरील ऑपरेशन साठी अत्याधुनिक दुर्बीण व लेसर सुविधा




- अतिगंभीर व गुंतागुंतीच्या विविध शस्त्रक्रिया
- अतिजोखीम गर्भवती रुग्णावरील शस्त्रक्रिया
- वय जास्त असलेल्या रुग्णावरील शस्त्रक्रिया
- अतिजोखीम हृदय व श्वसन विकार असलेल्या रुग्णावरील शस्त्रक्रिया
- वेदना विरहित प्रसुती
- मेंदु व मनक्यावरील शस्त्रक्रिया
- सेंट्रल एयर कंडिशन्ड विथ लॅमीनर एयर फ्लो विथ 0.3
- मायक्रो हेपा फिल्टर (इंफेक्शनाची शक्यता 0%)
- सि.आर्म, हायड्रोलिक टेबल
- जॉइंटलेस फायबर ग्लास-ओ.टी. (महाराष्ट्रात पहिले)
- अत्याधुनिक व्हेंटिलेटर, सेंटरलाईज्ड ऑक्सीजन सक्शन सुविधा
- सेपरेट ओ.टी. कॉम्प्लेक्स
- डायलेसिस विभाग
- कैथ लॅब विभाग



- अतिदक्षता विभाग
- क्रिटिकल केअर युनिट
- कार्डिओलॉजी विभाग
- न्यूरोलॉजी व न्युरोसर्जरी विभाग
- मेडिसिन विभाग
- स्त्रीरोग विभाग
- कर्करोग विभाग
- जनरल सर्जरी व युरोलॉजी विभाग
- प्लास्टिक सर्जरी विभाग
- अस्थिरोग व स्पाईन सर्जरी विभाग
- Oral & Maxillofacial Surgery
- त्वचारोग विभाग
- फिजिओथेरपी व रिहॅबिलीटेशन विभाग
- डायग्नोस्टिक विभाग
- रेडियलॉजी व पॅथॉलॉजी विभाग
- कान, नाक, घसा, विभाग

24 HOUR SERVICE

# सावकारी फास घट्ट घट्ट का होतोय?



**नाबार्डच्या अहवालातील पहिली महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागात 54.5 टक्के कुटुंबे आता केवळ औपचारिक स्रोतांद्वारेच (प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी संस्था, सूक्ष्म वित्त संस्था इ.) कर्ज घेत आहेत. हा टक्का सर्वेक्षण सुरू झाल्यापासूनचा सर्वाधिक आहे. औपचारिक स्रोतांतून कर्ज देताना काही ठरावीक सरकारी नियम व व्याजदर लागू असतात, त्यामुळे शेतकऱ्यांना शोषणापासून संरक्षण मिळते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भारतात औपचारिक कर्ज व्यवस्थेत सुधारणा झाली असली, तरी अजूनही अनेक कुटुंबे सावकार, नातेवाईक, मित्र व इतर अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहेत. सुमारे 22 टक्के ग्रामीण कुटुंबे पूर्णपणे सावकारांवर आणि अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहेत. या वर्गाकडून अजूनही 17-18 टक्क्यांपेक्षा अधिक व्याजदराने कर्ज दिले जाते. अहवालात असेही नमूद आहे की 23.5 टक्के कुटुंबे औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही स्रोतांवरून कर्ज घेतात. तथापि, ग्रामीण भागातील औपचारिक कर्ज व्यवस्थेने गेल्या काही वर्षांत निश्चितच चांगली प्रगती केली आहे.**

**वेदांत गाडे**

अलीकडेच राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) प्रसिद्ध केलेल्या ग्रामीण धारणा सर्वेक्षण अहवाल 2025 मध्ये ग्रामीण भारतातील कर्ज वितरण आणि त्यासंबंधी अडचणींवर काही अतिशय महत्त्वाच्या बाबी नमूद झाल्या आहेत.

विविध अहवालांनुसार किसान क्रेडिट कार्ड (केसीसी), कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड, सहकारी संस्था, स्वयं सहाय्य गट, ग्रामीण बँकिंग व्यवस्था इत्यादींच्या माध्यमातून शेतकऱ्यांना औपचारिक कर्जांशी जोडण्यात यश आले आहे. या उपाययोजनांमुळे ग्रामीण लोकांची क्रयशक्ती वाढली, डिजिटल व्यवहारात वाढ झाली, खप वाढला, जीवनमान सुधारले आणि पूरक उत्पन्नाचे स्रोत निर्माण झाले. याशिवाय 2019 मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजना ही देशातील कोट्यवधी लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधारस्तंभ ठरली आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत 9.7 कोटींहून अधिक शेतकऱ्यांना 20 हप्त्यांमध्ये 3.9 लाख कोटी रुपये थेट लाभांतर्गत (डीबीटी) स्वरूपात देण्यात आले आहेत. यामुळे त्यांना शेतीच्या खर्चाचा मोठा भार कमी झाला आहे. त्याचप्रमाणे एप्रिल 2020 मध्ये सुरू झालेल्या प्रधानमंत्री स्वामित्व योजनेअंतर्गत ग्रामीण नागरिकांना त्यांच्या जमिनीचा कायदेशीर हक्क मिळवून देण्यात येत असून, त्यामुळे त्यांचे आर्थिक सशक्तीकरणाचे नवे पर्व सुरू झाले आहे. परंतु चिंताजनक बाब म्हणजे अजूनही 22 टक्के ग्रामीण लोकसंख्या सावकार आणि अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लहान शेतकऱ्यांची आर्थिक सुरक्षा धोक्यात येत आहे. जेव्हा या शेतकऱ्यांना उत्पन्नातील अस्थिरता, ऋतुमानिक जोखमी आणि सरकारकडून अपुऱ्या निधी हस्तांतरणाची समस्या भेडसावते, तेव्हा ते सावकारांच्या दाराशी मदतीसाठी पोहोचतात. यासाठी त्यांना प्रचंड व्याजदराचा सामना करावा लागत असला तरी त्याशिवाय दुसरा पर्यायच या शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसतो.

## व्याजाचा भार हलका करण्यासाठी नवे कर्ज

अनेकदा सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय कारणे देखील सावकारांकडून कर्ज घेण्याला प्रवृत्त करतात. काही वेळा शेतकरी औपचारिक स्रोतांद्वारे कर्ज घ्यायचे ठरवतात, पण कागदपत्रांची कमतरता, हमीदारांचा अभाव आणि इतर कठीण अटींमुळे ते मागे हटतात. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या (एनएसओ) अहवालानुसार, सुमारे 50 टक्के कृषी कुटुंबे कर्जबाजारी आहेत. त्यांना संस्थात्मक बँकांबरोबरच गैरसंस्थात्मक स्रोतांवर म्हणजे सावकार व नातेवाईकांवर अवलंबून राहावे लागते. अनेकदा शेतकऱ्यांना जड व्याजामुळे मूळ रक्कम फेडता येत नाही आणि व्याजाचा भार कमी करण्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागते. अशा रीतीने ते सावकारांच्या कर्जजाळ्यात अडकत जातात.

## धोरणात्मक उपाययोजनांची गरज

गेल्या दशकात गावांमध्ये बँक शाखांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 2024-25 च्या वार्षिक अहवालानुसार, मार्च 2010 मध्ये ग्रामीण भागात 33,378 बँक शाखा होत्या, तर डिसेंबर 2024 पर्यंत हा आकडा 56,579 वर पोहोचला आहे. तसेच सहकारी संस्थांचेही नवे जाळे उभे राहिले आहे. मात्र, सावकारांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी फक्त शाखा वाढविणे पुरेसे नाही. नव्या रणनीतींनुसार छोटे व अल्पमुदतीचे कर्ज प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे. तसेच ग्रामीण भागातील लघुउद्योग आणि उद्योजकांना विश्वासार्ह संस्थात्मक आर्थिक सेवा मिळाव्यात यासाठी ठोस धोरणात्मक उपाययोजना कराव्या लागतील.

# शाळा श्रेष्ठ की क्लासेस?



**आजकाल विद्यार्थी शाळेत, महाविद्यालयात केवळ औपचारिकता म्हणून प्रवेश घेतात आणि शिक्षणासाठी मात्र खासगी शिकवणुकीला जातात. पालकांचीही हीच धारणा झालेली आहे. त्यामुळे शिक्षणावर गडद काळे ढग निर्माण होत आहेत.**

**प्रा. अमोल दंडवते**

आज शिक्षण हा एक व्यवसाय बनला आहे आणि त्याचा सर्वात ठळक चेहरा म्हणजे खासगी शिकवण्यांचा वाढता बाजार. एकेकाळी शिक्षण हे समाजसेवेचे, ज्ञानदानाचे व्रत मानले जात असे; परंतु आज या क्षेत्रात आर्थिक व्यवहारांचा आणि स्पर्धेचा प्रभाव अधिक दिसू लागला आहे. पालकांच्या महत्त्वाकांक्षा, विद्यार्थ्यांवरील स्पर्धेचा ताण आणि शालेय शिक्षणावरील घटता विश्वास या सर्व गोष्टींनी मिळून खासगी शिकवण्यांचे जाळे झपाट्याने पसरले आहे. या शिकवण्या आता केवळ पूरक शिक्षणाचे साधन राहिलेल्या नाहीत, तर त्या स्वतंत्र उद्योगसाखळी बनल्या आहेत. पूर्वी विद्यार्थी शाळेतील शिक्षकांनी दिलेले धडे आत्मसात करूनच उत्तम गुण मिळवत असत. मात्र आज शाळेत जाऊनही विद्यार्थी खासगी क्लासशिवाय अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिक्षकांच्या मनावर परीक्षा निकालांचा दबाव आहे, तर पालकांच्या मनात स्पर्धात्मक परीक्षांचे भय. परिणामी शाळा ही फक्त उपस्थिती नोंदविण्याचे केंद्र राहिली असून, खऱ्या अर्थाने शिक्षणाचा पाया 'क्लासेस'मध्ये घडू लागला आहे! खासगी शिकवण्यांचा हा उद्योग इतका फोफावला आहे की त्याला आता 'एज्युकेशन इंडस्ट्री' असेच म्हणावे लागेल. अनेक ठिकाणी मोठमोठ्या कोचिंग संस्थांनी भव्य इमारती उभारल्या आहेत. तेथील शुल्क हे गरीब पालकांच्या आवाक्याबाहेर आहे. शहरातील प्रत्येक गल्लीबोळात 'टॉपर क्लासेस', 'रेस इन्स्टिट्यूट', 'अमुक अमुक अकॅडमी' अशी नावं आपल्याला दिसतात. त्यांचा उद्देश विद्यार्थ्याला घडवणे कमी आणि मार्केटमध्ये आपली ओळख निर्माण करणे अधिक आहे. शिक्षण क्षेत्रातील स्पर्धेने शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनाही थकवून टाकले आहे. या शिकवण्या विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या नावाखाली एका धावपळीच्या चक्रात ओढतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शाळा, त्यानंतर कोचिंग क्लासेस आणि मग गृहपाठ अशी विद्यार्थ्यांची दिनचर्या बनली आहे. खेळ, वाचन, चिंतन, सर्जनशीलता या सगळ्याचा बळी या शैक्षणिक शर्यतीत जात आहे. पालकांची मानसिकता अशी झाली आहे की, क्लासेसला घातलं म्हणजे जबाबदारी संपली. त्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाऐवजी फक्त गुणांवर लक्ष केंद्रित झाले आहे. या परिस्थितीत शाळेतील शिक्षकांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. काही वेळा शिक्षक स्वतः क्लासेस घेत असल्याने विद्यार्थ्यांचा विश्वास द्विधा झाला आहे. शाळेत शिकवताना शिक्षकांना विद्यार्थ्यांचे लक्ष मिळत नाही, कारण तेच विद्यार्थी त्यांच्याकडूनच सायंकाळी क्लासेसमध्ये अधिक पैसे देऊन शिकतात. परिणामी शालेय शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षकांविषयी आदर या दोन्ही गोष्टी ढासळत चालल्या आहेत. शिक्षणसंस्थांनीही अनेकदा या प्रवाहास आळा घालण्याऐवजी त्यास अप्रत्यक्ष मान्यता दिली आहे.

खासगी शिकवण्या या आज शिक्षणाचा पर्याय नाहीत, तर शिक्षणावरचं संकट बनल्या आहेत. समाजातील आर्थिक विषमता वाढवत आहेत. श्रीमंत पालकांना दर्जेदार कोचिंग मिळते, तर गरीब पालकांचा मुलगा त्या स्पर्धेत मागे राहतो. त्यामुळे शिक्षणातील समता, समान संधी आणि सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेचा पाया हादरतो आहे. हळूहळू ही परिस्थिती समाजात शैक्षणिक अन्याय निर्माण करत आहे. या विकृतीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने काही ठोस उपाययोजना तातडीने राबविणे गरजेचे आहे. सर्वप्रथम, शालेय शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक साधने आणि मूल्यमापन पद्धतीमध्ये क्रांतिकारी बदल घडवणे आवश्यक आहे. शाळांमध्ये प्रत्यक्ष अध्यापनाचे आकर्षक आणि प्रयोगशील वातावरण निर्माण केले पाहिजे, ज्यामुळे विद्यार्थी शाळेतच आनंदाने शिकतील व बाह्य शिकवणीची गरज भासणार नाही.

## शाळा-क्लासेस यांच्यातील संबंध तोडा

शासनाने खासगी शिकवण्यांचे नियमन करण्यासाठी एक स्वतंत्र कायदा व नियंत्रण संस्था निर्माण करावी, ज्यामार्फत अशा संस्थांच्या शुल्क, वेळापत्रक आणि गुणवत्तेवर देखरेख ठेवली जाईल. प्रत्येक विद्यार्थी वर्गाच्या बाहेर शिकवणी घेण्यास भाग पाडला जाणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. शैक्षणिक व्यवस्थेत पारदर्शकता आणून, शाळा- क्लासेस यांच्यातील संबंध तोडले पाहिजेत. शिक्षकांना क्लासेसच्या आश्रयापासून मुक्त केले पाहिजे. शिक्षकांना 'अध्यापनाची आवड' हीच त्यांची खरी संपत्ती वाटली पाहिजे, 'अतिरिक्त कमाईचा मार्ग' नव्हे. पालकांनीसुद्धा आपली मानसिकता बदलली पाहिजे. मुलावर केवळ गुणांच्या अपेक्षेचा ताण देण्याऐवजी त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. अभ्यास म्हणजे स्पर्धा नाही, तर आत्मविकासाचा प्रवास आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे. एकंदर पाहता, खासगी शिकवण्याचा वाढता बाजार ही केवळ शिक्षणातील समस्या नसून, ती संपूर्ण समाजाच्या मूल्यसंस्थेचे प्रतिबिंब आहे. शिक्षण हे व्याप नसून संस्कार घडविण्याचे माध्यम आहे, हे आपण विसरलो आहोत. आज पुन्हा एकदा शिक्षण क्षेत्रात मूल्य, संस्कार आणि सार्वजनिक जबाबदारी या तिन्ही गोष्टींचे पुनरुज्जीवन करणे ही काळाची गरज आहे. ज्याप्रमाणे 'ज्ञान विकता' येत नाही, तसेच 'शिक्षण खरेदी' करता येत नाही. ज्ञानाचा खरा प्रकाश फक्त त्या शिक्षकाकडून पसरतो, जो विद्यार्थ्याला शिकवण्यात नव्हे तर घडवण्यात आनंद मानतो. म्हणूनच आजच्या परिस्थितीत सर्वांनी मिळून विचार करणे आवश्यक आहे, आपण शिक्षण देत आहोत की फक्त गुणांची विक्री करीत आहोत?



# ग्लोबल वॉर्मिंगमुळे चक्रीवादळे बनताहेत धोकादायक



**वारंवार येणाऱ्या वादळांचे कारण म्हणजे मानवाकडून निसर्गाच्या अंदाधुंद शोषणामुळे होणारे हवामान बदल होय. नासाने इशारा दिला की, पुढे चक्रीवादळे अधिक धोकादायक बनतील.**

**श्याम साने**

यंदाचे वर्ष हे ज्या विविध कारणांमुळे गाजणार आहे किंवा त्याची नोंद इतिहासात होणार आहे, त्यामध्ये चक्रीवादळांचा समावेश अग्रस्थानी करावा लागणार आहे. अलीकडेच 'मेलिसा' या महाभयंकर चक्रीवादळाने कॅरिबियन देश जमैकासह अन्य देशांमध्ये हाहाकार उडवला. या वादळाचा वेग ताशी 282 किलोमीटर इतका असल्याचे समोर आले आहे. यूएस नॅशनल हरिकेन सेंटर (एनएचसी)च्या म्हणण्यानुसार, 2005 मध्ये प्वेर्टो रिकोमध्ये आलेल्या 'कॅटरिना' आणि 2017 मध्ये न्यू ऑर्लीन्समध्ये आलेल्या 'मारिया'पेक्षा मेलिसा जास्त धोकादायक होते. अवघ्या 24 तासांतच ते पाचव्या श्रेणीचे चक्रीवादळ बनले. श्रेणी 5 ही चक्रीवादळाची सर्वात धोकादायक श्रेणी मानली जाते. 2025 मध्ये आतापर्यंत या प्रकारची पाच चक्रीवादळे नोंदवली गेली आहेत. यामध्ये 'रागासा' या फिलीपाइन्समध्ये आलेल्या चक्रीवादळाचा वेग ताशी 262 किमी इतका होता; तर अमेरिकेतील एरीन चक्रीवादळाचा 260, ऑस्ट्रेलियात आलेल्या एरोलचा 260 किमी, बर्मुडावर आलेल्या हमबर्टोचा 241 किमी इतका वेग होता. दुसरीकडे, यादरम्यान आंध्रप्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगाल या तीन राज्यांवर 'मोंथा' या चक्रीवादळामुळे आलेली नवी नैसर्गिक आपत्ती आपण नुकतीच पाहिली. बंगालच्या उपसागरात सतत मोठ्या लाटा आणि वादळी प्रवाह निर्माण होत असतात. यामागचे प्रमुख कारण म्हणजे या उपसागराची ट्रॅपिझोडियल स्थिती हे असून ती वायुमंडलीय हालचालींना एकाच ठिकाणी केंद्रित करते. बंगालच्या उपसागराचं तापमान अरबी समुद्रापेक्षा जास्त असतं, म्हणून इथं वादळं जास्त बनतात. अलीकडच्या काळात हवामान बदलांमुळे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर म्हणजेच अरबी समुद्रातही वारंवार आणि अधिक शक्तिशाली चक्रीवादळं तयार होऊ लागली आहेत.

स्टॉर्म म्हणजे वातावरणातील एक प्रकारचा अस्थिरपणा जो प्रामुख्याने वेगवान वाऱ्यांच्या स्वरूपात दिसून येतो आणि त्याच्यासोबत पाऊस, बर्फ किंवा गारांचा वर्षाव होतो. जेव्हा असे वादळ जमिनीवर तयार होतात, तेव्हा त्यांना सामान्य वादळ म्हटले जाते. परंतु जेव्हा हे वादळ समुद्रातून उठतात, तेव्हा त्यांना हरिकेन म्हणतात. हरिकेन हे सामान्य वादळांपेक्षा अधिक प्रचंड आणि धोकादायक असतात. हरिकेन, सायक्लोन आणि टायफून हे तिन्ही एकाच प्रकारच्या वातावरणीय घटनेची वेगवेगळी रूपे आहेत. फक्त प्रदेशानुसार त्यांची नावं बदलतात. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिका आणि कॅरिबियन बेटांमध्ये तयार होणाऱ्या समुद्री वादळांना हरिकेन म्हणतात. फिलिपाइन्स, जपान आणि चीन या प्रदेशांमध्ये येणाऱ्या समुद्री वादळांना टायफून म्हणतात; तर ऑस्ट्रेलिया आणि हिंदी महासागर म्हणजेच भारताच्या आसपासच्या प्रदेशात तयार होणाऱ्या समुद्री वादळांना सायक्लोन म्हटले जाते.

अटलांटिक महासागर आणि उत्तर पश्चिम पॅसिफिक महासागर येथे तयार होणाऱ्या वादळांना हरिकेन म्हणतात. उत्तर पश्चिम प्रशांत महासागरात तयार होणाऱ्या वादळांना टायफून म्हणतात, तर दक्षिण प्रशांत महासागर तसेच हिंद महासागरात तयार होणाऱ्या वादळांना सायक्लोन म्हटले जाते. भारताच्या आसपास येणाऱ्या समुद्री वादळांना सामान्यतः सायक्लोन असे नाव दिले जाते. टॉर्नेडो हे देखील अतिशय वेगवान आणि धोकादायक वादळ असते; परंतु ते सायक्लोन नसतात, कारण टॉर्नेडो बहुतेक वेळा जमिनीवरच तयार होतात. जगात सर्वाधिक टॉर्नेडो अमेरिकेत आढळतात. गतवर्षी मे महिन्यात आलेल्या रामल चक्रीवादळाचा वेग ताशी 110 किलोमीटर होता. त्यानंतर ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये 'आसना' वादळाने बंगालच्या उपसागरात खळबळ उडवून दिली होती. दानाने ऑक्टोबरमध्ये कहर केला होता. चक्रीवादळांमुळे होणारे नुकसान हे प्रचंड मोठे असण्याची भीती असते. गतवर्षी देशात विविध चक्रीवादळांमुळे 278 लोकांचा मृत्यू झाला होता आणि सुमारे 5,334 कोटी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याची नोंद झाली. जीवित व वित्तहानीचा हा आकडा प्रत्यक्षात अधिक असू शकतो. आभाळ एकदम भरून येणे, सोबत विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट होऊन पाऊस सुरू होणे ही या वादळाची लक्षणे होत. ही वादळे समुद्रात निर्माण होत असल्याने वाऱ्याचा तडाखा समुद्र किनाऱ्याजवळच्या प्रदेशाला प्रामुख्याने बसतो. आभाळ भरून आल्याने हवाई वाहतूक आणि समुद्रात लाटा उसळल्याने जलवाहतूक बंद पडते. काही वेळा जहाजे उलटतात, बुडतात. वादळ आणि पूर ही संकटे कमी झाल्यावर पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण होतात. चक्रीवादळांदरम्यान अतिवृष्टीमुळे निर्माण होणारे दलदलीचे क्षेत्र, जोरदार वादळामुळे नष्ट होणारी नैसर्गिक जंगले आणि हिरवळ, प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाची पडझड यामुळे संपूर्ण निसर्गाचा समतोल बिघडून जातो. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे किनारी भागात खारे पाणी लोकवस्त्यांमध्ये शिरते. तसेच शेतजमिनीवर चिखल व दलदल निर्माण होते. या नुकसानीची दुरुस्ती करणे अवघड ठरते.

## वाढत्या तापमानाचा परिणाम...

'इंटरगव्हर्नमेंटल ग्रुप ऑन क्लायमेट चेंज'च्या अहवालानुसार, 1970 पासून हरितगृह वायू उत्सर्जनामुळे निर्माण होणारी 90 टक्के अतिरिक्त उष्णता जगातील महासागरांनी शोषून घेतली आहे. त्यामुळे महासागरांचे तापमान कमालीचे वाढत आहे. याचाच परिणाम म्हणजे गेल्या तीन-चार दशकांमध्ये चक्रीवादळे अधिकाधिक धोकादायक बनत चालली आहेत. समुद्राचे तापमान 0.1 अंशाने वाढले म्हणजे चक्रीवादळाला अतिरिक्त ऊर्जा मिळते. चक्रीवादळांमध्ये काही वेळा अनेक अणुबॉम्बइतकी ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता असते. चक्रीवादळांची निर्मिती ही थेट पृथ्वीच्या स्वतःच्या अक्षाभोवती फिरण्याशी संबंधित आहे. विषुववृत्ताजवळील समुद्रात जेथे पाण्याचे तापमान 26 अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक असेल तेथे अशी चक्रीवादळे निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. तीव्र सूर्यप्रकाशामुळे जेव्हा समुद्रावरील हवा तप्त होते, तेव्हा ती वेगाने वरच्या दिशेला जाते. अशा रीतीने वर जाताना हवेचा वेग वाढला की ती खूप वेगाने फिरते आणि एक मोठे वर्तुळ बनते. हे वर्तुळ काहीवेळा 2 हजार किमीच्या त्रिज्येपर्यंत विस्तारू शकते.

- **नासाने केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे की समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान अंदाजे 28 अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होते तेव्हा तीव्र वादळे येतात.**
- **'जिओफिजिकल रिसर्च लेटर्स' (फेब्रुवारी, 2019) मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासात असे म्हटले आहे की समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानात प्रत्येक एक अंश सेल्सिअस वाढीमुळे चक्रवादळांची संख्या 21 टक्क्यांनी वाढते.**
- **मागील दशकात अशा चक्रीवादळांमुळे देशात सुमारे 20.4 दशलक्ष लोक प्रभावित झाले असून 51.5 अब्ज डॉलरहून अधिक नुकसान झाले आहे. हवामान बदलामुळे उष्णकटिबंधीय महासागरांच्या तापमानात वाढ झाल्यामुळे चालू शतकाच्या अखेरीस तीव्र पाऊस आणि वादळांचे प्रमाण वाढू शकते.**





मराठवाडयातील
सर्वात जुने दैनिक
गोदातीर
समाचार या प्रसिध्द वृत्तपत्राच्या
६५ व्या वर्धापण
दिनानिमित्त
हार्दीक शुभेच्छा
शुभेच्छूक
मा. रमेश पाटील घंटलवार (माजी जिल्हा परिषद सदस्य, नांदेड )




मराठवाडयातील
सर्वात जुने दैनिक
गोदातीर
समाचार या प्रसिध्द वृत्तपत्राच्या
६५ व्या वर्धापण दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक
माधवअण्णा नारेवाड
(माजी सरपंच, तामसा)
(शाम, तामसा मो. 9421871892)




मराठवाडयातील
सर्वात जुने दैनिक
गोदातीर
समाचार या प्रसिध्द वृत्तपत्राच्या
६५ व्या वर्धापण
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छूक
पप्पू कदम पाटील
(शाम, तामसा मो. 9421871892)




मराठवाडयातील
सर्वात जुने दैनिक
गोदातीर
समाचार या प्रसिध्द वृत्तपत्राच्या
६५ व्या वर्धापण दिनानिमित्त
हार्दीक शुभेच्छा
:: शुभेच्छूक ::
विधान कन्स्ट्रक्शन
भोकर रोड, तामसा ता. हदगाव जि. नांदेड
खंडोबा कन्स्ट्रक्शन
रावणगांव ता. हदगाव जि. नांदेड
(शाम, तामसा मो. 9421871892)

# चला, नववर्षाचे स्वागत करूया...!

माणूस मोठा मजेशीर प्राणी! जे जे नवं, ते ते हवं! माणसाची हाव सुटत नाही. असू द्या. बघता बघता एकविसाव्या शतकाचा पाव भाग संपला! आज कुणी दहा, पंधरा, पंचवीस, चाळीस, पन्नास, साठ, सत्तरीत तर कुणी आयुष्याचे शतक साजरे करत असेल! आज कुठे जन्मामुळे आनंद तर कुठे मृत्यूमुळे आक्रोश सुरु असेल! हे पहायचे असेल तर मीडिया एक उत्तम उदाहरण! एकाच ग्रुप-अकाऊंटवर वाढदिवसाच्या शुभेच्छांचा वर्षाव तर लगेच त्याच ग्रुप-अकाऊंटवर भावपूर्ण श्रद्धांजलीचे संदेश, फुलांची इमोजी मात्र एकच! मीडियावरील हा सुख-दुःखाचा लपंडाव पाहताना हसू येते! होय माणूस असाच आहे! तो स्वार्थी आहेच आहे. त्याला त्याचे स्वत्व जपण्यासाठी तो कुणाचाही विचार करत नाही. हा इतिहास आहे. एवढं लिहिण्याचं कारण म्हणजे आज आणखी एक वर्ष संपले आणि नववर्षारंभ! तेंव्हा काहीतरी चिंतन-मंथन-संकल्प व्हायला हवेत!

माणसं चर्चा करताना ऐकली पाहिजेत. प्रत्येकाची चर्चा भिन्न असते. शिकलेली, अशिक्षित, स्त्रिया, मुलं, विद्यार्थी या सर्वांच्या गप्पा ऐकायला पाहिजे. तसे ते कठीणच! कारण त्या समुहात सामील झाल्याशिवाय त्या गप्पा ऐकणे, तिथली माहिती होणे कठीणच! असे असले तरी एकाद्या समूहाच्या गप्पांचा दूरस्थ श्रोता झाल्यावर तिथे काय गहन चर्चा सुरू आहे बा? ऐकले की हसायला येतं. त्यात सर्वात वाईट बाब म्हणजे त्यांच्यातून आत्ताच गेलेल्या त्यांच्याच जीवलगाची टिंगल! त्यात नवीन आलेला एकदम खुश होऊन दाद देत असतो. आणखी एक जातो, आणखी एक येतो आणि पुन्हा ते चर्वितचर्वण! कुणी काय बोलावे? हे सांगणारा मी कोण? आणि सांगणारही नाही; मात्र एक निश्चित आहे, आपण काय बोलतो, कुठे बोलतो, कुणाविषयी बोलतो याची नोंद मात्र नक्की होते. तुम्ही म्हणाल कोण आणि कुठे नोंद? याचे उत्तर म्हणजे जे बोलतात आणि ऐकतात त्यांच्याकडेच ती होत असते. आपण वाईट बोलत असू तर त्याची सुद्धा आणि चांगले बोलत असू तर ती सुद्धा नोंद बोलणाराकडे आणि ऐकणाराकडे असतेच. ही नोंद अत्यंत महत्वाची आहे. तीच खरी बचत आहे. आपण काय बोलतो-विचार करतो, याचा खोलवर प्रभाव सर्वप्रथम स्वतःवर पडत असतो, आणि या जगात आपल्यासाठी आपल्याएवढे महत्वाचे दुसरे कुणीच नाही. माणूस अलीकडे असा विचारच करत नाही. चला आज थर्टीफस्ट आहे, न्यू इअर आहे; सेलिब्रेशन तर झालेच पाहिजे या अविर्भावात आपण असतो. चौकाचौकांत एकावर एक फ्रीच्या जाहिराती झळकतात. हॉटेलबाहेर सगळीकडे फुल्ल जेवणाचे होर्डिंग्ज ग्राहकांना आकर्षित करते. या झगमगाटात आपण कोण, कुठे आणि काय करत आहोत? याचे भान विसरत तर चाललो नाहीत ना? यावर नक्की विचार व्हायला हवा!



माणूस हा उत्सवप्रिय प्राणी असून त्याने उत्सव जरूर साजरे केलेच पाहिजे! उत्सवाच्या नादात मात्र माणसातील माणूसपण हरवता कामा नये. माणसाने भूतकाळातील घटनांपासून शिकायला हवे. आपण चर्चा करताना देश-जगातील घटनांचा विचार करतो. होय तो सुद्धा व्हायलाच हवा. तो विचार करताना आपल्या जीवनात आपण काय काय बदल अनुभवले? आपल्याला काय आणि किती खडतर अनुभव आले? याची जरूर नोंद ठेवली पाहिजे. त्यातून कोणताही आकस मनामध्ये न ठेवता त्यातून शिकले पाहिजे. मागील वर्षाने मला भरपूर शिकवले. वर्ष कसे जावे हे माझ्या हातात नसले तरी ते मी कसे घालवावे? हे मात्र नक्की माझ्या हातात आहे. आमची कन्या कु. डॉ. वैष्णवी फिलिपाईन्स देशातून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून सुखरूप घरी परतली, ते क्षण अजूनही जिवंत आहेत! संपूर्ण नातेवाईक-मित्रपरिवाराने तिचे स्वागत केल्याबद्दल आम्ही सर्वांच्या ऋणात आहोत! आमच्या महाविद्यालयाचे दुसऱ्यांदा नॅक झाले, त्याचे अनुभव मोठे बोलके आहेत. त्यावर एक वेगळा अध्याय लिहिला आहे.

सन २०२५ च्या अनुषंगाने बऱ्याच चर्चा झाल्या. हे वर्ष घातक आहे वगैरे, परंतु तसे काही नसते. घटना, घडामोडी घडत असतात. त्यात या वर्षी आसाम खाण दुर्घटना, प्रयाग महाकुंभ-बेंगलुरू चेंगराचेंगरी, एअर इंडिया १७१ विमान अपघात, तेलंगाना रासायनिक कारखान्यातील विस्फोट, पहलगाम अतिरेकी हल्ला, भारत-पाकिस्तान युद्ध आणि पंजाब महापूर इत्यादी हृदय हेलावून टाकणाऱ्या घटना झाल्या असताना भारताच्या पुरुष आणि महिला संघाने क्रिकेट विश्वचषक जिंकला. भारत सरकारने जीएसटी दर घटवले इत्यादी आनंददायी घटना! शिवाय वैयक्तिक जीवनात आमचे सहकारी प्रा. पंडित जोंधळे सरांचे अकाली निधन झाले. आमच्या भगिनी श्रीमती अंजनाबाई नागरे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ही घटना फारच अस्वस्थ करून गेली. जीवनाचे थोडेफार सत्य उलगडले. शिवाय आमचा विमान प्रवास आणि उत्तरेतील शिमला, कुलू, रोहतांग पास, दिल्ली, आग्रा, मथुरा, वृंदावन सफर अविस्मरणीय झाला. पर्यटन माणसाला जगायला शिकवते याची प्रतीती आली. त्यात वर्ष संपताना आमच्या महाविद्यालयाचे अध्यक्ष परमेश्वर कदम यांनी मोठ्या ताकदीने सोनपेठ न. प. निवडणूक लढवली आणि पहिल्यांदाच ते नगराध्यक्ष म्हणून ते निवडून आले! तद्वतच वर्षभर अनेक महत्वपूर्ण ग्रंथ वाचन झाले, तुकोबांवर सातत्याने लिहिणे सुरु असताना अनेक मान्यवर मंडळींचे आशीर्वाद मिळाले.

सज्जनहो, नवीन वर्षात पदार्पण करतांना आपण काही महत्वपूर्ण संकल्प करूया. अनमोल जीवनातील एकेक दिवस-वर्ष घटत आहे. आपण एकेक दिवस लहान होताहोत. जीवन किती क्षणभंगुर आहे(!) याची प्रतीती आपल्याला अनेक प्रसंगातून आली आहे. असे असतांना आपण स्वतःप्रती जास्त सजग राहिले पाहिजे. स्वतःची सर्वांगीण काळजी घेतांना आपल्या कुटुंब आणि भोवतालची काळजी घेऊ. असे करण्यासाठी फार काही कष्टाची गरज नसून दैंनदिन जीवनात छोट्या परंतु महत्वपूर्ण बाबीवर लक्ष केंद्रित करूया. आज सर्वजण धावपळीचे जीवन जगतोय असे म्हणतोय, परंतु खरंच एवढी धावपळ आहे का? आपण आपला अनमोल वेळ मीडियावर घालवतांना त्यातून आपला लाभ आणि हनी याचा विचार करूया. मीडिया अजिबात वाईट नाही, आपण त्याचा योग्य विनियोग करूया. लवकर उठणे, नियमित चालणे, व्यायाम, योगा, प्राणायाम, नृत्य, ध्यान, शवासन इत्यादी करणे अत्यंत जरुरी झाले आहे. त्याला सकारात्मक चिंतनाची जोड आवश्यक आहे. नियमित वाचन करणे काळाची गरज बनली आहे. ग्रंथामधून आपल्याला महापुरुषांचे सर्वार्थाने दर्शन होते. त्यांचे लेखन आपल्या जीवनाला उभारी देते. त्यांचा संघर्ष जगायला प्रवृत्त करतो. महापुरुष वाचताना आपल्याला आपले जीवन कळण्यास सुरुवात होईल. माणसाने आजन्म विद्यार्थी म्हणून जगताना सतत नवनवे शिकण्याचा प्रयत्न करावा. भूतकाळ धरून बसू नये, भविष्याची फार काळजी न करता आजचा दिवस शेवटचा दिवस म्हणून सदैव आनंदी राहण्याचा संकल्प करूया. दुःखाने दुःखी आणि आनंदाने हुरळून जाऊ नये! सृष्टीच्या घटनावर विनाकारण नाराज होऊ नये. असे झाल्यास आपला सर्वकाळ प्रत्येक दिवस आणि शेवटपर्यंतची सर्वच वर्षे आनंदात जातील! हे जीवन सुंदर आहे! तेंव्हा चला, हे संकल्प करूया, आनंदाने जगूया! नवीन वर्षाच्या अनंत शुभेच्छा!

**-प्रा. डॉ. विठ्ठल खंडुजी जायभाये**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी (महाराष्ट्र)
मो ९१५८०६४०६८

# जीवन सुंदर आहे...

जीवन म्हणजे एक अमूल्य भेट आहे, जी प्रत्येकाच्या आयुष्यात एक अनोखा रंग भरते. हे रंग वेगवेगळे असतात. काही तेजस्वी आणि आनंदमय, तर काही छटांनी ओथंबलेले, अनुभूतींच्या झऱ्यांनी भरलेले. माझ्या आयुष्यातही जीवनाच्या या रंगांनी मला अनेक अनुभव दिले. काही सुखद, तर काही कठीण. जीवन म्हणजे प्रत्येक क्षणात दडलेला एक अर्थपूर्ण अनुभव आहे. कधी आनंदाने ओथंबलेले तर कधी दुःखाने भरलेले, पण तरीही जीवन सुंदरच असते हे मला माझ्या अनुभवांतून उमगले आहे. लहानपणी जीवन फार सोपे वाटायचे. आईच्या हातचा डबा, मित्रांसोबतचे खेळ, आणि उद्याची कोणतीही चिंता नाही हेच तेव्हा जीवन होते. पण जसजसे मोठे होत गेलो, तसतशी जबाबदारी वाढली, अपेक्षांचे ओझे आले आणि जीवन थोडे कठीण वाटू लागले. अनेकदा अपयश आले, स्वप्ने अपूर्ण राहिली, आणि मन खचले. त्या क्षणी वाटायचे, हेच का जीवन? पण नंतर जाणवले की ह्याच चढ-उतारांत जीवनाची खरी सुंदरता लपलेली आहे.

मी लहान असताना वडिलांचे निधन झाले. त्या वयात मृत्यू म्हणजे काय, आयुष्य कसे बदलते, याची मला जाणीव नव्हती. पण घरात पसरलेली शांतता, आईच्या डोळ्यातले न थांबणारे अश्रू आणि नातलगांच्या कुजबुजणाऱ्या चर्चा यातून काहीतरी मोठे हरपल्याचे मला नकळत कळत होते. वडिलांच्या जाण्यानंतर आमच्या आयुष्याचा केंद्रबिंदू पूर्णपणे बदलला. आई एकटीच सर्व जबाबदाऱ्यांचा कणा बनली. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून तिने आम्हाला सावरले. घरची जबाबदारी, आणि रात्री आमच्या अभ्यासाकडे लक्ष आई कधी थकत नसे. तिच्या चेहऱ्यावरचा थकवा मी पाहायचो, पण ओठांवरचे हसू कधीच कमी झाले नाही.

आमच्या घरात कधीच मोठेपणाची भाषा झाली नाही. परिस्थिती कठीण होती, पण आईने आम्हांला कधीच कमीपणा जाणवू दिला नाही. आपण कमी नाही, फक्त वेगळ्या मार्गाने चालतोय, हे तिचे शब्द आजही आठवतात. शाळेतील कार्यक्रम असोत किंवा आयुष्यातील छोट्या-मोठ्या यशाच्या क्षणी, आई प्रत्येक वेळी पाठीशी उभी राहिली. आईकडून मी संघर्ष करायला शिकलो, परिस्थितीला दोष न देता स्वतःला घडवायला शिकलो. तिच्या कष्टांतून मला संयम, आत्मसन्मान आणि कृतज्ञतेचे मोल कळले. वडील लवकर गेले असले, तरी आईने दोघांची भूमिका समर्थपणे निभावली. आज मागे वळून पाहताना जाणवते की, माझ्या आयुष्याची खरी शाळा ही आईच होती. दुःखातून उभी राहून, स्वतःला विसरून तिने आम्हाला घडवले. म्हणूनच माझ्यासाठी आई म्हणजे फक्त नातं नाही, तर प्रेरणा, धैर्य आणि न संपणारी शक्ती आहे.

माझ्या बालपणाचं स्वप्न म्हणजे एक निळ्या आकाशाखाली, हिरवळीने नटलेली माळ, जिथे मी खेळत, हसत, आयुष्यातील पहिल्या शिकण्याच्या क्षणांचा आनंद घेत होतो. ते दिवस माझ्यासाठी खऱ्या अर्थाने जीवनाचा सौंदर्यदृष्ट्या आविष्कार होता. प्रत्येक क्षण माझ्या हृदयात जपला जातो. वय वाढल्यावर, जीवनाने काही कठीण प्रसंगही दिले. तेव्हा मला समजलं की, जीवन केवळ आनंदाचं नाव नाही, तर त्यात संघर्ष, धैर्य आणि आत्मविश्वासाचाही समावेश आहे. जसं एखाद्या नदीसारखं, जीवनही आपल्या प्रवाहात नवी दिशा घेते, कधी शांत, तर कधी प्रवाहात जास्त वेगाने धावते.

एकदा परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही. खूप निराश झालो होतो. पण त्याच अपयशाने मला स्वतःला ओळखण्याची संधी दिली. माझ्या मर्यादा, माझी ताकद, आणि पुन्हा उभे राहण्याची जिद्द हे सर्व त्या एका अनुभवामुळे शिकायला मिळाले. त्या दिवसापासून समजले की, अपयशही जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे, आणि ते आपल्याला अधिक मजबूत बनवते. निसर्गाकडे पाहिले की जीवनाचे सौंदर्य अधिक स्पष्ट दिसते. पहाटेचा सूर्योदय, पावसात भिजलेली माती किंवा संध्याकाळी मावळणारा सूर्य हे क्षण आपल्याला थांबायला आणि विचार करायला भाग पाडतात. धावपळीच्या जीवनात असे क्षणच आपल्याला खरे समाधान देतात.

आज मला जाणवतं की, जीवनाचं सौंदर्य तेच आहे की, त्यात आपल्या अनुभवांची विविधता आहे. प्रत्येक दिवस एक नवीन सुरुवात घेऊन येतो, आणि प्रत्येक क्षण आपल्याला काहीतरी शिकवतो. जीवन म्हणजे एक सुंदर प्रवास आहे, जिथे प्रत्येकाचा आपला वेगळा रंग आहे, प्रत्येकाचा आपला वेगळा अनुभव. माणसांमधील नातेसंबंधही जीवन सुंदर बनवतात. आई-वडिलांचे निःस्वार्थ प्रेम, मित्रांची साथ, आणि एखाद्या अनोळखी व्यक्तीने दिलेली मदत हे छोटे छोटे अनुभव मनाला स्पर्श करून जातात. पैशांपेक्षा, यशापेक्षा हे क्षण अधिक मौल्यवान वाटतात. शेवटी असेच वाटते की, जीवन परिपूर्ण नसते, पण ते अर्थपूर्ण नक्कीच असते. प्रत्येक दिवस काहीतरी शिकवतो, प्रत्येक अनुभव आपल्याला घडवतो. म्हणूनच, अडचणी असूनही, दुःख असूनही मी ठामपणे म्हणू शकतो जीवन सुंदर आहे, फक्त ते अनुभवण्याची दृष्टी आपल्याकडे असायला हवी.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# ध्येयप्रेरित संघर्षशील योद्धा : कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव

कोणत्या जातीत जन्म घेणे हे मानवाच्या हातात नाही, कारण मनाप्रमाणे ज्या जातीत जन्म घेणे आपल्या हातात असते तर कदाचित समाजात विषमता, गरिबी, अज्ञान, जातीयवाद, वर्गवाद, उच्च-निच, श्रेष्ठ-कनिष्ठ यांची दरी राहिली नसती, पण सृष्टी आपले रहस्य कधीच उलगडून दाखवित नाही. त्यामुळे मानव जात आपापल्या स्वार्थासाठी समाजाचे विभाजन करून आपले श्रेष्ठत्व सिध्द करण्याचा अट्टाहास करित असते. जन्म घेणे आपल्या हातात नसले तरी मिळालेला जन्म आपल्या कर्माने, ज्ञानाने व कर्तृत्वाने सिध्द करून जन्मापेक्षा कर्माने व्यक्ती महान ठरत असतात हे भारताच्या महान विभूतीने वेळोवेळी सिद्ध केले आहे.

गोर बंजारा या भटक्या जमातीच्या रामकिशन नाईक यांच्या घरी डॉ. नानासाहेब जाधव यांचा जन्म १ जानेवारी १९५६ रोजी दिग्रस तांडा (खुर्द) येथे झाला. या काळात बंजारा समाज भारतीय राज्यघटनेच्या विचारापासून शेकडो मैल दूर होता. या काळात बंजारा समाजाला शिक्षणाची चाड नव्हती. रानावनात गाई-गुरे चारत हा समाज भटकंती अवस्थेत जीवन जगत होता. अशा ह्या भटक्या समाजात व गरीब कुटुंबात जन्म घेऊनही डॉ. नानासाहेब जाधव यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून येणाऱ्या पिढीला हिम्मतीने जीवन कसे समाजोपयोगी बनवता येते याचा पायंडा घालण्याचा प्रयत्न केला.

शिक्षण क्षेत्रामध्ये काम करत असताना सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक असते. शिक्षण क्षेत्रामध्ये काही घटक अत्यंत महत्वाचे असतात. त्यामध्ये संस्थेचे अध्यक्ष, विद्यालयाचे मुख्याध्यापक किंवा महाविद्यालयाचे प्राचार्य, कार्यरत अध्यापक व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, महाविद्यालयाची वास्तू, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य आणि



विद्यार्थी या सर्व बाबीचा योग्य मेळ बसला तरच शिक्षण क्षेत्रातील काम करणाऱ्या व्यक्तीला यश मिळते. संस्थाचालक जेव्हा एखादी शिक्षण संस्था उभी करतो तेव्हा त्याचे शैक्षणिक ध्येय निश्चित असतात. मला माझ्या मातृभूमीची सेवा करताना इतल्या मनुष्य बळाला सुशिक्षित बनवावयाचे आहे. ज्ञानाच्या विविध क्षेत्रामध्ये पिढीला तज्ज्ञ बनवून राष्ट्र कार्यामध्ये त्यांचा सदुपयोग व्हावा ही रास्त अपेक्षा घेवून तो कार्य करण्यास सिध्द होतो. संस्थाचालकाच्या या यशामध्ये त्यांच्या हिम्मतीला व मेहनतीला तर दाद द्यावीच लागते. पण चाणाक्ष बुध्दीने त्यांनी निवडलेला कर्मचारी वर्ग त्यांच्या या कार्याला किती साथ देतो त्यांना उपलब्ध होणारे विद्यार्थी कोणत्या स्तरातून येतात व त्यांचा बुध्यांक काय असतो. या वर बरेचसे अवलंबून असते. मराठवाडा हा महाराष्ट्राचा मागासलेला भाग म्हणून ओळखला जातो. या भागात विद्यार्थ्यांचा सामाजिक, आर्थिक स्तर हा नेहमीच सामान्य राहिलेला आहे. उच्च स्तरातील विद्यार्थी मुंबई, पुणे स्थलांतरीत होत असतात. एका पाहणीनुसार पुण्याच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये ३० टक्के प्रमाण हे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे आहे. त्यामुळे मराठवाड्यासारख्या मागास प्रदेशामध्ये विकसित झालेल्या मुंबई, पुण्याकडील लोकांनी संस्था उघडल्या नाहीत. त्यामुळे संस्था उघडण्यासाठी भूमिपुत्रालाच पुढे यावे लागले. दर्जा प्राप्त कर्मचारी वर्ग ही मराठवाड्याकडे फार चांगल्या नजरेने पाहतो असेही नाही. कर्मचारी वर्गामध्ये ग्रामीण भागात जाऊन काम करण्याबाबत आजही अनास्था दिसून येते. अशा एकंदर विपरीत परिस्थितीत ग्रामीण स्तरापासून महानगरापर्यंत डॉ. नानासाहेब जाधव यांनी केलेला शिक्षण प्रवास, त्यांनी उपसलेले अपार कष्ट, संयमाने हाताळलेले एक एक प्रश्न आणि त्याची उत्तरे शोधताना पणाला लावलेले आपले कसब यामुळे त्यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य अधिक उजळून निघते.

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाच्या जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयाचा प्राध्यापक म्हणून मी १९९२ ला रुजू झालो. डॉ. नानासाहेब जाधव प्राचार्य असताना १५ वर्षे त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करताना त्यांच्या कार्याच्या अनेक पैलूचा मला जवळून अनुभव घेता आला, यातून मला अनेक बाबीचे शिक्षण व प्रशिक्षण मिळाले. काम करण्याची व प्रशासनातील निपुलता प्राप्त करता आली. माझ्यातील या बाबी हेरुन डॉ. नानासाहेब जाधव यांनी मला २००९ पासून प्राचार्याची धुरा माझ्याकडे सोपवली. नानासाहेब जाधव यांनी विचारांती निर्णय घेतला की, स्वतःसाठी जगणे हे पशुत्वाचे लक्षण असते, दुःखीतांसाठी जगणे हे देवत्वाचे लक्षण असते. त्यामुळे हजारो उपेक्षितांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सर्वप्रथम विमुक्त जाती/भटक्या जमाती, विद्यार्थी संघ संघटना स्थापन केली. सदर संघटनेचे ते नांदेड जिल्हाप्रमुख ही झाले. समाजहिताच्या जाणिवेने भारावलेल्या नानासाहेब यांनी सन १९७० ला श्री सेवादास शिक्षण मंडळाची स्थापना केली व नागार्जुना शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून शिक्षण प्रसारणाची भूमिका स्वीकारली आज त्यांच्या शैक्षणिक विस्ताराचे छोटेसे रोपटे विस्तारत जावून मोठे वटवृक्ष झालेले आहे. या वटवृक्षाच्या सावलीत पाचशेहून अधिक कर्मचारी सेवारत असून, हजारो विद्यार्थी विद्या विमुक्तयाचा संदेश घेवून स्वातंत्र्य, समता, न्याय बंधुता समाजात प्रस्थापित करत आहे.

सरळमार्गी, सात्विक, उद्यमशील, दुःखीतांचे कैवारी एक व्यासंगी नारायणराव जाधव यांनी शैक्षणिक संकुले वाढविली, पण वडिलांचे स्वप्न छोटा नारायण शिकून शहाणा झाला पाहिजे हे स्वप्न पूर्ण करण्यास विसरले नाही. सामाजिक कामाचा व्याप, शैक्षणिक संस्थाचे काम, राजकीय आव्हाने हे सर्व पेलत २०१२ मध्ये शिक्षण क्षेत्रातली सर्वोच्च पदवी पीएच. डी. पदवी प्राप्त केली व वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. डॉ. नारायणराव जाधव ते डॉ. नानासाहेब जाधव हा प्रवास खडतर होता. दमछाक करणारा होता, पण डोळ्यात वास्तव व मनात जिद्द असली म्हणजे माणूस कसा घडत जातो व उपेक्षितांनाही घडवत जातो. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. नानासाहेब जाधव यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतीतो ईश्वर त्यांना सदैव निरोगी व सुखी, समाधानाचे जीवन जगण्याची ताकद देवो हीच मनोकामना व सदिच्छा.

**-डॉ. वसियोदिन मुजावर**
प्राचार्य,
जवाहरलाल नेहरू समाजकार्य
महाविद्यालय,
सिडको, नांदेड:

# दै. गोदातीर समाचारच्या मूल्यनिष्ठ परंपरेचा ६४ वर्षांचा प्रवास

मराठी पत्रकारितेचा इतिहास हा केवळ बातम्यांचा नसून समाजाच्या जडणघडणीचा, लोकशाही मूल्यांच्या रक्षणाचा आणि सत्यासाठी लढणाऱ्या विचारवंतांच्या लेखणीचा इतिहास आहे. या समृद्ध परंपरेत दै. गोदातीर समाचार या वृत्तपत्राने गेली ६४ वर्षे निष्ठेने, निर्भीडपणे आणि समाजाभिमुख राहून पत्रकारिता केली. त्याच पार्श्वभूमीवर मुख्यसंपादक केशव घोणसे पाटील यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

मराठवाड्यातील जनतेच्या समस्या, प्रश्न आणि अपेक्षा थेट मांडण्यासाठी दै. गोदातीर समाचारची देवीदास रसाळ यांच्याकडून स्थापना झाली. प्रारंभी मर्यादित साधनसामग्री, आर्थिक अडचणी आणि अनेक आव्हानांचा सामना करत दैनिक उभे राहिले. मात्र सत्य, स्वच्छ पत्रकारिता, लोकहिताची भूमिका या त्रिसूत्रीवर ठाम राहून, या वृत्तपत्राने आपली अखंड वाटचाल चालू ठेवली.




ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, सामान्य नागरिक, आणि महिलांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दै. गोदातीर समाचारने सातत्याने केले आहे. अन्याय, भ्रष्टाचार, प्रशासनातील त्रुटी यावर निर्भीडपणे प्रकाश टाकला जातो. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आपली जबाबदारी ते प्रामाणिकपणे पार पाडत असतात.

लोकशाही व्यवस्थेत स्वतंत्र आणि निर्भय पत्रकारितेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दै. गोदातीर समाचारने कोणत्याही दबावाला न जुमानता सत्य मांडण्याची भूमिका कायम ठेवली. शासन, प्रशासन आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून कार्य करताना जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही.

निवडणुका, सामाजिक चळवळी, शैक्षणिक प्रश्न, पाणीटंचाई, आरोग्य, बेरोजगारी अशा असंख्य विषयांवर सातत्याने केलेले वस्तुनिष्ठ वृत्तसंकलन हे या वृत्तपत्राचे वैशिष्ट्य राहिले आहे.

तंत्रज्ञानाच्या युगात पत्रकारितेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. मुद्रित माध्यमां-सोबतच डिजिटल पत्रकारितेचे महत्त्व वाढत असताना दै. गोदातीर समाचारने काळाची पावले ओळखून ई-पेपर व ऑनलाईन माध्यमांचेही अनुकरण केले. यामुळे नव्या पिढीतील वाचकापर्यंत पोहोचण्याचा मार्ग अधिकाधिक सुकर करीत आहेत. तथापि माध्यम बदलले तरी सत्य, सामाजिक बांधीलकी आणि नैतिकता या मूल्यांशी कोणतीही तडजोड न करता पत्रकारिता करणे हेच या वृत्तपत्राचे बलस्थान राहिले आहे.

६४ वर्षांचा प्रवास हा केवळ कालावधी नसून, तो वाचकांच्या विश्वासाने घडलेला इतिहास आहे. संपादक, पत्रकार, प्रतिनिधी, कर्मचारी आणि वाचक यांच्यातील विश्वासाचे नाते दै. गोदातीर समाचारचे खरे भांडवल आहे.

वाचकांनी दिलेले प्रेम, पाठिंबा आणि विश्वास यामुळेच हे दैनिक आजही आदराच्या स्थानी आहे. प्रत्येक वाचक या यशाचा भागीदार आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. भविष्यातही दै. गोदातीर समाचार सत्यनिष्ठ, निर्भीड आणि समाजहिताची पत्रकारिता करत राहील. नव्या पिढीला-मूल्याधिष्ठित पत्रकारितेचे महत्त्व पटवून देत, लोकशाहीच्या मजबुतीसाठी आपले योगदान देण्याचा संकल्प हे दैनिक करत आहे. ६४ वर्षांचा हा प्रवास म्हणजे संघर्ष, चिकाटी, निष्ठा आणि समाजप्रेम यांचा संगम आहे. मराठी पत्रकारितेचा हा वैचारिक दीप अधिक उजळत राहो, जनतेचा आवाज बनून अन्यायाविरुद्ध उभा राहो, मुख्यसंपादक भाई केशव पाटील घोणसे यांचेकडून हीच अपेक्षा...!

**-पंडित पवळे,**
नांदेड
मो. ९८९०२३२९६२

## विधायक नववर्ष

नववर्ष म्हणजे फटाके नव्हे,
तर विचारांची नवी ठिणगी,
स्वतःपुरतं जगणं नव्हे,
तर समाजासाठी थोडीशी देणगी !

झाड लावणं, पाणी वाचवणं,
खोटेपणाला थांबवणं,
हेच असतील खरे संकल्प,
जे उद्याला सुंदर बनवणं !

एक मत, एक शब्द, एक कृती,
घडवू शकते मोठा बदल,
२०२६ चं स्वागत असेल,
जबाबदारीने उचललेलं पाऊल!

२०२६ येतं सांगायला,
तू बदललास तर जग बदलेल,
नववर्षाचं खरं स्वागत,
विधायक कृतीतच नांदेल !

नववर्ष तेव्हाच साजरं होईल,
जेव्हा भविष्य सुरक्षित वाटेल,
विधायक विचार, सकारात्मक कृती,
यातूनच उद्याचं जग घडेल !

**-प्रा. व्ही. व्ही. कोष्टी,**
सांगली

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नांदेड जिल्हा
नव्या क्षितिजावर, नवी पहाट फुलावी,
नव्या नव्या स्वप्नांची वाट दिसावी
लोकसेवा सदैव तुमच्या हातून घडावी,
प्रगतीची नवी दिशा दिसावी
दैनिक
गोदातीर
समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
– शुभेच्छूक –
प्रवीण पाटील चिखलीकर
प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र
संचालक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड
मा.सभापती, जिल्हा परिषद, नांदेड

# दैनिक गोदातीर समाचार

१ जानेवारी २०२६

## ६५ व्या वर्धापन दिना निमित्त हार्दिक शुभेच्छा

- शुभेच्छूक -

## शिऊर साखर कारखाना लि., वाकोडी

ता. कळमनुरी जि. हिंगोली

## श्री सुभाष शुगर प्रा.लि., हडसणी

ता.हदगांव जि.नांदेड







### शिऊर साखर कारखान्याचे विक्रमी गाळप

- ✻ सन २०२५-२६ साठी साडेपाच हजार हेक्टर ऊसाची नोंद
- ✻ मागील हंगामात ४ लाख २६ हजार मेट्रीक टन एवढा ऊस गाळप.
- ✻ सन २०२५-२६ वर्षासाठी ५.५ लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दिष्ट.

२ कोटी युनिट वीज महावितरणाला पुरवठा विज उत्पादनानंतर आता कारखान्याकडून सीएनजी प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर

१ मेगावॅटचा सोलार प्लॅन्टचे काम प्रगती पथावर

### सुभाष शुगरचे विक्रमी गाळप

- ✻ सन २०२५-२६ साठी साडेसहा हजार हेक्टर ऊसाची नोंद
- ✻ मागील हंगामात ५ लाख ७८ हजार मेट्रीक टन एवढा ऊस गाळप
- ✻ सन २०२५-२६ वर्षासाठी ७ लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दिष्ट.

शिऊर साखर कारखाना वाकोडी डिस्टीलरी प्लॅन्ट कार्यान्वित.

## श्री सुभाष रुरल कॉ-ऑप.क्रेडीट सोसायटी लि. नांदेड

मुख्य शाखा: हडसणी, ता. हदगाव, जि. नांदेड




उस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी श्री सुभाष शुगर प्रा.लि. हडसणीचे अध्यक्ष श्री सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या हस्ते श्री सुभाष रुरल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.ची स्थापना करण्यात आली आहे.

### सन २०२४-२५ गाळप हंगामात ऊस उत्पादक शेतक-यांकरीता ऊस पुरवठा प्रोत्साहन योजना राबविली होती. खालीलप्रमाणे होती योजना

१ ते १५ फेब्रुवारी २०२५ प्रथम उचल अडीच हजार रुपये प्रोत्साहन पर रक्कम ५० रुपये प्रथम बिलात मिळणारी उचल २५५० रुपये, १६ ते २८ फेब्रुवारी प्रथम उचल अडीच हजार रुपये प्रोत्साहन पर रक्कम १०० रुपये प्रथम बिलात मिळणारी उचल २६०० रुपये, १ ते १५ मार्च प्रथम उचल अडीच हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम १५० रुपये प्रथम बिलात मिळणारी उचल २६५० रुपये, १६ मार्च ते पुढे प्रथम उचल अडीच हजार रुपये प्रोत्साहन पर रक्कम दोनशे रुपये प्रथम बिलात मिळणारी उचल २७०० रुपये अशी ऊस पुरवठा प्रोत्साहन योजना सुरु केली असल्याने जास्तीत जास्त ऊस उत्पादकांनी योजनेचा लाभ घेऊन दोन्ही कारखान्यास गाळपास ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन कारखाना प्रशासनाने केले होते.

श्री सुभाष शुगर कारखान्याच्या माध्यमातुन वीज निर्मिती व्हावी, असा मनोदय कारखान्याचे कार्यकारी संचालक सुशिलकुमार देशमुख यांचा होता. त्याच अनुषंगाने त्यांच्या प्रयत्नातुन बगॅसवर प्रक्रिया करुन १४.९ मेगावॅट विद्युत निर्मितीच्या प्रकल्पाचे काम पुर्ण करून विद्युत पुरवठा निर्मिती होत आहे. श्री सुभाष शुगर प्रा.लि.कारखान्याच्या माध्यमातून लवकरच दोन्ही कारखान्यातून निघणाऱ्या प्रेसमडवर प्रक्रिया करुन बायो सीबीजी १६.५ टिपीडी लवकरच तयार करणार. तसेच १ मेगा वॅट सोलार प्रकल्पाच्या कामास सुरुवात.

### कारखान्याची प्रमुख उद्दिष्टये

● पांढरी शुभ्र व दर्जेदार साखर निर्मिती करणे. ● ऊस उत्पादक शेतक-यांना जास्तीत जास्त ऊस दर देणे. ● सवलती दरामध्ये ऊस उत्पादक शेतकरी यांना प्रेसमड वाटप करणे. ● ऊस उत्पादक शेतकरी यांच्या सहकार्याने जास्तीत जास्त (उच्चांक) गाळप करणे. ● परिसरातील ऊस उपादक शेतकरी, कामगार यांची आर्थिक प्रगती आणि परीसराच्या विकासासाठी कटीबध्द.



मा.श्री. सुभाषराव लालासाहेब देशमुख
चेअरमन



मा.श्री. सुशिलकुमार सुभाषराव देशमुख
कार्यकारी संचालक

# साहित्य मैफल

**या वेळी नववर्षाचे स्वागत आरोग्यपूर्ण होणार आहे, कारण न्यू इयर सेलिब्रेशनसाठी खानपान आणि मद्य क्षेत्रातील ट्रेंड्स बदलत आहेत. आरोग्याला प्राधान्य देत, पार्टी मेनूमध्ये फायबरयुक्त, प्रोबायोटिक पदार्थांचा समावेश वाढत आहे. त्याचप्रमाणे, नॉन-अल्कोहोलिक पेये आणि मसालेदार फ्यूजन कॉकटेल मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होताना दिसणार आहे. यामुळे सध्याच्या उत्सवी वातावरणाला आरोग्यदायी आयाम मिळणार आहे.**

## उत्सवकाळाचे आरोग्यदायी सेलिब्रेशन!

वेध

**अश्विनी पारकर**

नववर्षाची पूर्वसंध्या अर्थात 'थर्टी फर्स्ट' ही जगभरात, विशेषतः भारतात मोठ्या उत्साहाने आणि आनंदात साजरी केली जाते. हा सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचे स्वागत करण्याचा क्षण असतो. २०२६ च्या स्वागतासाठी बाजारात आणि घरगुती पार्ट्यांमध्ये खानपान आणि मद्य क्षेत्रातील अनेक नवीन ट्रेंड्स लोकप्रिय होत आहेत, जे केवळ चवीवरच नाही, तर आरोग्यावरही भर देणारे आहेत. नव्या वर्षाच्या पार्टीची तयारी करताना पारंपरिक पदार्थांची जागा 'फ्यूजन', 'फंक्शनल' आणि 'इंक्लुसिव्ह' पदार्थांनी घेतली आहे. २०२६ मध्ये खाद्यसंस्कृतीत फायबर (तंतुमय पदार्थ), जागतिक चव (ग्लोबल फ्लेवर्स) आणि मनाचे आरोग्य या संकल्पना महत्वाच्या असणार आहेत. खानपान आणि मेजवान्यांमध्ये आता आरोग्यदायी पदार्थ उपलब्ध होत आहेत. आजघडीला खाद्यपदार्थांमध्ये 'आरोग्य' ही संकल्पना केवळ कॅलरी मोजण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर आतड्याचे आरोग्य आणि मानसिक संतुलनावर केंद्रित झाली आहे. २०२५ मध्ये 'प्रोटीन' ट्रेंडमध्ये होते, पण २०२६ मध्ये फायबर हा घटक सर्वाधिक महत्त्वाचा ठरत आहे. आतड्याचे आरोग्य सुधारण्यासाठी लोक उच्च फायबरयुक्त पेये आणि खाद्यपदार्थ निवडत आहेत. ओट्स, शेंगा, डाळी आणि विशेषतः विविध प्रकारचे दाणे यांचा वापर वाढला आहे. पार्टी स्नॅक्समध्येही भाजलेले चणे, फायबरयुक्त क्रॅकर्स आणि फ्रूट नट्सचे मिश्रण असलेले प्लॅटर्स लोकप्रिय होतील, असा आडाखा मांडला जात आहे. पारंपरिक इडली, डोसा, ढोकळा यांसारखे फर्मेंटेड पदार्थ तसेच पश्चिमी खाद्यसंस्कृतीतील कॅम्पुचा आणि किमचीसारखे पदार्थ आरोग्यदायी स्नॅक्स म्हणून पार्टी मेनूमध्ये समाविष्ट होत आहेत. दही आणि छास आधारित डिझर्ट्स आणि पेयांची मागणी वाढत आहे.

२०२६ मध्ये भारतीय स्वयंपाकघरात जागतिक खाद्यसंस्कृतीचा अधिक प्रभावी प्रवेश होणार असून त्यात स्थानिक चवीला महत्त्व दिले जाणार आहे. अनेक रेस्टॉरंटमधील पार्टी मेन्युमध्येही गोड आणि तिखट चवींचा संगम (स्वीट अँड स्पायसी) करणारा ट्रेंड मोठ्या प्रमाणात पसंत केला जाणार आहे. उदा. आईस्क्रीमवर चिली क्रिस्प, हॉट हनी पिझ्झा किंवा तिखट मसाल्याचे मिश्रण असलेली चॉकलेट्स. भारतीय पदार्थांमध्येही गोड-आंबट चटणीसोबत तिखट मसाल्याचा वापर करून नवीन स्नॅक्स जिभेचे चोचले पुरवण्याकामी अग्रस्थानी असतील.



या वेळेच्या मेजवान्यांमध्ये केवळ चायनीज किंवा इटालियन खाद्यपदार्थांवर लक्ष केंद्रित न करता, आता रेस्टॉरंट्स आणि होम शेफ दक्षिण अमेरिकेतील पेरूचे सेविच, व्हेनेझुएलाचे एरेपा आणि पूर्व आशियातील कोरियन फ्राइड चिकन, मलेशियन लक्सा यासारख्या पदार्थांचा आस्वाद खवय्ये घेतील. पार्टी मेनूमध्ये मिनी-बाओ, कोरियन कॉर्न डॉग किंवा स्पायसी एडमामे या नव्या पदार्थांचा समावेश नवा अनुभव देईल. या वेळेची नववर्ष पुर्वसंध्या ही खाद्यपदार्थांमधील नवीन प्रयोगांची असेल. पारंपारिक भारतीय मसाल्यांव्यतिरिक्त आता हरिसा, गोचुजंग (कोरियन तिखट पेस्ट) आणि कॅलाब्रियन चिलीसारख्या आंतरराष्ट्रीय मसाल्यांचा उपयोग तंदुरी, टिक्का आणि कबाबमध्ये 'फ्यूजन' चव देण्यासाठी केला जाईल.



२०२६ मध्ये डेझर्ट्स हे केवळ गोड राहणार नसून खव्वयांच्या जिभेला काय अनुभव देतो याकडे शेफचे लक्ष असेल. एकाच डेझर्टमध्ये अनेक टेक्स्चर्स (उदा. कुरकुरीत, मऊ, क्रीमी आणि चवींचे थर असणे) हा नवा ट्रेंड आहे. उदा. क्रम्बल, मूस आणि जेलीचे थर असलेले पेस्ट्री. यंदा व्हायरल झालेले दुबई चॉकलेट आणि कोरियन क्रॉफल्स यासारखे पदार्थ नववर्षाच्या मेनूमध्ये डिमांडमध्ये असतील तर क्रीमची जागा फोम किंवा चीज क्रीमआधारित टॉपिंग्ज घेतील. वर म्हटल्याप्रमाणे आगामी वर्ष आरोग्याचे असेल. त्यामुळे 'गट हेल्थ'साठी फायदेशीर ठरणारी ड्रायफ्रुट्स, सीड्स आणि नैसर्गिक गोडवा वापरून बनवलेले पण तरीही अत्यंत चविष्ट असणारी डेझर्ट्स उदा. डेट आणि अंजीर सिरप वापरलेले केक लोकप्रिय होतील. मद्यपान आणि पेयांमध्येही नव्या संकल्पना रुंजी घालत आहेत. २०२६ मध्ये मद्यपान करताना मानसिक संतुलनावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे संतुलन, संवेदना आणि उद्देश्यपूर्णता या तीन संकल्पना दुरगामी ठरतील. सध्या 'झेब्रा स्ट्रिपिंग' ही संकल्पना लोकप्रिय होत आहे. या संकल्पनेत लोक अल्कोहोलिक आणि नॉन-अल्कोहोलिक पेयांचे सेवन आलटून-पालटून करतात.





यामुळे पार्टीमध्येही नियंत्रण आणि संतुलन राखता येते. दारूचे प्रमाण कमी असलेले स्प्रीट्झर, हलकी बिअर आणि वाईन अधिक पसंत केली जाईल. तसेच अशा प्रकारची कॉकटेल्स जास्त प्रमाणात घेता येतात आणि त्यांचा प्रभावही कमी असतो.

नॉन-अल्कोहोलिक पेयांमध्ये आता फंक्शनल घटक उदा. डाप्टोजेन्स किंवा बोटॅनिकल्स वापरले जातात. ही पेये तणाव कमी करणे किंवा ऊर्जा वाढवण्यासारखे विशिष्ट फायदे देतात. यावेळी पार्ट्यांमध्ये चहालाही मागणी असेल. पारंपारिक चहा आता बबल टी, मॅच, आणि विदेशी फ्लेवर्सच्या कोल्ड ब्रू स्वरूपात मॉकटेलचा भाग बनत आहेत. चीज फोम टॉपिंग असलेले टी ड्रिंक्स लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. व्हिस्की, जिन किंवा रमच्या चवीचे, पण अल्कोहोल नसलेले झिरो अल्कोहोल स्पिरिट्स यापुढे पार्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसतील; ज्यामुळे मद्य सेवन न करणाऱ्यांनाही कॉकटेल्सचा अनुभव घेता येईल. २०२६ मध्ये कॉकटेलमध्ये जुनी फ्लेवर्स सोबत घेऊन नवीन फ्लेवर्सचा मेळ घातला जाईल. लिंबू, युझू आणि द्राक्षासारख्या फळांसोबत वॅनिला आणि चॉकलेटसारख्या समृद्ध चवींचा वापर (उदा. बर्बन, स्टॉउट) कॉकटेल्समध्ये अधिक केला जाईल. यंदाच्या पार्ट्यांमध्ये ९० च्या दशकातील लेमन ड्रॉप मार्टिनी आणि आइरिश क्रीम कॉकटेलचे पुनरागमन होईल. साध्या जिन किंवा व्होडकामध्ये आता चाय, इलायची, किंवा केसरसारखे भारतीय मसाले आणि चिली इन्फ्युज करून नवीन चवीचे स्पिरिट्स तयार केले जात आहेत. हे स्वदेशी स्पिरिट्स आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय होत आहेत. कॉफीआधारित कॉकटेल उदा. एक्स्प्रेसो मार्टिनी आणि ड्रिंक्समध्ये व्हिप्ड फोमचा वापर वाढला आहे. विविध फ्लेवर्सचे फोम (उदा. सॉल्टेड कारमेल, लॅव्हेंडर) ड्रिंक्सना नवीन संकल्पनेतील संवेदनात्मक अनुभव देऊ शकतात.

यापुढील काळामध्ये पार्ट्यांचे आयोजन-नियोजनही बदललेले असेल. मोठ्या गर्दीऐवजी आता जवळच्या मित्र-मैत्रिणींच्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या छोट्या पार्टी आयोजित करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. पार्टीमध्ये स्वतःचे कॉकटेल/मॉकटेल बनवण्याचे स्टेशन्स किंवा स्नॅक बार (उदा. गार्निश, फ्लेवर्स आणि टॉपिंग्ज) ठेवणे हा एक मोठा ट्रेंड आहे. यामुळे पाहुण्यांना आपल्या आवडीनुसार पेये किंवा स्नॅक्स तयार करण्याचा अनुभव मिळतो. २०२६ चे नववर्ष स्वागत केवळ उत्साह आणि जल्लोषाचा क्षण नसून, सकारात्मक आरोग्य, जागतिक चवींचा अनुभव आणि आनंद घेतानाही बाळगली जाणारी सजगता यांचा संगम असणार आहे. पार्टीसाठी पदार्थांची निवड करताना, केवळ काय खावे यापेक्षा ते कसे खावे आणि त्याचा शरीरावर काय परिणाम होईल, याकडे अधिक लक्ष दिले जाणार आहे. वस्तुत: ही काळाची गरज आहे. आज विशेष काळजी घेऊन आरोग्यवर्धक किंवा आरोग्याला पूरक खाणे पहायला मिळत नाही. लोक आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा संकल्प जरुर सोडतात, पण ती कायम राखत नाहीत. नवलाईचे चार दिवस संपले की पुन्हा सारे मूळ जागी येते. यामुळे बाजारात, समाजात असे पर्याय निर्माण होणे ही काळाची गरज आहेच, परंतु त्याबाबत समाजमन अधिक सजग होणे आणि अशा पर्यायांची ग्राहकवर्गानेही सतत मागणी करणे आवश्यक आहे.

✦✦✦

**अलिकडेच साजऱ्या झालेल्या शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू, कमलनाथ, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे सौगत रॉय, माजी केंद्रीय मंत्री डी. पुरंदेश्वरी आदी राजकारणी उपस्थित होते. मात्र त्याच वेळी त्यांच्या पक्षाच्या भवितव्याची आणि संभाव्य एकत्रिकरणाची चर्चा जोरात सुरु होती. नेमके काय घडतेय पडद्यामागे?**

## ब्रँड पवार आणि राष्ट्रवादीचे राजकारण

दृष्टीकोन

**डॉ. सुकृत खांडेकर**, ज्येष्ठ पत्रकार



माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांचा ८५ वा वाढदिवस बारा डिसेंबरला साजरा झाला. त्याच्या दोन दिवस अगोदर राजधानी नवी दिल्लीमध्ये त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या स्नेहभोजनाला विविध पक्षांचे दिग्गज नेते उपस्थित राहिले. सत्तेत असो किंवा नसो, सर्वपक्षीय राष्ट्रीय नेत्यांना एकत्र आणण्याची किमया केवळ शरद पवारांकडे आहे हे पुन्हा दिसून आले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी वड्रा, मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू, कमलनाथ, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे खासदार सौगत रॉय, माजी केंद्रीय मंत्री डी. पुरंदेश्वरी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रफुल पटेल, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांची या सोहळ्याला उपस्थिती होतीच, पण देशातील मोठ्या उद्योगसमुहाचे सर्वेसर्वा गौतम अदानी हेसुध्दा शरद पवारांच्या शेजारीच बसून होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटरमधे आम जनतेसोबत त्यांचा वाढदिवस साजरा झाला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, रोहिणी खडसे, विद्या चव्हाण अशी टीम त्यांच्या बाजुला होती, पण सर्व थरातील आणि सर्व वयोगटातील सामान्य लोकांच्या झुंडीच्या झुंडी सकाळपासून त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येत होत्या. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती. केंद्रात आणि राज्यात सत्तेच्या परिघात नसताना हजारोंची गर्दी तिथे लोटली होती. अडिच वर्षांपूर्वी अजित पवार हे चाळीस आमदारांसह पक्ष घेऊन भाजपासोबत गेले, सत्तेत सहभागी झाले. त्यांना भाजपने उपमुख्यमंत्रीपद दिले, आवडते अर्थमंत्रीपद त्यांना मिळाले. त्यांच्याबरोबर बंडात सामील झालेल्या दहा आमदारांना मंत्रीपदे मिळाली. सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्द्यावरून शरद पवारांनी बंड करून १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. राज्यातून डझनभर खासदार आणि पन्नास-साठ आमदार निवडून आणण्याची आपली ताकद आहे आणि आपल्याला बरोबर घेतल्याशिवाय सरकार स्थापन करता येणार नाही हे त्यांनी दाखवून दिले. शरद पवारांनी मोठे केलेले नेते, मंत्री अजितदादांबरोबर भाजपासोबत गेले आहेत. पण पक्षाचे कार्यकर्ते आणि शरद पवारांना मानणारी सर्वसामान्य जनता त्यांच्यावर आजही प्रेम करते, हेच त्यांच्या वाढदिवसाला जमलेल्या लोकांमुळे तसेच राष्ट्रीय राजकारणातील मुरब्बी मंडळींमुळे दिसून आले.

अजित पवार आणि त्यांनी बरोबर नेलेल्या पक्ष संघटनेला अजून तरी भाजपाचे संरक्षक कवच आहे. भाजपाच्या कवचामुळेच त्यांच्या पक्षाला राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक आणि राजकारणात वर्षानुवर्षे किंगमेकर म्हणून ओळखले जाणारे शरद पवार यांचे सत्तास्थापनेतील महत्व कमी करण्यात भाजपा यशस्वी झाली असेल, पण त्यांचे वलय कमी झालेले नाही. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवला आणि चाळीस आमदारांसह भाजपासोबत गेले. उध्दव ठाकरेंप्रमाणे शरद पवारांनी अजितदादा आणि बंडखोर कंपनीला गद्दार ठरवले नाही. गेल्या अडिच वर्षांमध्ये शरद पवारांनी आपल्या पुतण्याविषयी कटु शब्द उच्चारले नाहीत आणि पुतण्यानेही त्यांचा अनादर केला नाही. वसंतदादा पाटील शुगर इंस्टिट्यूट, रयत शिक्षण संस्था अशा दिड-दोन डझन सार्वजनिक संस्थांवर काका पुतण्या पदाधिकारी आहेत. पण एकमेकांना कोणी पाण्यात बघितले नाही .

शरद पवारांसाठी बंड काही नवीन नाही. १९७८ मध्ये वसंतदादांचे सरकार पाडून पुलोद सरकार स्थापन केले, तेव्हा त्यांच्यावर दादांच्या पाठित खंजीर खुपल्याची टीका झाली होती. वयाच्या ३८ वर्षी राज्याचे सर्वात तरूण मुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांनी केला होता. पण नंतरच्या काळात वसंतदादांचा अवमान होईल असे वक्तव्य त्यांनी केले नाही. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या विरोधात काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवून त्यांनी पक्षात स्वत:चा दरारा निर्माण केला होता. रावांच्या विषयी मनात कधी अढी बाळगली नाही. सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्दयावरून शरद पवारांनी काँग्रेसमध्ये बंडाचा झेंडा फडकवला पण नंतर डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमध्ये ते दहा वर्षे केंद्रात कृषीमंत्री होते. यामुळेच अजित पवार यांनी केलेल्या बंडामुळे ते विचलीत झाले नाहीत. राजकारणात गेल्या साडेसहा दशकांहून अधिक काळ सक्रीय असलेल्या शरद पवारांची ओळख 'साहेब' अशी आहे. अनेक अडचणी, संकटे आणि आजारांवर त्यांनी मात केली आहे. त्यांचा पुणे, मुंबई, दिल्ली असा प्रवास अखंड चालू असतो, पण राज्यात चांद्यापासून बांद्यापर्यंत सर्वत्र सर्वाधिक फिरणारा नेता अशी त्यांची प्रतिमा आहे. तब्येत कशी आहे , असा प्रश्न पवारांना कधीच आवडत नाही. ते कधी थकलेले दिसत नाहीत. आजही वाचन भरपूर आहे. शेतीपासून कृत्रिम बुध्दीमत्तेपर्यंत अनेक विषयांमध्ये त्यांना रस आहे. लोकांची गर्दी हेच त्यांचे टॉनिक आहे.



भाजपाने २०२९ ची निवडणूक स्वबळावर लढवण्याची तयारी सुरु केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही त्याची सुरूवात आहे. २०२९ च्या निवडणुकीत कुबड्या फेकून द्यायच्या असल्याचे स्पष्ट आदेश अमित शहा यांनी अलिकडेच दिले आहेत. राज्यात सत्तेवर येण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना बरोबर घेऊन ठाकरेंची शिवसेना आणि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाचे खच्ची केलीच. पण आता शत-प्रतिशत सत्ता प्राप्त करण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या कुबड्या दूर करायला सुरूवात केली आहे. एकनाथ शिंदे हे सारखे दिल्लीला धावतात आणि अमितभाईंना भेटतात. अमित शहा हे एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांचे राजकारणातील हायकमांड आहेत. अमित शहा हे भाजपाची ताकद कशी वाढेल याचा सदैव विचार करतात. शिंदे किंवा अजितदादांचा पक्ष मोठा करणे हे त्यांचे काम नाही. जे अमितभाईंच्या मनात आहे तेच महाराष्ट्रात देवाभाऊ व रवींद्र चव्हाण करत असतात. एकनाथ शिंदे हे माघारी फिरू शकत नाहीत. त्यांना भाजपासोबत राहूनच राजकारण करावे लागणार आहे, पण अजितदादांना काकांचा पर्याय आहे. काका - पुतण्यांनी तसे संबंधही ठेवले आहेत. भाजपा आपला विस्तार साधत असताना आपल्या पक्षाचा संकोच होणार हे अजितदादांना पूर्ण ठाऊक आहे. आपले अस्तित्व, आपला पक्ष आणि आपले सहकारी यांच्या भवितव्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊ शकतील का, अशा चर्चेला शरद पवारांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने उधाण आलेले दिसले.

मुंबईमध्ये ठाकरे ब्रँड जवळ येणार असेल तर काका-पुतण्या का येणार नाही, असा प्रश्न विचारला जातो आहे. यावर काहीही होऊ शकते असे एक उत्तर आहे, सध्या तरी होकार किंवा नकार काहीच व्यक्त होताना दिसत नाही. महराष्ट्रामध्ये होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये मुंबई-ठाण्यात भाजपा आणि शिंदे सेनेची युती होणार, असे दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी जाहीर केले आहे. अन्य महापालिकांमध्ये तसेच जिल्हा परिषदांमध्येही असे होऊ शकते. मग अजितदादांचा पक्ष कुठे आहे, असा प्रश्न पडतो. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव कोणी घेत नाही. भाजपाने ठाणे व कोकणामध्ये शिंदेंच्या शिवसेनेला धक्का देण्याचे काम केले. उद्या अजितदादांच्या पक्षाबाबत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपा हाच प्रयोग करू शकतो, नव्हे तसे होणारच आहे. भाजपाच्या आक्रमक विस्तारवादापुढे एकनाथ शिंदे किंवा अजितदादा काहीच करू शकणार नाहीत. पक्षाच्या भविष्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र यावे अशी मानसिकता दोन्ही पक्षांमध्ये वाढते आहे. त्यातून काय आणि कसे निष्पन्न होते, ते आता पहायचे.



✦✦✦


मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर
समाचार
स्थापना : १९६२
संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
सौ. आरती गणेश यशवंतकर
नगरसेविका प्रभाग क्र. 03 नगरपरिषद, भोकर
योगेश लक्ष्मीकांत भोकरकर
नगरसेवक प्रभाग क्र. 03 नगरपरिषद, भोकर




**आरोग्ययंत्रणा सक्षम असणे ही कोणत्याही देशासाठी आत्यंतिक गरजेची बाब असली तरी त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले असता कोणती अनास्था उद्भवते हे दाखवणारी अनेक उदाहरणे भारतासारख्या देशात बघायला मिळतात. २०२५ मध्ये आपण ती जवळून पाहिली. मात्र सार्वजनिक आरोग्यासाठी जीडीपीच्या किमान पाच टक्के तरतूद केल्यास, एआयची योग्य मदत घेतल्यास येत्या काळात अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात.**

# आरोग्यव्यवस्थेला उपचाराची गरज

वर्षअखेर विशेष २०२५

**डॉ. अभिजित वैद्य,**
ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ

मावळत्या वर्षाला निरोप देत नव्या वर्षाची सुरूवात करताना वर्षभरातील घडामोडींचा धांडोळा घेण्याचा प्रघात आहे. यायोगे अवलोकन होतेच, खेरीज नव्या वर्षातील प्राधान्यक्रमही प्रकर्षाने समोर येतात. या अर्थाने आरोग्यविश्वातील घडामोडींकडे पाहता काही मुद्दे गांभीर्याने बघण्याजोगे वाटतात. सर्वप्रथम एक बाब स्पष्ट करावीशी वाटते, ती म्हणजे केवळ सरत्या वर्षातच नव्हे तर मोदी सरकारच्या मागील बारा वर्षांच्या म्हणजे एक तपाच्या काळात सरकारकडून आवश्यक असणारी सार्वजनिक आरोग्यासाठीची तरतूद सातत्याने कमी केली जात आहे. आम्ही गेली तीस वर्षे सार्वजनिक आरोग्यासाठी जीडीपीच्या किमान पाच टक्के खर्चाची तरतूद असावी, असे मत मांडत आहोत. मात्र अजूनही हा आकडा एक ते सव्वा टक्क्याच्या वर गेलेला दिसत नाही. भरीस भर म्हणून आता यातच कुटुंब कल्याण खातेही ढकलून दिले आहे. त्यामुळे दिसणारी तरतूदही फसवी आहे. एकत्रित करुन सांगितला जाणारा हा आकडा प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या भारताच्या आजच्या आरोग्यविषयक सुविधा पूर्ण करु शकणारा नाही. त्यामुळे फसवी तरतूद हा मुद्दा २०२५ मध्येही दिसला हे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

दुसरे म्हणजे देशामध्ये वैद्यकीय महाविद्यालये उभे केल्याचे पंतप्रधान सांगत असले तरी अजूनही ती कागदावरच आहेत. ती प्रत्यक्ष जमिनीवर उभी राहिलेली नाहीत. त्यामुळेच केवळ घोषणांच्या आधारे विकास होत नसतो, हे वास्तवही सरत्या वर्षाने दाखवून दिले आहे. घोषणा देऊन तसेच नावे बदलून लोकांचे कोणतेही प्रश्न सुटत नाहीत, हे या निमित्ताने मांडावेसे वाटते. सरकारी धोरणाला आलेले इव्हेंटबाजीचे, जुमलेबाजीचे, जाहिरातबाजीचे स्वरुप सरत्या वर्षात वैद्यकीय क्षेत्रातही पहायला मिळाले. त्यामुळे देशात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची दाणादाण होत राहिली. खरे तर कोव्हिड महासाथीच्या काळात हे सत्य उघड झाले होतेच, पण यातून धडा न घेता, सुधारणा न करता त्याच ढिसाळ पद्धतीने काम सुरू राहिले. त्याचे परिणाम आपण भोगत आहोत. मूलभूत प्रश्न वेगळीकडे वळवण्याचा प्रयोग सातत्याने होत राहिल्यास यापेक्षा वेगळे काहीही घडणार नाही.

सध्या देशात सक्षम सरकारी रुग्णालये कमी होत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या घटत आहे. चालू असणाऱ्या केंद्रांची अवस्थाही दारुण आहे. अनेक मोठ्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय तज्ज्ञांच्या जागा रिक्त असल्याचे सरकारच कबुल करते. दुसरीकडे, वैद्यकीयच नव्हे तर एकूणच महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या जागा कमी आहेत. असे असताना सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारण्याची शक्यताच मावळून जाते. दुसरीकडे, सामान्य माणूस याविषयीचे प्रश्नही विचारत नाही, कारण या सरकारने त्यांना धर्म आणि जमातवादामध्ये सातत्याने अडकवून ठेवले आहे. 'आयुष्यमान भारत' योजनेविषयी बराच गवगवा केला गेला. पण ती कुठे चालते, या प्रश्नाचे उत्तर कदाचित सरकारकडेही नसेल, कारण याअंतर्गत मिळणारी पाच लाखांच्या आरोग्यखर्चाची योजना कोणत्याही रुग्णालयामध्ये चालत नाही. रुग्ण आम्हाला हे कार्ड दाखवतात तेव्हा ते कोठे चालते, हे सरकारी यंत्रणेलाच विचारण्याचा सल्ला आम्ही देतो. कारण आम्ही उपचार करतो त्या मोठ्या रुग्णालयांपैकी एकातही ते चालत नाही. म्हणजेच प्रत्येकाच्या खात्यावर १५ लाख जमा होतील, स्विस बँकांमधील काळा पैसा आम्ही परत आणू यासारख्या घोषणांचा एक भाग म्हणजे ही घोषणा आहे का, असा प्रश्न पडतो. सरकारला हे खरचच करायचे आहे का, या प्रश्नाचे उत्तर अजून तरी मिळालेले नाही. म्हणूनच जनतेचे हित साधण्याचा प्रामाणिकपणा नसल्याचे चित्र आपल्याला सरत्या वर्षातही दिसून आले.

येत्या काळात ही स्थिती सुधारायची असेल तर सरकारने वैद्यकक्षेत्रासाठी जीडीपीच्या किमान पाच टक्के रक्कम खर्च करायला हवी. यासाठी त्यांनी रेवड्या वाटणे थांबवले तरी पुरेसे होईल. निरनिराळे इव्हेंट, जाहिरातबाजी, परदेश दौरे यावरुन खर्च नियंत्रित केल्यासही या सोयींसाठी पुरेसा पैसा उपलब्ध होऊ शकतो. आरोग्य क्षेत्रामधील खर्चापोटी दरवर्षीच्या अर्थसंकल्पात अर्धा टक्क्याची वाढ केली तरी अनेक प्रश्न सुटतील असे वाटते. ही वाढ करताना स्वाभाविकपणे दुसरीकडचा निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. पण ते फारसे अवघड नाही. आधी उल्लेख केल्याप्रमाणे आज संपूर्ण देशामध्ये डॉक्टरांचा तुटवडा आहे. ही संख्या जवळपास सात ते साडेसात लाखांच्या घरात जाते. तो भरुन काढण्याचा प्रयत्न व्हायला हवा. केवळ पर्यायी वैद्यकीय शाखा म्हणजेच आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी महाविद्यालये काढून हा प्रश्न सुटणार तर आपल्याला आधुनिक वैद्यकीय तज्ज्ञांची संख्या वाढवूनच हा प्रश्न सोडवावा लागेल. परिचारिकांची संख्याही खूप कमी आहे. आहेत ती प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालयेही अडचणीत आहेत. येत्या वर्षात ती सक्षम कशी होतील, हे बघावे लागेल. तेथे अनेक आजारांचे निदान करणाऱ्या यंत्रणा कशा उपलब्ध करुन दिल्या जाव्यात, याचा विचार करावा लागेल.

आज देशात जेनेरिक औषधांची यंत्रणा उभी केली गेली. पण यामध्ये कोणत्या तरी एका कंपनीने तयार केलेली जनेरिक औषधेच आणली जातात. खरे तर जगातील अनेक मोठ्या कंपन्या या औषधांची निर्मिती करतात. पण या यंत्रणेद्वारे ती उपलब्ध करुन दिली जात नाहीत. आपल्याकडे मिळणाऱ्या जेनेरिक औषधांचा दर्जाही तपासला जात नाही. हे सगळे बघता यामध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न आगामी काळात व्हायला हवा. देशामध्ये सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये आणि शहरातील मोठी रुग्णालये यांच्याकडे प्रचंड जमिनी आहेत. हळूहळू अशा जमिनी हस्तांतरित करण्यासाठी रुग्णालयांना पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) मॉडेल देण्यात येणार आहे. आताही मोठमोठी रुग्णालये अदानी, अंबानी यांच्याकडे दिली जात आहेत. हे असेच सुरू राहिले तर पुण्यातील ससून वा मुंबईचे जेजे रुग्णालय जमिनीच्या एका कोपऱ्यात टाकून उर्वरित भागात वेगवेगळी व्यापारी संकुले उभी राहण्यास वेळ लागणार नाही. हा फॉर्म्युला आरोग्याविश्वासाठी अत्यंत घातक आहे. म्हणूनच या बदलाकडेही बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे ठरणार आहे.



आता चर्चेचा रोख एआयच्या वाढत्या वापराकडे वळवू या, कारण वैद्यकीय क्षेत्रातही कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर वाढतो आहे. येत्या काळात याचे प्रमाण लक्षणीय राहणार आहे. थोडक्यात, जगातील सर्व क्षेत्रांप्रमाणे एआय आरोग्यविश्वही व्यापणार आहे. मी व्यक्तिश: कोणत्याही आधुनिक वैद्यकीय क्रांतीचे स्वागत करतो. तिचा मानवी कल्याणासाठी कसा उपयोग करुन घेता येईल हे सगळ्यांनीच बघायला हवे. आरोग्य क्षेत्रात आलेले एआय बऱ्याच अंशी निरनिराळ्या अभ्यासासाठी सूसुत्र स्वरुपात माहिती देण्याचे काम करत आहे. उदाहरणार्थ, आत्तापर्यंत मला एखादा संशोधन लेख हवा असेल तर वैद्यकीय नियतकालिकाची काही हजारांची वर्गणी भरावी लागत असे. पण आता चॅट जीपीटीवर प्रॉम्प्ट दिल्यावर एका क्षणामध्ये अशा लेखांचा पाऊस पडतो. दुसरे म्हणजे कृत्रीम बुद्धिमत्तेने व्याख्यानांसाठी पीपीटी तयार करण्याचे कामही खूप सोपे केले आहे. तिसरी बाब अशी की, वैद्यकीय व्यावसायिक आपले संपूर्ण प्रोफाइल याच्या साहाय्याने सोशल मीडियावर आणू शकतात. याचबरोबर लोकशिक्षण आणि लोकप्रबोधन यासाठी डॉक्टरांना वेगवेगळी व्याख्याने, व्हिडिओ तयार करण्याच्या कामीही एआयची फार चांगल्या पद्धतीने मदत होते.

या बरोबरीने आज क्लिनिकचे कामकाज चालवण्यासाठी कृत्रीम बुद्धिमत्तेचा मोठा उपयोग होऊ लागला आहे. जसे की, रुग्णाला भेटीच्या वेळेची पूर्वसूचना पाठवणे, सर्व रुग्णांची माहिती सूत्र रुपात देणे ही कामे आता एआय मोठ्या प्रमाणात करत आहे. याचे सर्वात मोठे योगदान रोगनिदान आणि उपचारांमध्येही सुरू झाले आहे. त्यामुळेच येत्या काळात इसीजी मशीन वा यासारखी अन्य वैद्यकीय उपकरणे, मशीन्स उच्च दर्जाच्या एआय तंत्रज्ञानाच्या आधारे चालणारी असतील. त्यांच्या साह्याने पूर्वी निदान करण्यासाठी लागणारा तज्ज्ञांचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचेल आणि काही सेकंदांमध्ये अचूक रोगनिदान होईल. इतकेच नाही, तर एखाद्या व्यक्तीला एखादा आजार होण्याची शक्यता किती आहे, हे जाणून घेण्यातही एआय महत्त्वाची भूमिका बजावेल. थोडक्यात, एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरसाठीही कठीण असणारे काम कृत्रीम बुद्धिमत्तेच्या साह्याने सोपे आणि अचूक होईल. ते वैद्यकीय शास्त्राला अनेकांगाने समृद्ध करेल. वैद्यकीय संशोधनाला चालना मिळेल. उपचार आणि वैद्यकीय माहितीचे प्रबोधन याला हातभार लावेल. माहितीचे संकलन तसेच रुग्णांपर्यंत पोहोचणे सोपे होईल. इथे लक्षात घेण्याजोगी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे एआय ही मदत सगळ्यांनाच करणार आहे. त्याला मदत मागणारा डॉक्टर बोगस आहे की खरा, तो कोणत्या शाखेचा आहे, त्याचे शिक्षण काय याच्याशी काहीही घेणेदेणे असणार नाही आणि याच मर्यादा भविष्यात काही त्रास उत्पन्न करु शकतात. नजिकच्या भविष्यात याचा विचार करावा लागणार आहे. त्यामुळेच एआयमध्ये 'एथिकल कोड' तयार करावी लागतील आणि त्याचा अनएथिकल वापर होणार नाही याची काळजी एआयशी संबंधितांना घ्यावी लागेल.


# २०२५ मध्ये... नोंद घेण्याजोगे

**२०२५ मध्ये देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक महत्त्वपूर्ण घटना घडल्या. आंतरराष्ट्रीय संबंध ढवळून निघताना दिसले. युद्ध वा युद्धजन्य स्थिती यंदाही कायम होती. ट्रम्प महोदयांच्या काही निर्णयांनी तसेच वक्तव्यांनी जगाची झोप उडवलेली दिसली. या सगळ्या घडामोडींचे परिणाम आगामी काळातही बघायला मिळणार आहेत. हे बदल जग कसे स्विकारणार याचा हा धावता आढावा.**

वर्षअखेर विशेष २०२५

**डॉ. भालचंद्र कानगो,**
राजकीय अभ्यासक

२०२५ ला निरोप देत २०२६ चे स्वागत करताना अनेक गोष्टींची उजळणी होणे गरजेचे ठरते. अर्थातच त्यातील एक भाग आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आहे. हा काळ या पातळीवरील राजकारणात झपाट्याने बदल बघायला मिळण्याचा आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप आणि अमेरिका जवळपास एकसारखे बोलायचे आणि वागायचे. ते रशियाच्या विरोधात होते. पण आता अमेरिकेने धोरण बदललेले दिसत असून युरोपला वाऱ्यावर सोडल्यासारखी स्थिती आहे. सध्या युक्रेन जगाचे लक्ष वेधून घेणारा देश बनला आहे. युक्रेनने नाटोमध्ये प्रवेश करावा की नाही या मुद्द्यावर भांडण होऊन शेवटी रशियाने त्यांच्यावर हल्ला केला. आता अमेरिका रशियाच्या मागे उभी राहिली आहे तर युरोप युक्रेनच्या बाजूने उभे राहण्याच्या मताचा आहे. हा मुद्दा नोंद घेण्याजोगा म्हणावा लागेल.






अमेरिकेचे आयात शुल्क हा सरत्या वर्षातील महत्त्वाचा विषय ठरला. अमेरिकेने भारतावरही मजबूत आयात कर लावला. खेरीज, भारत–रशिया संबंधांमध्ये वितुष्ट आणण्याचेही त्यांचे प्रयत्न आहेत. याचाच एक भाग म्हणून भारताने रशियाकडून तेल खरेदी करण्यावर अंकुश ठेवण्याचा विचार बोलून दाखवला गेला आहे. अर्थात भारताने धमकीला न जुमानता वेगळ्या मार्गाने रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवली. मात्र याचा भारतातील जनतेला तेलाच्या किमती कमी होण्याच्या रुपाने कोणताही लाभ मिळाला नाही. अडाणी, अंबानींसारख्या उद्योगपतींना याचा खात्रीने फायदा होत आहे. त्यांच्या रिफायनरीला पैसे मिळत असल्यामुळे पेट्रोल निर्यात करुन हे समूह मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवत आहेत. भारताच्या निर्यातरकमेच्या तालिकांमध्ये निर्यातवाढीचे हे आकडे दिसत आहेत. पण भारतीय जनतेला काहीही फायदा होत नसल्याचे २०२५ च्या आर्थिक घडामोडींमधून स्पष्ट होते.

भारतावर अमेरिकेचा वाढता दबाब २०२५ मध्ये प्रकर्षाने दिसून आला. याचे एक कारण म्हणजे 'ब्रिक्स'मध्ये चीन आणि रशिया हे देश मजबुतीने उभे आहेत. ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकादेखील अमेरिकेच्या दबावाखाली येणार नाहीत. तेव्हा या गटातील भारत हा एकच देश अमेरिकेच्या दबावाखाली येण्याजोगा आहे. तसे बघायला गेले तर मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्वीपासूनच अमेरिकेला अनुकूल राहिले आहेत. त्यातच अमेरिकेत स्थायिक झालेल्या, वास्तव्यास असणाऱ्या भारतीयांचे प्रमाणही प्रचंड आहे. तेदेखील भारताने अमेरिकेला अनुकूल भूमिका घेण्याच्या मताचे आहेत. त्यामुळेच अमेरिका भारतावर इतका दबाव निर्माण करत असूनही मोदी शांत आहेत. वाढते आयात शुल्क असो, भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी आणि शांतता मी आणली, हे वक्तव्य असो वा यासारखी अन्य मुक्ताफळे असोत; मोदी अजूनही शांतच आहेत. लवकरच या दोन्ही देशांदरम्यान व्यापार करार होऊ घातला असून त्याचीही चर्चा आहे. त्यामुळेच येत्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर या दोन देशांच्या संबंधांकडे जगाचे लक्ष राहणार यात शंका नाही.

या सगळ्या बदलाच्या स्थितीमध्ये भारताने आपली ताकद ओळखणे गरजेचे आहे, असे वाटते. चीननंतर सर्वात मोठी अर्थव्यवस्था असणारा एकमेव देश म्हणजे भारत. पण एका अर्थाने तो परावलंबी आहे, हेदेखील विसरुन चालणार नाही. नवीन आर्थिक धोरण आल्यानंतर तर परकीय चलनासाठी भारताचे पाश्चात्य देशांवरील अवलंबित्व कमालीचे वाढले आहे. १९८४ च्या आधीचा भारत आत्मनिर्भरतेकडे प्रवास करणारा होता. बदलत्या धोरणांमुळे आता तो अडचणीत सापडला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय उद्योगपतींनी स्वत:ला शक्तिमान बनवले होते. मात्र आता तेच परदेशांमध्ये पैसे गुंतवण्यास प्राधान्य देत आहेत. म्हणजेच भारतात येणाऱ्या परकीय गुंतवणुकीपेक्षा गुंतवणुकीसाठी भारताबाहेर जाणाऱ्या पैशाचे प्रमाण अधिक आहे. अर्थातच यामुळे भारतीय धोरणांवर उद्योगपतींचा प्रभावही वाढतो आहे. दुसरीकडे, अडाणींच्या मार्फत पाश्चात्य देश भारतातील उद्योगविश्व कह्यात घेण्याच्या प्रयत्नात आहेत. येथील नैसर्गिक साधनसंपत्तीवर कब्जा करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. ते येथे थेट काही करु शकत नसले तरी अडाणींच्या मार्फत हे काम सुरु आहे. असे असताना चीनबरोबरचा संघर्षही संपलेला नाही. चीनी साहित्यावर बहिष्कार टाकण्याची अधूनमधून होणारी घोषणा हा त्याचाच भाग म्हणावा लागेल. त्या दृष्टीने काही धोरणेही राबवली जातात. पण काहीही केले तरी भारताला चीनशी असणारे व्यापारी संबंध तोडणे शक्य नाही, हे २०२५ ने दाखवून दिले आहे. पुढेही हीच स्थिती कायम राहील. आता चीनकडून होणारी आयात जवळपास तीन ट्रिलियनच्या घरात पोहोचली आहे. मात्र तेवढी निर्यात नसल्याने तूट वाढते आहे. येत्या काळात ही काळजीची बाब राहणार आहे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय उद्योगपतींना अमेरिकेशी भारताचा दोस्ताना हवा आहे. त्यामुळेच सध्या चर्चेत असणारा करार भारताला अगत्याने हवा असल्याचे अमेरिका जाणते. दुसरीकडे अमेरिकेलाही होऊ घातलेल्या या करारात रस आहे, कारण दोन देशांमध्ये व्यापारी संबंध नेहमीच महत्त्वाचे असतात. अलिकडच्या काळात तर व्यापार हाच आंतरराष्ट्रीय संबंध ठरवण्यात, निर्माण करण्यात महत्त्वाचा भाग बनतो आहे. त्यामुळे आता नेहरुंच्या काळातील विचार वेगाने मागे पडणार यात शंका नाही. मूल्ये, विचारांची एकरुपता, साम्राज्यवाद विरोध हे सगळे विषय आता मागे पडले असून येता काळ व्यापारी संबंधांना महत्त्व येण्याचा असेल. उदाहरण द्यायचे तर आता इस्त्रायलशी आपले संरक्षण करार खूप वाढत आहेत. आपण त्यांना संरक्षण सामग्री देतो तर त्यांच्याकडून तंत्रज्ञान घेतो. हे नवीन धोरण आहे. पूर्वी असे नव्हते. इस्त्रायलचा मूळ संघर्ष मुस्लीम राष्ट्रांशी असल्याचे इथे विसरुन चालणार नाही. त्यामुळे हे धोरण बीजेपी आणि आरएसएसच्या निकषांमध्ये बसणारे आहे, असेही म्हणता येईल. म्हणजेच इस्त्रायलशी आर्थिक संबंध वाढवणे हा त्यांच्या नीतीचाही एक भाग आहे. पण त्याचा भारतावर दूरगामी परिणाम काय होईल, याचा विचार ते करत नाहीत. आजमितीला आपले एक कोटीपेक्षा जास्त लोक मुस्लीम देशांमध्ये काम करतात. त्यांच्याकडून आपल्याला प्रचंड प्रमाणात परकीय चलन मिळते. म्हणूनच सरकारने धोरणे राबवताना याचा विचार करणाची नितांत गरत जाणवते.

आज जगातील प्रत्येक देशाला भारताशी व्यापारी संबंध हवे आहेत, कारण मोठी बाजारपेठ असणारा हा देश व्यापारवृद्धीसाठी आवश्यक आहे. हे मार्केट कोणीही गमावू इच्छित नाही. हे लक्षात घेऊनच येत्या वर्षातही आंतरराष्ट्रीय राजकारण आणि व्यापार धोरण आकार घेताना दिसेल. मात्र असे असले तरी इथेही लक्षात घ्यायला हवे की, तांत्रिकदृष्ट्या आपण आजही बहुराष्ट्रीय कंपन्यांवर अवलंबून आहोत. त्यांनी हात आखडायला सुरूवात केली आणि आपल्याला तंत्रज्ञान महाग पडू लागले, परिणाम विकास थांबला वा विकासाचा वेग मंदावला तर विपरित परिणाम भोगावा लागेल.

पुन्हा एकदा अमेरिकेकडे वळायचे झाल्यास येत्या वर्षातही हा देश आपल्याला शक्य तितक्या अडचणीत आणण्याचा प्रयत्न करेल. भारतातील अमेरिकन गुंतवणूक कमी व्हावी, भारतीयांवरील आपले अवलंबित्व कमी व्हावे असा त्यांचा प्रयत्न असेल. केवळ भारतीयांवरीलच नव्हे, तर परकीयांवरील अवलंबित्व कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न बघायला मिळेल. पण इथेच त्यांच्या अडचणी वाढण्याचीही शक्यता आहे, कारण अमेरिका त्यांच्या मुक्त धोरणांमुळे आजच्या स्थितीत पोहोचला आहे. त्यामुळे हे धोरणच बदलले तर ते या स्थानी कधीच अढळ राहू शकणार नाहीत. आज अमेरिकेची ताकद सैन्यशक्तीमध्ये दाटली आहे. याबाबत कोणताही देश त्यांचा मुकाबला करु शकत नाही. त्यामुळेच या बळावर हा देश जगावर युद्धखोरी लादण्याची भीती वाटते. परिणामी, नवीन वर्षामध्ये छोटी–छोटी युद्धे वाढू शकतात. आफ्रिका, दक्षिण आशियात ही स्थिती बघायला मिळू शकते. थायलंड आणि कंबोडियामध्ये आताच युद्ध सुरू झाले आहे. हे लोण पसरण्याचा धोका नाकारता येत नाही. चीन, रशिया आणि अमेरिका यांची जवळीक हादेखील जगाच्या दृष्टीने वेगळे राजकारण दाखवणारा विषय ठरु शकतो. चीन आणि रशिया एकमेकांच्या बरेच जवळ येताना दिसल्यास नवल वाटायला नको. भारताच्या दृष्टीने बघायचे तर अमेरिकेच्या जास्त जवळ जाणे धोक्याचे ठरेल. म्हणूनच आपण येत्या काळात रशिया आणि चीन यांच्याशी संतुलित संबंध राखण्याचा प्रयत्न करत राहताना दिसू.

बिना संस्कार नही सहकार ! बिना सहकार नही उद्धार !!

# व्हि.पी. के. पतसंस्था

(कै. व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. सिंधी)

मुख्य कार्यालय : कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, नवीन मोंढा कमान नं. २, नांदेड - ४३१ ६०२.

E-mail:- vpkho.nanded@gmail.com - Mob :- 7263012370

कै. व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. सिंधी ता उमरी

Reg.No. NND/BKR/BNK (0) 1360-2002

रौप्य महोत्सव वर्ष

## ठेवीवरील व्याजदर

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| 31 दिवस ते 45 दिवस | 7.00% |
| 46 दिवस ते 180 दिवस | 8.00% |
| 181 दिवस ते 12 महिने | 9.00% |
| 12 महिने 1 दिवस ते 24 महिने | 10.00% |

जेष्ठ नागरिक, विधवा महिला, अनाथ मुली मुले व दिव्यांगासाठी ठेवीवर 0.50% ज्यादा व्याज दर

**धनवर्धिनी ठेव** (दाम दुप्पट योजना)

1 लक्ष रुपये गुंतवा आणि 80 महिन्यात 2 लक्ष रुपये मिळवा

(जेष्ठ नागरीकांसाठी ७७ महिने)

## संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

- बँको पुरस्कार 2023-24
- तत्पर व विनम्र सेवा.
- अनुभवी व प्रशिक्षीत कर्मचारी वृंद.
- सुलभ व तात्काळ ग्राहकाभिमुख कर्ज सेवा.
- आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. सुविधा.
- कोअर बँकिंग प्रणाली.
- एस.एम.एस.द्वारे मोबाईलवर सुचना.
- लॉकर्स सुविधा उपलब्ध.
- विनामूल्य मिनी ए.टी.एम. सुविधा.

635 कोटी व्यवसाय उद्दिष्ट

कार्यक्षेत्र नांदेड जिल्हा

एकूण शाखा : 20

## सांपत्तिक स्थिती 31.03.2025

(रक्कम लाखात)

| | |
|---|---|
| सभासद संख्या | 43924 |
| भाग भांडवल | 333.75 |
| एकूण ठेवी | 29341.78 |
| एकूण कर्जे | 18873.40 |
| एकूण व्यवसाय | 48215.18 |
| गुंतवणुक | 8292.70 |
| निव्वळ एन.पी.ए. | निरंक (0) |



उत्कर्षाकडे वाटचाल

आपल्याच सहकार्याने..!

(संस्थापक अध्यक्ष)

मा.श्री.मारोतराव व्यंकटराव पाटील कवळे गुरुजी

## ठेव योजना

- विशेष मुदत ठेव योजना
- मासिक व्याज ठेव योजना
- आर.डी. लखपती ठेव योजना
- धनवर्धिनी ठेव योजना (दाम दुप्पट ठेव)
- दैनिक बचत ठेव योजना

## कर्ज योजना

- सोने तारण कर्ज
- धान्य तारण कर्ज
- व्यवसाय कर्ज
- वैयक्तिक कर्ज
- महिला बचत गट कर्ज




बिलोली नगर परिषदच्या नगराध्यक्ष पदी
मा.श्री.संतोष कुलकर्णी
यांची निवड झाल्याबद्दल तसेच सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे
अभिनंदन..!
व पुढिल वाटचालीस
शुभेच्छा
शुभेच्छुक
उमेश बिलोलीकर,मिलींद पाडाळकर,नबाजी नलमेलवार,शंकर गोगरोड,किशन नुग्रुवार,गणेश पानकर,अखिल सिद्दिखी, सुलेमान सेठ,शंकर मावलगे,हेमंत पटाईत,शेख रसुल,प्रताप अंकुशकर,रवी यंबडवार,प्रसाद कुलकर्णी,महेश देशपांडे, गणेश म्हेत्रे यांच्यासह संतोष कुलकर्णी मित्रमंडळ बिलोली


दैनिक
गोदातीर समाचार
वर्धापन दिन...
च्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक:
नगर परिषद कर्मचारी संघटना न.पा.बिलोली


दैनिक
गोदातीर समाचार
वर्धापन दिन...
च्या हार्दिक शुभेच्छा...!
हानमंतराव पाटील बोळेगावकर
सगरोळी जिल्हा परिषद गट


दैनिक
गोदातीर समाचार
वर्धापन दिन...
च्या हार्दिक शुभेच्छा...!
SUNSHINE INTERNATIONAL SCHOOL
KHARLA KD, BILOLI, DISTRICT NANDED


दैनिक
गोदातीर समाचार
वर्धापन दिन...
च्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक:
संग्राम पाटील हायगले
माजी जिल्हा परिषद सदस्य नांदेड


दैनिक
गोदातीर समाचार
वर्धापन दिन...
च्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक:
मारोती मुद्दमवार


दैनिक
गोदातीर समाचार
वर्धापन दिन...
च्या हार्दिक शुभेच्छा...!
रवि पाटील खतगावकर
सभापती:- कृषी उत्पन्न बाजार समिती,बिलोली

# ...तर वित्तीय शिस्तीला बाधा!



**चालू आर्थिक वर्षात करकपातीच्या पावलामुळे देशाच्या महसुली उत्पन्नातील वाढ कमी झाली आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला वित्तीय पाठबळ देण्यासाठी कमी वाव राहिला आहे, असे निरीक्षण 'मूडीज' या जागतिक पतमानांकन संस्थेने नोंदवले आहे. भारत सरकारने याची गंभीर दखल घेतली पाहिजे. याचे कारण महसुलातील वाढ तुलनेने कमी असल्यामुळे वित्तीय शिस्तीला बाधा येऊ शकते.**

**डॉ. अमर साठे**

महागाईत झालेली घट आणि पतधोरण शिथिलता यामुळे क्रयशक्तीला चालना मिळणार आहे. परंतु सरकारने वस्तू व सेवा करात, म्हणजेच जीएसटीमध्ये सप्टेंबरपासून कपात केली आहे. एकूण 375 वस्तूंवरील जीएसटी कमी करण्यात आला आहे. त्यातच गेल्या अर्थसंकल्पात सरकारने प्राप्तिकरात बदल केलेले असल्यामुळे 12 लाख रुपयांच्या उत्पन्नावर कर भरण्याची आवश्यकता नाही. त्याआधीही मर्यादा 7 लाख रुपये इतकी होती. सरकारच्या या निर्णयामुळे मध्यमवर्गाला एक लाख कोटी रुपयांचा दिलासा करात मिळाला. परंतु मुळातच कर कमी झाल्यामुळे, सरकारच्या महसुलावर मात्र परिणाम झाला आहे.

तो महसूल कसा वाढेल, याची काळजी सरकारने केली पाहिजे. भारताचा विकासदर पुढील वर्षी 6.5% राहण्याची शक्यता आहे. 2025-26 या चालू आर्थिक वर्षात तो 7 टक्के राहील असा होरा आहे. चालू आर्थिक वर्षातील निव्वळ करमहसूल सप्टेंबर अखेरपर्यंत 12.29 लाख कोटी रुपये आहे. गेल्या आर्थिक वर्षात याच काळात तो 12.65 लाख कोटी रुपये होता. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलूक' या ऑक्टोबरच्या अहवालात, 2025 मध्ये जागतिक विकासदर 3.3 वरून 3.2 व आणि 2026 मध्ये 3.1 वर येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. प्रगत देशांमधील सकल राष्ट्रीय उत्पादन, म्हणजेच जीडीपीच्या वाढीचा दर हा चालू वर्षात 0.2% घसरण्याची चिन्हे आहेत. परंतु उदयोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील अर्थव्यवस्था यांच्या वाढीचा वेग 2024 मध्ये 4.3% होता. तो 2025 मध्ये 4.2 टक्के असणार आहे. याचा अर्थ, अत्यंत विकसित झालेल्या अर्थव्यवस्थांपेक्षा उदयोन्मुख देशांच्या प्रगतीचा वेग अधिक आहे आणि या देशांमध्येदेखील भारताची कामगिरी तेजस्वी आहे. सरलेल्या जुलै ते सप्टेंबर या तिमाही कालावधीत भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर अर्थतज्ज्ञांच्या अनुमानाच्या तुलनेत सरस वठला आहे. अर्थव्यवस्था 8.2 टक्क्यांच्या भरधाव वेगाने घोडदौड करत आहे. प्रसिद्ध झालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर 7.8% होता, तर यंदाच्या दुसऱ्या तिमाहीत 8.2% पर्यंत आपण मजल मारली आहे. वर्षभरापूर्वीच्या जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीत हा दर फक्त 5.6% होता. म्हणजे सरलेल्या तिमाहीत मागील सहा महिन्यांतील तिमाहींमधील उच्चांक आपण गाठला आहे. अमेरिकेने भारतावर 27 ऑगस्टपासून 50 टक्के शुल्कवाढ लागू केल्यामुळे या आकडेवारीत त्याचे प्रतिबिंब अर्थातच कमी पडले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. कदाचित पुढच्या तिमाहीत त्याचा किंचित परिणाम जाणवूदेखील लागेल. एकूण जीडीपीमध्ये 57% वाटा हा खासगी उपभोगखर्चाचा आहे. या खर्चात अगोदरच लक्षणीय वाढ झाली आहे. जेवढा लोकांचा उपभोग, म्हणजेच मागणी वर जाते, त्या प्रमाणामध्ये बाजारपेठेतील वस्तू व सेवांचा खपही वाढतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत उत्साह संचारतो.

» रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर 2025 मध्ये परकीय चलन बाजारात 7.91 अब्ज डॉलरची निव्वळ विक्री केली, जी ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत 0.21 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होती. रुपयाची आणखी घसरण होऊ नये, यासाठी हे करावे लागत आहे. अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे भारताच्या निर्यातीलाही फटका बसला आहे. त्यामुळे एका वर्षात भारताची व्यापारी तूट 26 अब्ज डॉलर्सवरून 41 अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचली आहे.

» भरीस भर म्हणून की काय, ऑक्टोबरअखेर केंद्र सरकारची वित्तीय तूट संपूर्ण वर्षाच्या उद्दिष्टाच्या 52.6%, म्हणजे एकूण सव्वाआठ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. मागील वर्षाच्या याच पहिल्या सात महिन्यांत वित्तीय तूट ही अर्थसंकल्पीय अंदाजाच्या 46.5% इतकी होती. केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यास दोन महिन्यांचा अवधी असून, त्या कालावधीत निर्मला सीतारामन कठोर पावले उचलतील, अशी अपेक्षा आहे.

» रशियातून भारतात होणारी खनिज तेलाची आयात डिसेंबर महिन्यात तीन वर्षातील नीचांकी पातळीवर येणार आहे. ही आयात नोव्हेंबरमध्ये उच्चांकी पातळीवर होती. अमेरिकेसह पश्चिमी देशांनी रशियावर टाकलेल्या निर्बंधामुळे भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी रशियातून खनिज तेलाची आयात कमी करून इतर देशांकडे मोर्चा वळवला आहे. मात्र रशियाकडून तेलाची आयात स्वस्तात होत होती, या बदललेल्या वास्तवाचा भारताला फटका बसणार आहे.

## शेअर बाजारावर प्रतिबिंब स्वाभाविक




संपलेल्या तिमाहीत सर्वात समाधानकारक भाग म्हणजे, मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादनक्षेत्राची झालेली 9.1% इतकी वाढ. एकीकडे अतिवृष्टी आणि महापुरामुळे यंदा शेतीचे अपरिमित नुकसान झाले. कृषी क्षेत्र फक्त 3.5 टक्क्यांनी वाढले आहे. म्हणूनच उत्पादनक्षेत्रावर भरवसा होता आणि तो योग्य असल्याचे सिद्ध झाले आहे. सेवाक्षेत्राची वाढ ही उत्तम आहे. सेवाक्षेत्रात लाखो लोकांना नोकऱ्या मिळतात. बांधकामक्षेत्राचीही 7.6% दराने प्रगती झाली असून, त्या क्षेत्रातही नोकऱ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे, ही समाधानाची बाब आहे. सध्या भारताची अर्थव्यवस्था 3.9 लाख कोटी डॉलरच्या सकल देशांतर्गत उत्पन्नासह जगात पाचव्या क्रमांकावर आहे. सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि प्रख्यात अर्थतज्ज्ञ अरविंद पानगरिया यांनी, भारत हा 2047 पर्यंत विकसित देश होण्याचे उद्दिष्ट गाठू शकेल असे म्हटले आहे. भारताचा सध्याचा विकासदर काय ते बघितल्यास आपली अर्थव्यवस्था पुढील दशकात दहा लाख कोटी डॉलर्सवर जाईल. सध्या दरडोई उत्पन्न 2,570 डॉलर आहे, ते 2047 पर्यंत 14 हजार डॉलर्सवर जाईल. अर्थात, त्यासाठी वार्षिक 7.3% वाढ अपेक्षित आहे. या सगळ्याचे प्रतिबिंब शेअर बाजारावर पडणे स्वाभाविक आहे.

# पोलीस कोठडीतील वाढते मृत्यू, दोषी कोण?



**गेल्या काही वर्षांत देशात तपास यंत्रणांच्या ताब्यात असणाऱ्या आरोपींचे मृत्यू होण्याच्या घटना ज्या वेगाने समोर येत आहेत, त्यांनी एकंदर पोलीस प्रशासन, तुरूंग प्रशासन आणि न्यायाची प्रक्रिया या तिन्हींपुढे आव्हान उभे केले आहे. देशाच्या बहुतेक राज्यांमध्ये पोलीस आणि इतर तपास संस्थांकडून पुरावे गोळा करण्याची, आरोपींना चौकशीसाठी ताब्यात ठेवण्याची आणि आवश्यक माहिती मिळवण्याची प्रक्रिया चालू असते. ही प्रक्रिया कोणत्याही गुन्ह्याच्या तपासाचा भाग असल्याने ती अनिवार्यही आहे. मात्र या प्रक्रियेत सर्वाधिक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे तपासासाठी ताब्यात ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीचा जीव, आरोग्य आणि मानवी हक्कांचा संपूर्ण सन्मान राखणे हेच असते. एखाद्या संस्थेकडे कायदेशीर अधिकार असतात, पण त्याच वेळी त्यांच्यावर तितकीच कायदेशीर आणि नैतिक जबाबदारीही असते.**

**प्रा. संजय दानवे**

या संस्थांकडून अधिकार आणि जबाबदारी यामध्ये समतोल साधला गेला नाही तर न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढळतो आणि व्यवस्थेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. देशभर ज्या प्रमाणात पोलीस कोठडीतील मृत्यूंचे अहवाल नोंदवले जात आहेत, त्यावरून तपास यंत्रणा आपल्या जबाबदाऱ्यांचे पालन पूर्णपणे करताना दिसत नाहीत हे स्पष्ट होत आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अहवालानुसार 2017 ते 2022 या पाच वर्षांच्या काळात देशात 669 जणांचा कारागृहात मृत्यू झाला. हा आकडा धक्का देणारा आहे. खुद्द केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, 2020-21 मध्ये एकट्या उत्तर प्रदेशामध्ये 451 लोकांचा कोठडीत मृत्यू झाला, तर 2021-22 मध्ये हा आकडा 501 वर पोहोचला. तपास यंत्रणा आरोपींना न्यायालयासमोर उभे करण्याच्या उद्देशाने चौकशी करत असते, परंतु संबंधित आरोपी न्यायालयापर्यंत पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला तर मूलभूत न्यायाच्या कल्पनेलाच धक्का बसतो. सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकारांबाबत अलीकडेच कठोर भूमिका घेतली आहे. राजस्थानमध्ये अवघ्या आठ महिन्यांत 11 जणांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याचा उल्लेख करून न्यायालयाने या घटनांना 'व्यवस्थेवरील डाग' म्हटले आहे. इतकेच नव्हे तर अशा प्रकारचे मृत्यू आता देश सहन करणार नाही, असे स्पष्ट शब्दांत यंत्रणांची कानटोचणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने फटकारण्याचे मुख्य कारण म्हणजे कोठडीतील मृत्यू हे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर थेट परिणाम करणारे आहेत. विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने 2020 च्या परमवीर सिंग सैनी विरुद्ध बलजीत सिंग प्रकरणात स्पष्ट निर्देश दिले होते की सर्व पोलीस ठाण्यांत तसेच एनआयए, सीबीआय, ईडी, नार्कोटिस कंट्रोल ब्युरो, डीआरआय आणि इतर अशा चौकशी व अटक अधिकार असलेल्या सर्व संस्थांमध्ये सीसीटीव्ही आणि रेकॉर्डिंग यंत्रणा बंधनकारक असावी, कारण हे मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे. या आदेशामागचा उद्देश म्हणजे ताब्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर होणारी संभाव्य हिंसा, दबाव किंवा अमानवी वागणूक रोखली जावी आणि जर असा आरोप झालाच तर त्याची सत्यासत्यता तपासण्याचे विश्वसनीय साधन उपलब्ध असावे. मात्र अनेक राज्यांत या आदेशांकडे गांभीर्याने पाहिलेच गेले नाही. परिणामी, आज देशातील बहुतांश राज्यांमध्ये अनेक पोलीस ठाण्यांमध्ये कॅमेरे बसवलेले नाहीत. काही ठिकाणी कॅमेरे असले तरी ते चालू नाहीत, काही ठिकाणी रेकॉर्डिंगची यंत्रणा बंद ठेवलेली आढळते. ही स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे पोलीस प्रशासन, तपास यंत्रणा या आपल्या ताब्यातील व्यक्तींच्या हक्कांबद्दल संवेदनशील नाहीत. कोठडीतील मृत्यूंची कारणमीमांसा केली तर तीन- चार प्रमुख कारणे दिसून येतात. पहिले कारण शारीरिक अत्याचार. अनेक वेळा चौकशीदरम्यान आरोपींकडून माहिती मिळवण्यासाठी यंत्रणांकडून वापरले जाणारे दबावाचे मार्ग अत्यंत कठोर आणि अमानवी असतात. दुसरे कारण आवश्यक वैद्यकीय सुविधांचा अभाव. तुरुंगामध्ये किंवा आपल्या ताब्यात ठेवताना तपास यंत्रणांनी संबंधित व्यक्तींची प्राथमिक आरोग्य तपासणी, औषधोपचार, मानसिक स्थिती तपासणे आणि सतत देखरेख करणे आवश्यक असते. अनेक मृत्यू या दुर्लक्षाचा परिणाम असल्याचेही दिसून आले आहे. तिसरे कारण म्हणजे आत्महत्या. मनावरचा प्रचंड ताण, भविष्याची भीती, विविध मार्गांनी येणारा दबाव किंवा चौकशीचे भय यामुळे काही आरोपी स्वतःचाच घात करतात. चौथे कारण अपघाती मृत्यू. कधी देखरेखीच्या अभावामुळे, तर कधी मूलभूत सुविधांची अनुपलब्धता असल्यामुळे हे मृत्यू घडतात.



## 20 वर्षांत 1888 संशयितांचा मृत्यू

भारताच्या नवीन दंड आणि प्रक्रिया संहितांनुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 नुसार कोठडी दोन प्रकारची असते. एक म्हणजे पोलिसांकडून घेतली जाणारी कोठडी ज्यामध्ये 15 दिवसांपर्यंत चौकशीसाठी ठेवले जाते आणि दुसरा प्रकार म्हणजे न्यायालयीन कोठडी ज्यामध्ये आरोपीला न्यायालयीन आदेशानुसार तुरुंगात ठेवले जाते. या दोन्ही परिस्थितींमध्ये ताब्यातील व्यक्तीचे संपूर्ण संरक्षण हे अधिकाऱ्यांचे कायदेशीर कर्तव्य आहे. गेल्या 20 वर्षांत देशभरातील कोठडीत 1888 लोकांचा मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते; मात्र, या मृत्यूंबाबत झालेल्या कारवाईची आकडेवारी पाहिली, तर 20 वर्षांत 893 प्रकरणांमध्ये पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात आले, 358 पोलिसांवर आरोपपत्रही सादर करण्यात आले; पण केवळ 26 जणांना कोठडीतील मृत्यूप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे.
सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या दोन दशकांमध्ये कोठडीत मृत्यू झालेल्यांपैकी 60 टक्के लोकांना मृत्यूपूर्वी एकदाही कोर्टात हजर करण्यात आले नव्हते. या समस्येवर उपाय शोधताना दीर्घकालीन पावले उचलणे आवश्यक आहे.



# दुधातील भेसळीचे संकट!

**भारत हा दुग्धोत्पादनात आघाडीचा देश असताना त्यातील भेसळ हा देखील चिंतेचा विषय ठरत आहे. साहजिकच या कुरापतीमुळे लहान बाळांना पुरेशाप्रमाणात पौष्टिकपणा मिळत नाही आणि त्यांच्या अशक्तपणात भर पडत जाते. त्याचवेळी सरकारकडून दुधातील भेसळीला लगाम घालण्यासाठी प्रयत्न केले जात असले तरी ते कमीच पडत आहेत.**

**वामन शेरे**

भारतात दुधाचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. दुधाबरोबरच संलग्न पदार्थांचे उत्पादनही विपुल प्रमाणात केले जाते. अर्थात त्याची पौष्टिकता आणि दर्जा यावरून बरेच प्रश्न उपस्थित केले जातात आणि या गोष्टी सार्वजनिक आरोग्य आणि ग्राहकांच्या विश्वासाला कदाचित धक्का देणाऱ्या आहेत. प्रामुख्याने दुधाचे प्रमाण वाढविण्यासाठी भेसळ केली जाते आणि ती गुणवत्ता चाचणीत सहजपणे धुळफेक करते. ती सहजासहजी ओळखू येत नाही. ही भेसळ इतकी बेमालुमपणे केली जाते की त्यात भेसळ झाल्याचेदेखील कळत नाही. पाणी, स्टार्च, डिटर्जंट, युरिया, कास्टिक सोडा, माल्ट्रोडेक्सट्रिन एवढेच नाही तर आरोग्याला अपायकारक असलेले रासायनिक पदार्थांचे मिश्रण दुधात केले जाते. चरबीचे प्रमाण वाढविणारे काही घटक दुधात मिसळले जातात. दुधात मिसळण्यात येणारे फॉर्मेलिन, हायड्रोजन पॅराक्साइड हे कर्करोगाला पोषक मानले जातात किंवा यकृत आणि मूत्रपिंडांसारख्या अवयवांवर विपरित परिणाम करतात. भेसळीचा अनैतिक बाजार हा फायद्यासाठी होत असताना तो केवळ नैसर्गिक पोषणासाठी आवश्यक असलेल्या घटकांचे प्रमाण कमी करत नाही, तर ग्राहकांच्या आरोग्याला आणि आयुष्याला देखील संकटात टाकतो.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (एफएसएसएआय) ने राज्यसभेत तीन वर्षांत उत्पादित केलेल्या दुग्धोत्पानाशी संबंधित आकडेवारी जारी केली. या अहवालानुसार, भेसळयुक्त दुधाचे प्रकार उत्तर प्रदेशात सर्वाधिक घडतात असे म्हटले आहे. यापाठोपाठ राजस्थान, तमिळनाडू आणि चौथ्या क्रमाकांवर केरळचे नाव आहे. या अहवालातील आकडेवारी धक्कादायक आणि आश्चर्यकारक आहे. उत्तर प्रदेशात भेसळ करणाऱ्यांवर कारवाई देखील केली गेली. यानुसार 1928 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. तामिळनाडूत 944, केरळमध्ये 737, महाराष्ट्रात 191, बिहारमध्ये 174 गुन्हे दाखल केले.

गेल्या पाच वर्षांत उत्तर प्रदेशातील अनेक शहरांत दूध भेसळीचे प्रकार उघडकीस आले. अमोनिया, युरियामुळे दुधाची चव बदलते आणि ती पूर्ववत करण्यासाठी स्टार्चचे मिश्रण केले जाते. या कृतीमुळे भेसळ झाल्याचा थांगपत्ता लागत नाही. विशेष म्हणजे कोणतीही अवजड मशीन न वापरता आणि प्रयोगशाळेत चाचणी न करता दुधात भेसळ केली जाते तरी अशा भेसळयुक्त दुधाची ओळख पटविणे तज्ज्ञांना देखील कठीण ठरते. राष्ट्रीय दूध सुरक्षा आणि गुणवत्ता सर्वेक्षण 2018 ने हायड्रोजन पॅराऑक्साइड, युरिया आणि डिटर्जेंटमिश्रीत दूध हे मानवी आरोग्याला अपायकारक असल्याचे म्हटले आहे. एका आकडेवारीनुसार, भारतात दुधाची विक्री ही उत्पादनाच्या तुलनेत अधिक होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याचाच अर्थ भेसळयुक्त दुधाची सर्रास विक्री होत असल्याचे स्पष्ट होते.भारतात 2013-14 मध्ये 14.63 कोटी टन दुधाचे उत्पादन झाले आणि ते आज 23.06 कोटी टनवर पोचले आहे. यात सहा टक्के वाढीचा दर गृहित धरलेला असताना त्याचवेळी जागतिक वाढीचा दर दोन टक्के राहिला आहे. देशात दुग्धोत्पादनाचे 68 टक्के क्षेत्र असंघटित असल्याने ते संघटित करणे आणि उत्पादनाला चालना देण्याचे प्रयत्न सरकारी पातळीवर केले जात आहे. सध्या देशात डेअरी उत्पादनाचे मूल्य 11.16 लाख कोटी रुपये आहे.

## कायद्यातून पळवाटा

केंद्रीय पशुपालन आणि दुग्धोत्पादन मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, देशात दुभत्या जनावरांच्या संख्येत विक्रमी वाढ झाली आहे. म्हशींची संख्या 10.8 कोटींवरून 11 कोटींवर पोचली आहे. गाईंची संख्या 19.09 कोटींवरून 19.30 कोटींवर पोचली आहे. पशुपालन आणि डेअरी उद्योगातून 12 कोटींपेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. भारतासह अमेरिका, युरोपसारख्या अनेक देशांनी दुधातील भेसळ रोखण्यासाठी कडक कायदे केले आहेत. चीनमध्ये तर फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. भारतासारख्या देशात कायद्यातून पळवाटा शोधल्या जातात. भेसळयुक्त दुधामुळे लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.




मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
डॉ. फेरोज खान इनामदार
नगरसेविका (प्रतीनिधी) प्रभाग क्र. 06 नगरपरिषद, भोकर


मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
रामसिंग भिमराव चव्हाण
नगरसेवक प्रभाग क्र. 08 नगरपरिषद, मुदखेड
अविनाश भिमराव चव्हाण
अनुसया कंस्ट्रक्शन, अनुसया पेट्रोलीयम, भोकर


६५ वर्ष
मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना १९६२ संपादक- केशव घोणसे पाटील
गोदातीर समाचारच्या 65 व्या
वर्धापन दिना निमित्त हार्दिक शुभेच्छा !!
::शुभेच्छूक::
नामदेवराव आयलवाड
भारतीय यादव महासभा महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष
ओ. बी. सी. समन्वय समिती, अध्यक्ष
प्रदेश अध्यक्ष - गोल्ला गोलेवार यादव समाज


मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
दिलीप गुरप्पा सोनवाडे
नगरसेवक प्रभाग क्र. 07 नगरपरिषद, भोकर

दैनिक **गोदातीर समाचार**

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने
व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या
दै. गोदातीर समारच्या
वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

हार्दिक शुभेच्छा!

: शुभेच्छुक :

**डॉ. कांतीलाल इंगळे (डेन्टीस्ट)**
नांदेड

दैनिक **गोदातीर समाचार**

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने
व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या
दै. गोदातीर समारच्या
वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

हार्दिक शुभेच्छा

: शुभेच्छुक :

**प्राचार्य श्री लक्ष्मणराव शिंदे**
सायन्स कॉलेज, नांदेड

दैनिक **गोदातीर समाचार**

स्थापना-१९६२

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी
प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समारच्या
वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

हार्दिक शुभेच्छा!

: शुभेच्छुक :

**स.अजितपालसिंग संधु**
उपायुक्त, मनपा, नांदेड



मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
सौ. वनश्री दिनेश लक्षटवार
नगरसेविका प्रभाग क्र. 05 नगरपरिषद, भोकर





मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
विठ्ठलराव माचनवार
संत गाडगेबाबा ट्रस्ट अध्यक्ष, भोकर
मा. भगवान नारायणराव दंडवे
नगराध्यक्ष-भोकर नगरपरिषद जि. नांदेड





मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
नाजिम मौलाना शेख
नगरसेवक प्रभाग क्र. 10
नगरपरिषद, भोकर
शेख युसुफ
नगरसेविका प्रतीनिधी
प्रभाग क्र. 10 नगरपरिषद, भोकर




मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
सनाओद्दीन इनामदार
नगरसेविका (प्रतीनिधी) प्रभाग क्र. 06 नगरपरिषद, भोकर

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना : १९६२ संपादक : केशव घोणसे पाटील
६५ वर्ष
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
::शुभेच्छूक::
मा. गोविंदराव उल्लेवाड नागापूरकर
शासकीय कंत्राटदार-स्वप्नील कंन्स्ट्रक्शन, भोकर जि. नांदेड



# चर्चा फाशी देण्याऐवजी लिथल इंजेक्शन देण्याची...


**अलीकडे सर्वोच्च न्यायालयात मृत्युदंडाची अंमलबजावणी कशा प्रकारे केली जाते, या विषयावर मोठी चर्चा रंगली. याचे कारण यासंदर्भात दाखल करण्यात आलेली एक जनहित याचिका...**

**ॲड. सई ताजणे**

एका याचिकेत असा मुद्दा मांडण्यात आला आहे की, मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्या गुन्हेगारांना फाशी देण्याऐवजी लिथल इंजेक्शन दिले जावे, जेणेकरून मृत्यूच्या वेळी त्यांच्या वेदना कमी होतील. वकील ऋषी मल्होत्रा यांनी 2017 मध्ये यासंदर्भात याचिका दाखल केली होती. त्यांचे म्हणणे आहे की, फाशीच्या प्रक्रियेत मृत्यू होण्यासाठी 30 ते 40 मिनिटे लागत असून ते अत्यंत वेदनादायी असतात. त्याऐवजी इंजेक्शन दिल्यास मृत्यू तात्काळ होतो आणि यातनाही कमी होतात. अमेरिकेतील 49 राज्यांनी ही पद्धत स्वीकारल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. सरकारच्या वतीने वकील सोनिया माथुर यांनी याबाबतचा युक्तिवाद करताना असे म्हटले आहे की, मृत्युदंडाची पद्धत बदलणे हे न्यायालयाचे नव्हे, तर सरकारचे धोरणात्मक अधिकार क्षेत्र आहे. सरकारच्या मते, इंजेक्शनचा पर्याय व्यवहार्य नाही. तथापि, या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करत सरकार या संवेदनशील विषयावर बदलासाठी तयार नसल्याबाबत ताशेरेही ओढले आहेत. न्यायालयीन चर्चेच्या पलीकडे, हा प्रश्न आता केवळ कायदेशीर न राहता नैतिक आणि मानवी संवेदनशीलतेचा झाला आहे. एका लोकशाही राष्ट्राने आपल्या नागरिकाला जीवनदान देण्याऐवजी मृत्युदंडाचा निर्णय घेण्याचा अधिकार किती योग्य आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

भारतीय दंडसंहितेनुसार हत्या, बलात्कारासह हत्या, दहशतवादी कारवाया यांसारख्या अत्यंत गंभीर आणि दुर्मिळातील दुर्मिळ गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. 1980 मध्ये बच्छनसिंग विरुद्ध पंजाब राज्य या ऐतिहासिक खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की मृत्युदंड हा दुर्मिळातील दुर्मिळ आणि भयंकर गुन्ह्यांमध्येच दिला जावा. पण दुर्मिळातील दुर्मिळ म्हणजे नेमके काय, याचे एकसंध मोजमाप किंवा ठोस निकष आजपर्यंत ठरवण्यात आला नाही. त्यामुळे अनेकदा एका न्यायालयात गंभीर गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली जाते, तर दुसऱ्या न्यायालयात त्याच गुन्ह्यासाठी आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली जाते. ॲमनेस्टी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार 2024 मध्ये भारतातील कनिष्ठ न्यायालयांनी एकूण 139 जणांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली असून ती मागील वर्षाच्या तुलनेत 14 टक्क्यांनी अधिक आहे. पण यातील बहुसंख्य आरोपी गरीब, सामाजिकदृष्ट्या मागास किंवा अल्पसंख्याक समुदायातील आहेत. नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, दिल्लीच्या प्रोजेक्ट 39अ या अहवालानुसार मृत्युदंड ठोठावलेल्यांपैकी सुमारे 74 टक्के कैदी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत, तर 76 टक्के आरोपींकडे उच्च शिक्षण नाही. सर्वांत धक्कादायक म्हणजे मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्यांपैकी 90 टक्क्यांहून अधिक कैदी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा अल्पसंख्याक घटकांतील आहेत. या असमानतेमुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो, असे काहींचे म्हणणे आहे. यामागचे कारण, कायदा सर्वांसाठी समान असावा अशी संविधानाची अपेक्षा आहे, पण वास्तवात सामाजिक आणि आर्थिक दर्जानुसार न्यायाचा तराजू हलताना दिसतो अशी टीका केली जाते.


भारतामध्ये मृत्युदंड ठोठावलेल्या अनेक कैद्यांना फाशीच्या शिक्षेची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. काही कैदी दहा-दहा वर्षे एकांत कोठडीत राहतात. ही केवळ शिक्षा नाही, तर मानसिक छळ आहे असे मानवाधिकारवाद्यांचे म्हणणे आहे. आजघडीला देशातील 56 टक्क्यांहून अधिक कैदी पाच वर्षांहून अधिक काळ फाशीच्या प्रतीक्षेत आहेत. या काळात त्यांचे मनोबल खचते, कुटुंब उद्ध्वस्त होते आणि कायदा त्यांच्यावर मरण्यापूर्वीच मरण्याची वेळ आणतो. सर्वोच्च न्यायालयाने अशा विलंबाबद्दल अनेक वेळा सरकारकडे नाराजी व्यक्त केली आहे. सद्यस्थितीत जगातील 144 देशांनी मृत्युदंडाची शिक्षा पूर्णपणे रद्द केली आहे. केवळ 55 देशांमध्ये तो अद्याप अस्तित्वात असून यापैकी बहुतांश देश आशिया आणि मध्यपूर्वेतील आहेत. चीन, इराण, सौदी अरेबिया, इजिप्त आणि अमेरिका हे देश अजूनही मृत्युदंड देतात. भारतात मृत्युदंडाची शिक्षा अस्तित्वात असली तरी त्याचा वापर अत्यंत मर्यादित आहे. शेवटची चर्चित फाशी 2020 मध्ये निर्भया बलात्कार प्रकरणातील दोषींना देण्यात आली होती. पण भारतात



मृत्युदंड हा प्रत्यक्ष न्यायापेक्षा प्रतिकात्मक अधिक झाला असून कायदे किती कठोर आहेत हे दाखवण्यासाठी ही शिक्षा दिली जाते, अशी टीका होते. वास्तविक, कोणत्याही कायद्यामागचा हेतूच मुळात तो असतो. कठोर शिक्षा दिल्यास समाजात भय निर्माण होते आणि गुन्हे कमी होतात. पण भारतात याबाबत उलट चित्र दिसते. मृत्युदंडाच्या शिक्षा ठोठावण्यात येऊनही हत्या आणि बलात्काराच्या गुन्ह्यांत घट झाली नाही. हाच धागा पकडून फाशी किंवा मृत्युदंड हा गुन्ह्यांना आळा घालण्यास प्रभावी नाही अशी मांडणी केली जाते. पण या शिक्षेचा प्रभाव समाजावर न पडण्याचे कारण म्हणजे आपल्याकडे शिक्षा ठोठावल्यानंतर तात्काळ त्याची अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे बलात्कार, दहशतवादी हल्ला यांसारखे विषय जेव्हा ज्वलंत ठरलेले असतात तेव्हा लोकांचा कायद्यांकडून भ्रमनिरास होतो. काही प्रकरणात तर फाशीची शिक्षा सुनावण्यात येऊनही अनेक वर्षांनंतर दयेचा अर्ज मंजूर करून आरोपींना सोडण्यात येते किंवा त्यांची शिक्षा जन्मठेपेत बदलण्यात येते. अशा घटनांमुळे फाशीच्या शिक्षेचे गांभीर्य कमी होत गेले आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेही अनेक वेळा जगभर मृत्युदंडाला स्थगिती देण्याची शिफारस केली आहे. न्याय हा केवळ प्रतिशोधासाठी नसावा. न्यायाचे उद्दिष्ट समाजात सुधारणा आणि पुनर्निर्मिती असावे. मृत्युदंड दिल्यास गुन्हेगाराला सुधारणेची कोणतीही संधी दिली जात नाही, असे मत यासंदर्भात मांडले जाते.

## मानवी मूल्यांची प्रतिष्ठा

केंद्र सरकारने अलीकडे न्यायव्यवस्थेत काही सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार दया याचिकेवर निर्णय घेण्यासाठी 18 महिन्यांची मर्यादा ठेवली आहे, जेणेकरून कैदी अनिश्चित काळ प्रतीक्षेत राहू नयेत. हा एक सकारात्मक बदल आहे. पण आता सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार येत्या काळात फाशीच्या शिक्षेबाबत सरकार बदलांची भूमिका घेणार का हे पहावे लागेल. जगातील बहुसंख्य लोकशाही राष्ट्रांनी मृत्युदंड रद्द केला असून तेथे गुन्हेगारीत वाढ झालेली नाही. उलट, शिक्षण, पुनर्वसन आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांमुळे गुन्हे कमी झाले आहेत. त्यामुळे मृत्युदंड रद्द करणे म्हणजे गुन्ह्यांना प्रोत्साहन देणे नाही; तर मानवी मूल्यांची प्रतिष्ठा जपणे आहे, असे फाशीची शिक्षा नको असे म्हणणाऱ्या वर्गाचे म्हणणे आहे.



## मंथन होण्याची गरज

यासंदर्भातील दोन मतप्रवाहांचा विचार पाहता, फाशीची शिक्षा असावी की नसावी याबाबत एकदाच व्यापक मंथन होण्याची गरज आहे हे निश्चित. पण लिथल इंजेक्शनचा जो पर्याय सध्या पुढे आला आहे तोही वेदनादायी नाहीये असे मानण्याचे कारण नाही. वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जर या प्रक्रियेमध्ये सदर व्यक्ती पूर्णपणे बेशुद्ध झाली नाही तर तिला प्रचंड वेदना होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये असे दिसूनही आले आहे. तसेच लिथल इंजेक्शन हे वेदनारहित नसतेच. ज्या अमेरिकेत याचा वापर केला जातो तेथील संविधानानुसारही कैद्याला वेदनारहित मृत्यूची हमी दिलेली नाही. त्यामुळे भारत सरकारचे म्हणणे आहे की फाशीच्या पर्यायाचा विचार करता येईल, पण सध्या लिथल इंजेक्शनसारख्या तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या आणि महागड्या प्रक्रियेचा अवलंब करणे व्यवहार्य नाही. म्हणूनच, भारतात सध्या फाशी हीच मृत्युदंडाची एकमेव कायदेशीर पद्धत कायम ठेवण्यात आली आहे.

# व्हिडिओग्राफी हा मूलभूत अधिकार?

**सर्वसाधारणपणे छायाचित्रण किंवा व्हिडिओग्राफीचा मुद्दा हा पोलीस स्टेशन, चौकी, सार्वजनिक रस्त्यांवरील वाहतूक पोलिसांची कारवाई किंवा महापालिका, नगरपालिका यांच्याशी संबंध असलेल्या कार्यालये येथे सर्वाधिक चर्चेत असतो. अशा ठिकाणी पोलीस आणि इतर सरकारी कर्मचाऱ्यांकडून दमदाटी करून नागरिकांना छायाचित्रण किंवा व्हिडिओग्राफी करण्यास मनाई केली जाते. अशाप्रकारचा अनुभव अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांना अनेकदा सरकारी कार्यालयांमध्ये आल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. सरकारी नोकरीतून मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करून लोकांना दमदाटी करून धमकाविण्याचे प्रकार भारतात अगदी सामान्य झाले आहेत. त्यातच जर लोकांना कायद्याचे ज्ञान नसेल तर पिळवणूकही अधिकच होते.**





**ॲड. अनिल पाटील**

आपल्यापैकी जे लोक सामाजिक किंवा राजकीय कार्यांमध्ये सहभागी आहेत त्यांनीही असा अनुभव अनेकदा घेतला असेल. सर्वसामान्य नागरिकांना खाकीची आणि बळाची भीती दाखवून पोलीस किंवा इतर सरकारी कर्मचाऱ्यांकडून सार्वजनिक ठिकाणी व्हिडिओग्राफी करण्यास अनेकदा मज्जाव करण्यात आल्याचे दिसून आले आहे.

भारत हा लोकशाहीप्रधान देश असून भारतीय राज्यघटनेने कायद्याचे राज्य ह्या संकल्पनेचा स्वीकार केला आहे. कायद्याचे राज्य या शब्दाचा दुसरा अर्थ असा होतो की, जी गोष्ट करणे कायद्याच्या कोणत्याही पुस्तकात गुन्हा ठरत नाही ती करण्यापासून तुम्हाला कोणीही अडवू शकत नाही. कायद्याचे राज्य ह्या संकल्पनेबरोबरच पारदर्शक कारभाराचे तत्त्व भारताने स्वीकारल्यामुळे राज्यकारभारातील प्रत्येक गोष्ट ही सामान्य जनतेला माहीत असणे आवश्यक असून जनतेची त्यापर्यंत पोहोच असणे अपेक्षित आहे. परिणामी, पारदर्शक कारभाराला चालना देण्यासाठी अनेक न्यायालयांनी आपल्या दैनंदिन कामकाजाची व्हिडिओग्राफी करून आपल्या अधिकृत संकेतस्थळावर टाकण्यास सुरुवात केली आहे. देशातील विविध उच्च न्यायालयांनी सरकारी कार्यालयातील आणि सार्वजनिक ठिकाणी विशिष्ट हेतूंसाठी नागरिकांनी केलेली व्हिडिओग्राफी ही नागरिकांच्या मूलभूत अधिकारांशी जोडली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या भाग 3 मधील कलम 19 हे व्यक्तीस्वातंत्र्याविषयी भाष्य करते. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात व्हिडिओग्राफी करणे हे व्यक्तीच्या कलम 19 अंतर्गत येणाऱ्या व्यक्तीस्वातंत्र्याचा भाग आहे. अधिकारांबाबत बोलताना एक गोष्ट समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे की, कोणताही अधिकार हा अनिर्बंध नसतो. त्याला कायद्याचे काही निर्बंध असतात. त्यामुळे राज्यघटनेने किंवा संसदेचे किंवा विधिमंडळाच्या कायद्याने मिळालेले अधिकार हे काळजीपूर्वक वापरणे आवश्यक आहे. थोडक्यात, एखाद्या गोष्टीची व्हिडिओग्राफी करणे कायद्याने गुन्हा नाही. परंतु, ती करीत असताना काही कायदे आणि नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा तो फौजदारी स्वरूपाचा गुन्हा ठरू शकतो.

## सार्वजनिक ठिकाण या शब्दाचा अर्थ

मालमत्ता या सार्वजिक आणि खासगी अशा दोन स्वरुपाच्या असतात. खासगी मालमत्ता म्हणजे अशी मालमत्ता ज्यावर एखाद्या व्यक्तीची, कुटुंबाची किंवा गटाची किंवा अशा कोणत्याही एका प्रकाराची मालकी आहे ज्याचा सरकारी मालकीशी काही संबंध नाही. तर सार्वजनिक मालमत्ता म्हणजे अशी मालमत्ता ज्यावर सर्वांचा अधिकार आहे. किंवा अशी मालमत्ता जेथे सर्वांना मुक्त प्रवेश आहे. सार्वजनिक मालमत्तेमध्ये सर्वसाधारणपणे सरकारी मालमत्ता, उद्यान, बगीचे, खेळाची मैदाने, प्रार्थना स्थळे, उपहारगृहे आणि इतर गोष्टींचा समावेश होतो. सरकारी कार्यालये उदाहरणार्थ, लष्कर, गुप्तचर यंत्रणा, विज्ञान, अर्थकारण आणि इतर संबंधित अनेक विभाग येतात जे राष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहेत अशा ठिकाणी कोणत्या प्रकारची चित्रीकरण किंवा व्हिडिओग्राफी करणे हे सक्तीने निषिद्ध असते. अशा संवेदनशील ठिकाणी आपण घटनेचा कलम 19चा वापर करून चित्रीकरण किंवा व्हिडिओग्राफी करू शकत नाही. उपहारगृहे, बगीचे, खेळाची मैदाने अशा सार्वजनिक ठिकाणी अनेकदा व्हिडिओग्राफी केली जाते जी कायद्याला मान्य आहे. परंतु, ती करीत असताना अनेकदा आजूबाजूचे लोक आणि त्यांचे हावभाव कळतनकळत व्हिडिओमध्ये रेकॉर्ड होत असतात. अशा वेळी आजूबाजूच्या लोकांपैकी जर कोणी व्हिडिओग्राफी किंवा छायाचित्रणावर आक्षेप घेतला तर तो व्हिडिओ किंवा छायाचित्रण जागच्या जागी नष्ट करणे कायद्याने बंधनकारक आहे. कारण आपल्या चित्रीकरणामुळे इतरांच्या खासगीपणाच्या अधिकारांवर निर्बंध येऊ शकतात. दुसरीकडे सार्वजनिक ठिकाणी धोकादायक पद्धतीने उदाहरणार्थ, रेल्वेमध्ये किंवा रेल्वेच्या रेलिंगला लटकून, चालत्या बसमध्ये किंवा कारमध्ये किंवा इतर कोणत्याही प्रकारे ज्यामुळे स्वतःच्या किंवा इतरांच्या जीवितास किंवा मालमत्तेस धोका उत्पन्न होईल अशाप्रकारची सर्व व्हिडिओग्राफी सार्वजनिक ठिकाणी जरी असली तरी कायद्याने गुन्हा आहे.

## रिल आणि व्हिडिओग्राफी

एखाद्या गोष्टीचे अथवा घटनेचे छायाचित्रण करणे किंवा व्हिडिओग्राफी करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. सार्वजनिक ठिकाणी समाजमाध्यमांवरील लाइक आणि शेअर्ससाठी लोकांची थट्टामस्करी करणे, अश्लील हावभाव किंवा नृत्य करणे, लोकांना घाबरविणे किंवा इतर काही प्रकार करून समाज माध्यमांवर प्रसारित करण्याचे प्रकार सध्या मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. अशा प्रकारच्या सर्व घटना ह्या ज्या व्यक्तीसंबंधीत केल्या आहेत त्याची पूर्व किंवा नंतर परवानगी न घेता रेकॉर्ड करणे किंवा रेकॉर्ड करून समाज माध्यमांवर प्रसारित करणे दंडणीय स्वरुपाचे अपराध आहेत. अशा वेळेच्या ज्या व्यक्तीबरोबर विनोद केला आहे त्याची कोणती परवानगी न घेता व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रासारित केला जातो अशाप्रकारची सर्व कृती ही दिवाणी आणि फौजदारी प्रकरणाच्या खटल्यांमध्ये समाविष्ट होऊ शकते. कोणत्याही व्यक्तीची परवानगी न घेता त्या व्यक्तीची व्हिडिओग्राफी करणे किंवा छायाचित्रण करणे आणि ते समाज माध्यमांवरती प्रसारित करणे हा कायद्याने गुन्हा आहे. किंबहुना एखाद्या व्यक्तीने छायाचित्रणाला किंवा व्हिडिओग्राफीसाठी परवानगी दिली असेल पण समाज माध्यमांवर प्रसारित करण्यासाठी दिली नसेल तर त्याच्या परवानगीशिवाय समाज माध्यमांमध्ये प्रसारित केलेले व्हिडिओ, छायाचित्रे आणि इतर गोष्टी या माहिती आणि तंत्रज्ञान (दुरुस्ती) अधिनियम, 2008 अंतर्गत गुन्हा आहेत. परंतु, हा नियम सरकारी कर्मचाऱ्यांच्याबाबतीत लागू होत नाही. आपल्या कर्तव्यावर असताना (ऑन ड्युटी) कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याची (काही सुरक्षाविषयक अपवाद सोडून) व्हिडिओग्राफी कायद्याने गुन्हा नाही. अशा ठिकाणी कायदा स्त्री-पुरुष असा भेद करीत नाही. अनेकदा कॅमेरा किंवा मोबाइल हिसकावून घेण्याचे प्रकारसुद्धा केले जातात. अशावेळी भारतातील कायद्याच्या पुस्तकातील कोणते कलम अशा प्रकारची व्हिडिओग्राफी किंवा छायाचित्रण करण्यात मनाई करीत नाही. आपल्या सुरक्षेसाठी किंवा कायदेशीर पुरावा म्हणून जर कोणी व्हिडिओग्राफी करीत असेल तर ते संपूर्णपणे कायद्याला मान्य असून असे करीत असताना सरकारी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची बेअदबी होणार नाही किंवा त्यांना त्यांच्या कामात अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेणे मात्र आवश्यक आहे.

# शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याचे स्वप्नं!

**शेतकऱ्यांसाठी आम्ही भरभरून देत असून यामुळे शेतकऱ्यांच्या घरात जणू लक्ष्मी पाणी भरत आहे, अशा आविर्भावात नेते जी भाषणबाजी करतात, ती फोल आहे, बेगडी आहे. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर आदी शहरांचा विकास होत असतानाच महाराष्ट्रातलाच काही भाग हा जगामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत ओळखला जाऊ लागला हे चित्र सन्मानजनक नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या हिमनगाचे टोक आहेत. आज संपूर्ण शेतीच धोक्यात आलेली आहे, याचा विचार महाराष्ट्राचे नवे व्हिजन मांडताना इथल्या लोकप्रतिनिधींनी, समाजाने आणि सरकारने करायला हवा...**

**सौरभ अन्नदाते**

भारतीय संविधानानुसार शेती हा राज्यांचा विषय असला तरी शेतीचे सर्व महत्त्वाचे प्रश्न केंद्र सरकारच्या अधिकारात आहेत. राज्य आणि केंद्र यांनी एकत्र मिळूनच शेतकऱ्यांच्या प्रश्नांना हात लावला तर ते सुटू शकतात आणि शेती फायद्याची होऊ शकते. हीच बाब स्वामिनाथन आयोगानेही मांडली आहे. शेती हा सर्वसमावेशक विषयांमध्ये यायला हवा, अशी शिफारस त्यांनी केली. पण दुर्दैवाने एकही राजकीय पक्ष याबाबत विचार करत नाही. कारण प्रत्येक पक्षाला शेती ही आपल्या अधिकाराखाली असायला हवी असे वाटते. परंतु हे शक्य नाही. कारण हमीभावापेक्षा अधिक भाव देता येणार नाही असे केंद्र सरकारकडून बऱ्याचवेळा



सांगण्यात आले आहे. एमएसपीपेक्षा अधिक भाव देऊन शेतमाल खरेदी करत असाल तर त्याची जबाबदारी केंद्र सरकारकडे असणार नाही, असेही सांगितले आहे. आजघडीला जगभरातील विकसित देशांमध्ये कुठेही शेतकरी सरकारी मदतीशिवाय जगत नाही. त्यामुळे देशात होणाऱ्या विकासासोबत शेतकऱ्याला आणि ग्रामीण जनतेला उभे करायचे असेल तर त्याला बाजारव्यवस्थेवर सोडून चालणार नाही. शेतीला सरकारी संरक्षण देण्याची जबाबदारी राज्यांना पार पाडावी लागेल.

ज्याप्रमाणे वेतन आयोगाच्या माध्यमातून सरकारी कर्मचाऱ्यांना आर्थिक सुरक्षा दिली जाते त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतमजुरांना उत्पन्नाचा आधार द्यावा लागेल. केंद्र सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची भाषा करताहेत. पण ते कधी दुप्पट होणार हा संशोधनाचा विषय आहे. कारण शेतीचे उत्पन्न आणि शेतीवर होणारा खर्च याचे गणित जुळत नाही. कारण उत्पन्न थोडेफार वाढले तर खर्च मात्र भरमसाठ झालेला असतो. उद्या जर जगात गव्हाचे भाव पडले तर भारतात भाव पडायला वेळ लागणार नाही. त्या स्थितीत खते, किटकनाशके, वाहतूक यांच्या दरवाढीमुळे वाढलेल्या उत्पादनखर्चाचा ताळमेळ शेतकरी कसा बसवणार? तेव्हा ग्रामीण भागामध्ये केवळ शेतीचे उत्पादन वाढवून चालणार नाही तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

स्थापना-१९६२
गोदातीर समाचार
६५ वर्षे
मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
वर्धापन दिन-२०२६

# दैनिक गोदातीर समाचार

## वर्धापन दिन

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी
प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समारच्या
वर्धापन दिनानिमित्त वाचकांना


**हार्दिक शुभेच्छा...!**

--------- : शुभेच्छुक : ---------

**विनोद हामणे, नांदेड**


आपणास शिवनेरीची श्रीमंती लाभो
रायगडाची भव्यता, पुरंदराची दिव्यता लाभो
सिंहगडाची शौर्यता आणि सह्याद्रीची उंची लाभो
हीच ईश्वरचरणी प्रार्थना!
श्री संत बाळगीर महाराज
शिक्षण संस्था, कापसी (गुंफा) चे
अध्यक्ष, आदरणीय
मोहनराव पाटील सुगावकर
यांना वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा!
व्ही.एम.ताटे
मुख्याध्यापक
एस.एच.कानगुलकर सहशिक्षक
पी.टी उलगुलवाड सहशिक्षक
एम.एम.भत्ते सहशिक्षक
एन.बी.सुपलकर सहशिक्षक
बालाजी पा. वडजे
माजी सदस्य, पं.स.नायगाव
डी.सी.आळणे सहशिक्षक
एन.पी.चोपवाड सहशिक्षक
आर.जे.शिंदे लिपीक
एन.एस.आकरगे सेवक
प्रकाशक : श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, येलूर ता.कंधार


जीवेत शरदः शतम्।
वाढदिवस शुभचिंतन!
श्री संत बाळगीर महाराज
शिक्षण संस्था, कापसी
(गुंफा) चे अध्यक्ष
आदरणीय
मोहनराव पाटील सुगावकर
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
डी.एच.शिंगडे सहशिक्षक
सौ.एम.एस.जाधव सहशिक्षिका
एस.टी.जाधव सहशिक्षक
डी.एम.जाधव सहशिक्षक
एच.के.धुंदी सहशिक्षक
जी.जी.साखरे सहशिक्षक
शेख मुमताज जावेद सेविका
बालाजी पाटील शिंदे
डी. बी शिंदे
बी.के.अन्नपूर्वे
मुख्याध्यापक
प्रकाशक :
श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल,
कहाळा (खु.) ता.नायगाव


उगवता सूर्य आपणांस
आशीर्वाद देवो,
बहरलेली फुले आपणास
सुगंध देवो व परमेश्वर आपणास
सदैव सुखात ठेवो..!
श्री संत बाळगीर महाराज शिक्षण
संस्था, कापसी (गुंफा) चे अध्यक्ष
आदरणीय
मोहनराव पाटील सुगावकर
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
जीवेत शरदः शतम्।
शुभेच्छुक
डॉ.भगवान यशवंतराव जाधव
एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.,डी.एन.बी. (मुंबई)
प्रसुती व स्त्रीरोग तज्ज्ञ
डॉ.सौ.अर्चना भगवान जाधव
बी.ए.एम.एस., सी.सी.एच., सी.जी.ओ., (मुंबई)
स्त्रीरोग, बालरोग व जनरल फिजीशियन


2026 HAPPY NEW YEAR
हे नवीन वर्ष आपणांस
व आपल्या परिवारास आरोग्य,
सुखसमृद्धी व भरभराटीचे जावो
हिच ईश्वर चरणी प्रार्थना
नववर्षाच्या
खूप-खूप शुभेच्छा!
नव्या क्षितिजावर, नवी पहाट फुलावी
नव्या नव्या स्वप्नांची वाट दिसावी
लोकसेवा सदैव तुमच्या हातून घडावी
प्रगतीची नवी दिशा दिसावी
दैनिक गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
मन:पूर्वक शुभेच्छा!
डॉ.मीनल निरंजन पाटील खतगावकर
प्रदेश उपाध्यक्षा, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
माजी सदस्या, जिल्हा परिषद,नांदेड
जिल्हा समन्वयक, नांदेड दक्षिण ग्रामीण,रा.कॉं.पा.

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा !
प्रो.प्रा.जगन्नाथ चक्रावार
मो. 9422173548, 8975736997
चक्रावार
बिल्डर्स अँड डेव्हलपर्स
ऑफिस : २६, गुरूनानक मार्केट, जी.जी.रोड, नांदेड ४३१६०१ ■ मो. ८८३०१०५८९०

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
दैनिक गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा !
- शुभेच्छुक -
एक शुभेच्छूक
जिल्हा परिषद, नांदेड.

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
दैनिक गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
आता रुग्ण नसेल लाचार, आजारावर होईल मोफत उपचार
डॉ. बालाप्रसाद धोंडगे यांचे
विवेकानंद बालरुग्णालय
पत्ता : विवेकानंद बालरुग्णालय बसस्टॅन्ड समोर, डॉ. लेन नांदेड
प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रति कुटूंब प्रति वर्ष 5 लाख रक्कमेपर्यंत मोफत उपचार
महात्मा ज्योतिराव फुले योजने अंतर्गत खालील आजारांचे मोफत इलाज होईल
■ नवजात बालकांचे अतिदक्षता विभाग
■ कमी दिवसाचे आणि कमी वजनाच्या बाळांचे आजार. ■ जन्मजात बालकांचा श्वासाचा इलाज.
■ नवजात बालकांनी गर्भामध्ये संडास केल्यानंतर ■ उद्भवलेल्या आजारांसाठी
■ जन्मजात बाळांचे कावीळ ■ नवजात बालकांना संसर्ग दोष ■ जन्मजात बाळ त्वरीत न रडल्यास
■ नवजात बालकांचे हृदयरोग ■ नवजात बालकांचे झटक्यांचे आजार
लहान बालकांचा (PICU) : ■ हृदयरोग, किडनी, मेंदू (झटके/मिरगी), रक्ताचे आजार
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना उपलब्ध.
Ph. 02462-247042 ■ M. 9146047042

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
दैनिक गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा !
डॉ.रमेश रेंगे
एम.डी.,(बालरोग), डी.सी.एच. बालरोग तज्ञ
डॉ.सौ.सविता रमेश रेंगे
एम.बी.बी.एस., डी.सी.पी. पॅथॉलॉजीस्ट
रेंगे हॉस्पिटल
शिवाजी नगर, वाडिया फॅक्टरी मोरे हॉस्पिटल जवळ, अश्विनी हॉस्पिटलच्या मागे, भगवती हॉस्पिटल मार्ग, नांदेड
मो. 7744889552, 7218201055

शिक्षक सेना नांदेडच्या वतीने
मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
दैनिक गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा !
■ विठुभाऊ चव्हाण राज्य उपाध्यक्ष
■ संतोष अंबुलगेकर जिल्हाध्यक्ष
■ रवि बंडेवार जिल्हा सरचिटणीस
गंगाधर कदम, मनोहर भंडेवार, मुस्तफा शेख, अविनाश चिद्रावार, बालाजी राजूरवार, अनिरुद्ध सिरसाळकर, प्रकाश कांबळे, खांडरे मॅडम, शिवकन्या पटवे, शोभा गिरी, पंचफुला वाघमारे, संजय मोरे

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
दैनिक गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा !
- शुभेच्छुक -
श्री सिद्धिविनायक हॉस्पिटल
मॅटर्निटी व ट्रॉमा - ॲक्सिडेंट सेंटर
डॉ. विनय साहेबराव मोरे
M.B.B.S., D.Ortho (अस्थिरोग तज्ञ)
मो. ९२७०८७२२६०
डॉ. स्मिता विनय मोरे
M.B.B.S., D.G.O.
स्त्रीरोग, प्रसूती व वंध्यत्व निवारण तज्ञ
आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
वाडीया फॅक्टरी, शिवाजी नगर, नांदेड. ■ फोन : 02462-233674

लोकाभिमुख पत्रकारितेमुळे वाचकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा !
शुभेच्छुक
अधिकारी व कर्मचारी वृंद
जिल्हा परिषद, नांदेड




**भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्राने आपला लवचिकपणा सिद्ध केला आहे. एप्रिल-सप्टेंबर २०२५ दरम्यान देशाची वस्त्रोद्योग, तयार कपडे आणि हस्तकला उत्पादनांची निर्यात मागील वर्षाच्या तुलनेत ०.१ टक्क्यांची महत्त्वपूर्ण वाढ दर्शवते. अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत घट झाली तरी, इतर देशांमधील मजबूत कामगिरीमुळे त्याचा परिणाम कमी होण्यास मदत झाली. त्यातून या क्षेत्राच्या वैविध्यपूर्ण बाजारपेठेचे सामर्थ्य अधोरेखित होते.**

# वस्त्रोद्योगाच्या बाजारपेठेत वेगवान हालचाली

**परामर्श**

**हेमंत देसाई**, ज्येष्ठ पत्रकार

वस्त्रोद्योग मंत्रालय निर्यातदारांशी, विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांशी संपर्कात राहिले आहे. जेणेकरून शुल्काशी संबंधित आव्हाने समजून घेता येतील आणि भारताची स्पर्धात्मकता जपली जाईल. या बाह्य दबावांदरम्यान, स्थिरता आणि वाढीचा एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून तामिळनाडू उदयास आले. देशातील सर्वात महत्त्वाचे वस्त्रोद्योग निर्यातदार राज्य म्हणून तामिळनाडूने निर्यातीमध्ये २.६ टक्क्यांनी वाढ नोंदवली आहे. एप्रिल-सप्टेंबर २०२४ मधील ३,९७५.०४ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सवरून याच कालावधीत यंदा ती ४,०७८.०६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. राज्यातील तिरुपूर, करूर, इरोड, कोईम्बतूर आणि सेलम यासारख्या चैतन्यपूर्ण वस्त्रोद्योग केंद्रांनी एकत्रितपणे ११.४ टक्क्यांची प्रभावी निर्यात वाढ साध्य केली आहे. भारताचे अग्रगण्य निटवेअर केंद्र असलेल्या तिरुपूरला सरकारने दिलेल्या तात्पुरत्या आयात शुल्कमाफीचा विशेष फायदा झाला. त्यामुळे कच्च्या मालाच्या किमतींवरील दबाव कमी झाला. 'पीएम मित्र पार्क'च्या विकासामुळे आधुनिक, एकात्मिक उत्पादन परिसंस्था तयार होत आहेत, तर एमएमएफ वस्त्रोद्योग आणि तांत्रिक वस्त्रोद्योगांसाठीच्या उत्पादन-संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजनेतील सुधारणांमुळे पात्र उत्पादनांची व्याप्ती वाढली असून अनुपालन प्रक्रिया सुलभ झाली आहे. त्यामुळे जलद गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळत आहे. दरम्यान, राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग अभियान नावीन्यपूर्णता आणि उच्च-मूल्याच्या संशोधन व विकासाला चालना देत आहे. त्यामुळे भारताला पुढील पिढीच्या वस्त्रोद्योग श्रेणींमध्ये आघाडी मिळत आहे. खर्च कपातीच्या उपायांनीही यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कापसावरील आयात शुल्कातून मिळालेल्या सवलतीमुळे तामिळनाडूसारख्या कापूस-केंद्रित क्लस्टर्ससाठी, उत्पादन खर्चावरील दबाव कमी झाला आहे. वस्त्रोद्योग मूल्य साखळीतील जीएसटीच्या सुसूत्रीकरणामुळे रोख प्रवाहामध्ये सुधारणा झाली आहे आणि संरचनात्मक अकार्यक्षमता कमी झाली आहे. त्यामुळे उत्पादकांना स्पर्धात्मक राहण्यासाठी वाव मिळाला आहे. सवलती आणि प्रोत्साहनांव्यतिरिक्त भारत पारंपरिक प्रदेशांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने ४० देशांच्या विविधीकरण धोरणाद्वारे आपली बाजारपेठेतील पोहोच वाढवत आहे. निर्यातदार, विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना निर्यातदारांसाठी असलेल्या क्रेडिट गॅरंटी योजनेचा अधिक फायदा होत आहे, जी वीस हजार कोटी रुपयांपर्यंतच्या अतिरिक्त कर्जासाठी शंभर टक्के संरक्षण प्रदान करते. गुंतागुंतीची जागतिक परिस्थिती असूनही भारताचे वस्त्रोद्योग क्षेत्र २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात स्थिर वाढीसह प्रवेश करत आहे. त्याला सक्रिय धोरणात्मक पाठिंबा आणि प्रमुख उत्पादन क्लस्टर्सच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे बळकटी मिळाली आहे. तामिळनाडूची मजबूत दोन अंकी क्लस्टर वाढ या क्षेत्राची चपळता आणि अनुकूलतेचा पुरावा आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर भारत एक विश्वसनीय आणि स्पर्धात्मक पुरवठादार म्हणून आपली स्थिती मजबूत करत आहे. भारताची वस्त्रोद्योगाची गाथा लवचिकता, धोरणात्मक कृती आणि नूतनीकरण केलेल्या आत्मविश्वासाची आहे, जी आगामी वर्षांमध्ये अधिक मजबूत स्पर्धात्मकता आणि जागतिक नेतृत्वासाठी पाया तयार करत आहे.

भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत ९० रुपयाच्या पुढे गेल्यामुळे बाजारपेठेत चिंता निर्माण झाली आहे. मात्र भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा 'चिंता की कोई बात नहीं' अशा पवित्र्यात आहेत. व्यापार आणि पोर्टफोलिओ गुंतवणुकीमधील भारतातील रोजगारकेंद्रित निर्यातीला प्रोत्साहनच मिळणार आहे. रुपया आपला मार्ग स्वतःच तयार करेल. रुपयाबाबत होणारी चर्चा जुन्या परिस्थितीनुसार न पाहता, सध्याच्या आर्थिक वास्तवाच्या आधारावर पाहिली पाहिजे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे. देशाची अर्थव्यवस्था समर्थ असते आणि विकासदर वेगवान असतो, तेव्हा रुपया-डॉलर विनिमयदराचा अन्वयार्थ त्या संदर्भात लावला पाहिजे, यावर अर्थमंत्र्यांचा भर आहे.





मंदी आणि भारत-अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापारी करार रेंगाळल्यामुळे, आपल्या चलनावर सध्या दबाव निर्माण झाला आहे. डॉलर हे जगातील सर्वात प्रभावशाली आणि महत्त्वपूर्ण असे चलन आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात त्याचेच मोल आहे. परदेशातून आपण पेट्रोल, खते, सोने, इलेक्ट्रॉनिक्स आणि यंत्रसामग्रीचे भाग मोठ्या प्रमाणावर आयात करतो. त्याचप्रमाणे कच्चे तेल, खाद्य तेल आणि डाळी यांची प्रचंड प्रमाणात आयात केली जाते. डॉलर तेजीत गेल्यामुळे या सर्व वस्तू महागल्या आहेत. वस्तूंच्या किमतीत भर पडत आहे आणि यापुढेही काही महिने तरी तशीच स्थिती राहणार आहे. परदेशी शिक्षण, प्रवास आता अधिक खर्चिक बनला आहे. कॉम्प्युटर, लॅपटॉप यांच्या किमती वाढणार आहेत. परंतु प्रमुख जागतिक चलनांच्या तुलनेत रुपयाची घसरण अर्थव्यवस्थेसाठी चांगली आहे, असे नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष राजीवकुमार यांनी म्हटले आहे. यामुळे

रुपया कमकुवत होतो, तेव्हा सामान्यतः निर्यातदारांना त्याचा फायदा होतो. अशा वेळी अमेरिकेने अनेक आयातवस्तूंवर शुल्क लावले असताना केवळ याच एकमेव कारणामुळे रुपयाची घसरगुंडी फायद्याच्या स्वरूपात मांडणे, हा तर्कदेखील योग्य नव्हे, असेही अर्थमंत्र्यांचे मत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या ठोकळ राष्ट्रीय उत्पादनाची, म्हणजेच जीडीपीची वाढ दुसऱ्या तिमाहीमध्ये ८.२ टक्क्यांवर पोहोचली असून ऑक्टोबर २०२५ मध्ये किरकोळ महागाई दर पाव टक्क्यांवर आला आहे. आज भारताची आर्थिक स्थिती अनेक मोठ्या देशांच्या तुलनेत बरी आहे, हे देखील खरे आहे. भारत- अमेरिका व्यापारी कराराच्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात अद्याप पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे नेमके किती शुल्क लावले जाणार आहे, याबद्दल अनिश्चितता आहे. त्यामुळे येत्या उन्हाळ्यासाठी अपेक्षित ऑर्डर्स भारतीय परेल उत्पादकांना अद्याप मिळालेल्या नाहीत. या ऑर्डर्स अर्थातच बांगलादेश, व्हिएतनाम आणि चीनकडे जाऊ शकतात. कारण अमेरिकेने सध्या तरी भारतावर ५० टक्के शुल्क लावलेले आहे. या अन्य देशांवरील शुल्क मात्र भारताच्या तुलनेत कमी आहे. एकदा का भारतीय बाजारपेठेकडे अमेरिकेतील आयातदारांनी पाठ फिरवली, की तेथील तयार कपड्यांची बाजारपेठ भारताच्या हातातून कायमची जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारताने रशियाकडून तेलाची खरेदी घटवली असल्यामुळे उद्या अमेरिकेने २५ टक्के शुल्क उठवले, तरीदेखील भारताच्या दृष्टीने परिस्थिती थोडीफार अनुकूल होऊ शकेल. दुर्दैवाची गोष्ट अशी की, भारत-अमेरिका व्यापारी करार होणार आहे की नाही, हेही माहीत नसल्यामुळे भारतातील उत्पादक नेमके काय करावे या विवंचनेत आहेत. करार होणारच नसेल, तर ताबडतोब अमेरिकेकडचे लक्ष हटवून उत्पादक अन्य बाजारांकडे लक्ष केंद्रित करू शकतील.

२०२४ मध्ये भारताने अमेरिकेला १०.३ अब्ज डॉलरचे कपडे आणि कापडांची निर्यात केली होती. भारताच्या एकूण निर्यातीत कापड व कपड्यांचा वाटा आठ टक्के इतका आहे. कापड व कपडे यांचा ९० टक्के कच्चा माल हा भारतातूनच उपलब्ध होतो. भारतात तामिळनाडूतील तिरूपूर येथे तयार कपड्यांचे असंख्य कारखाने आहेत. परंतु तेथे सध्या फारशा ऑर्डर्स नसल्यामुळे दिवाळीच्या सुट्टीनिमित्त गावी गेलेले हजारो कामगार परत आलेलेच नाहीत. तिरुपूरमधील ४० टक्के माल हा अमेरिकेकडे रवाना केला जात असतो. तेथूनच अमेरिकेला वर्षाला १४ हजार कोटी रुपयांची निर्यात होते. त्यापैकी उन्हाळ्यातील कपड्यांची निर्यात ७००० कोटी रुपयांची असते. अमेरिकेच्या वाढीव शुल्कामुळे अमेरिकन बाजारपेठेतील भारतातील तयार कपड्यांच्या किमती जास्त आहेत. म्हणूनच अन्य देशांच्या इतक्याच किमती ठेवण्यासाठी सरकारने अनुदान द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

भारताने आपली कापड निर्यात वाढवण्यासाठी ब्रिटन, जपान आणि दक्षिण कोरियासह ४० प्रमुख देशांशी बोलणी सुरू केली आहेत. या देशांची एकत्रित कापड आयात ५०९ अब्ज डॉलरची आहे. त्यामुळे अमेरिकेचे दरवाजे बंद झाल्यास, भारतीय निर्यातदारांसाठी नवीन दरवाजे खुले होऊ शकतात. सध्या या पर्यायी बाजारपेठेत भारताचा वाटा फक्त पाच ते सहा टक्के आहे. तो वाढवणे शक्य आहे. तयार कपड्यांची जागतिक बाजारपेठ सतत विस्तारत आहे. गेल्या वर्षी १.२ ट्रिलियन डॉलर किंमतीच्या कपड्यांची संपूर्ण जगात विक्री झाली. कपड्यांची फॅशन सतत बदलत असते. नायका आणि अदिदास हे ब्रँड्स जागतिक बाजारपेठेत आघाडीवर आहेत. चीनसारख्या कंपन्याही प्रभावी आहेत. त्याचप्रमाणे सेकंडहँड कपड्यांची बाजारपेठही प्रचंड आहे. ऑनलाइन विक्रीमुळे ग्राहकांना कपडे खरेदी करणे सोपे झाले आहे. स्वस्त आणि दर्जेदार नीटवेअर उत्पादनांसाठी बांगलादेश प्रसिद्ध आहे. सुती, रेशमी आणि हस्तकलेच्या वस्त्रांसाठी भारत प्रसिद्ध आहे. पाकिस्तान, तुर्कस्तान व्हिएतनाम आणि जर्मनी यांची निर्यातही लक्षणीय आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेशी आपला व्यापारी करार लवकरात लवकर झाल्यास भारतातील बाजारपेठेत तेजी परतु शकेल, हे ही खरेच.

✦✦✦

**बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणुका होऊन 'जुलै चार्टर'वर देशभरात जनमत चाचणी घेतली जाणार आहे. यामुळे युनूस सरकार निवडणुका आणि जनमत चाचणी एकाच वेळी का घेऊ इच्छिते, असा प्रश्न पडतो. युनूस सरकारचे निर्णय आणि राजकीय पक्षांची स्थिती पाहता बांगलादेशमध्ये लोकशाही नावालाच राहण्याची चिन्हे असून कारभार अध्यक्षांच्या हाती एकवटणार अशी चिन्हे आहेत.**

# बांगलादेश अराजकतेच्या वाटेवर

**दृष्टीक्षेप**

**जनार्दन पाटील**

बांगलादेशमध्ये सत्ता परिवर्तनानंतर शेख हसीना यांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत कट रचला जात असल्याची चर्चा सुरु होती. तथापि आता अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस शेख हसीना यांची सत्ता उलथवून टाकण्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न करत आहेत. बांगलादेशमधील निवडणुकीच्या ताज्या घोषणेकडे सरकार स्थापन करण्यापेक्षा बंडाला समर्थन देण्याची योजना म्हणून पाहिली जात आहे. हसीना यांचे सरकार उलथवून टाकण्याच्या घटनेला ५ ऑगस्ट २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर युनूस यांनी संकेत दिले होते, की निवडणुका फेब्रुवारी २०२६ मध्ये होतील. आता तारखा निश्चित झाल्या आहेत आणि त्याला एक मोठा राजकीय प्रयोग जोडला आहे, तो म्हणजे 'जुलै चार्टर'. त्यावर २५ हून अधिक पक्षांनी स्वाक्षरी केली आहे. या सनदेत १९७२ च्या बांगलादेश संविधानात मोठे बदल करण्याची मागणी आहे. 'जुलै सनदे'ची अंमलबजावणी झाल्यास बांगलादेशमध्ये राजकीय शक्तीचे लक्षणीय विभाजन होईल. 'जुलै सनदे'च्या मॉडेलवर आधारित निवडणुकांदरम्यान काळजीवाहू सरकार, निवडणूक आयोग आणि इतर संवैधानिक संस्थांची स्थापना केली जाईल. या प्रस्तावानुसार, संसद द्विसदनी असेल. वरिष्ठ सभागृहात शंभर जागा असतील. कोणत्याही संवैधानिक बदलांना अंतिम मान्यता मिळेल. विजयी पक्षांना 'जुलै सनदे'च्या ३० सहमती मुद्द्यांची अंमलबजावणी करावी लागेल. त्यात महिलांसाठी वाढलेले प्रतिनिधित्व, विरोधी उपसभापती, पंतप्रधानांच्या अधिकारावर मर्यादा, राष्ट्रपतींच्या अधिकारांमध्ये वाढ, मूलभूत अधिकारांचा विस्तार आणि न्यायपालिका आणि स्थानिक सरकारांचे स्वातंत्र्य बळकट करणे यांचा समावेश आहे.



ताज्या पावलांमुळे भावी पंतप्रधानांना शक्तिशाली होण्यापासून रोखण्यासाठी नियंत्रण आणि संतुलनाची एक नवी प्रणाली सुरू केली जाईल. सनदेतील इतर आश्वासनेदेखील अंमलात आणले जातील. युनूस यांनी जनमत चाचणीची घोषणा केल्यानंतर वाद वाढला आहे. आता चार वेगवेगळ्या सुधारणांवर जनतेचे मत विचारले जाईल. सुरुवातीला मानले जात होते, की चारही सुधारणांमध्ये प्रत्येकी 'हो' आणि 'नाही' असे वेगवेगळे पर्याय असतील. तथापि, आता हे स्पष्ट झाले आहे, की चार प्रश्न विचारले जातील; परंतु पर्याय तेच राहतील. याचा अर्थ असा की मतदार सर्व सुधारणांना 'हो' म्हणू शकतो किंवा नाकारू शकतो. बहुतेक लोकांना 'जुलै सनदे'बद्दल माहिती नाही. त्यांनी ते वाचलेलेही नाही किंवा त्यांना ते समजलेलेही नाही. एखादा शेतकरी किंवा रिक्षाचालक अचानक इतका मोठा राजकीय दस्तावेज वाचेल का? त्याचे स्पष्टीकरण कोण देईल? अनेक पक्षांनी आधीच म्हटले होते, की निवडणुकीपूर्वी जनमत चाचणी घेतली पाहिजे; परंतु युनूस प्रशासन दोन्ही एकाच वेळी घेत आहे. जनता पूर्णपणे गोंधळली आहे आणि प्रचार अद्याप सुरू झालेला नाही. जनमत चाचणीची तारीख जवळ आली तरी सनदेबद्दल जागरूकता शून्य आहे.

सध्या बंदी घातलेल्या हसीना यांच्या 'अवामी लीग'ने निवडणूक वेळापत्रक 'बेकायदेशीर, फॅसिस्ट आणि पक्षपाती' म्हणून नाकारले आहे. पक्षाचे म्हणणे आहे, की सरकार जाणूनबुजून त्यांना निवडणुकीतून वगळू पहात आहे. हसीना यांच्यावरील सर्व खोटे खटले रद्द करावेत, राजकीय कैद्यांना सोडावे आणि निष्पक्ष काळजीवाहू सरकारद्वारे निवडणुका घ्याव्यात, अशी मागणी पक्षाने केली आहे. 'अवामी लीग'चा मुख्य आरोप आहे, की युनूस सरकार हसीना यांना राजकीयदृष्ट्या पूर्णपणे संपवण्याचा कट रचत आहे; जेणेकरून जगाला हा संदेश मिळेल, की हसीना यांची जागा घेण्याचा निर्णय योग्य होता. हसीना यांच्या कार्यकाळात निवडून आलेले अध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांनी म्हटले आहे की युनूस सरकारने त्यांना 'अपमानित' आणि 'बाजूला' केले. फेब्रुवारीच्या निवडणुकीनंतर ते राजीनामा देतील. 'जुलै सनद' मंजूर झाल्यास अध्यक्षपद अत्यंत शक्तिशाली होईल. त्यामुळे पंतप्रधान कळसुत्री बाहुले ठरतील. बांगलादेशमधील आगामी तेराव्या संसदीय निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी मतमोजणीही होईल. बांगलादेशमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी कोणत्याही पक्षाला किंवा युतीला १५१ जागांची आवश्यकता असेल. निवडणूक आयोगाच्या घोषणेनंतर हसीना यांचा पक्ष असलेल्या बंदी घातलेल्या 'अवामी लीग'ची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. युनूस यांनी यापूर्वी या पक्षाला निवडणूक लढवण्यापासून रोखण्याचा कट रचला होता; परंतु आता त्यातून काही प्रमाणात सूट दिली आहे.



'अवामी लीग'चे नेते अपक्ष म्हणून निवडणूक लढवू शकतात. पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवणे वेगळे आणि अपक्ष निवडणूक लढवणे वेगळे. त्यामुळे 'अवामी लीग' निवडणुकीच्या रिंगणात असण्याची शक्यता कमी आहे. हसीना यांच्या अनुपस्थितीतही बांगलादेशसाठी हा पक्ष महत्त्वाचा आहे. 'अवामी लीग'ला निवडणुका लढवण्यापासून रोखण्याच्या युनूस यांच्या निर्णयामुळे हे स्पष्ट झाले आहे, की सध्याचे सरकार पूर्णपणे पक्षपाती आहे आणि कोणताही निर्णय न्याय्य पद्धतीने घेऊ शकत नाही. 'अवामी लीग' बांगलादेशमधील सर्वात मोठ्या पक्षांपैकी एक आहे. त्याने १३ निवडणुकांमध्ये भाग घेतला आहे. त्यापैकी नऊ निवडणुका जिंकून सरकार स्थापन केले आहे. 'अवामी लीग' हा देशाच्या मुक्तीसंग्रामाचे नेतृत्व करणारा पक्ष आहे. हसीना यांचा पक्ष, इतर राजकीय पक्ष आणि देशातील बहुसंख्य लोकसंख्येला वगळून निवडणुका घेण्याचा प्रयत्न करणे हे देश आणि राष्ट्राला अधिक खोल संकटात ढकलण्याचे षडयंत्र आहे. त्यांना अजूनही चूक सुधारण्याची संधी आहे. सध्याचे संकट आणखी बिकट होऊ नये, म्हणून युनूस यांनी 'अवामी लीग'वर लादलेले सर्व निर्बंध उठवले, तरच या पक्षाला निवडणुकीच्या रिंगणात उतरता येईल; परंतु युनूस तसे करणार नाहीत. हसीना यांच्या काळात युनूस यांच्यावर झालेले आरोप आणि ठोठावण्यात आलेली शिक्षा ते विसरलेले नाहीत.

बांगलादेश अजूनही अस्थिरतेतून बाहेर पडण्यासाठी संघर्ष करत आहे. तेथे कोणताही सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्ष नाही. अशा परिस्थितीत निष्पक्ष निवडणुका शक्य होतील का आणि भारत-बांगलादेश संबंधांवर या बदलाचा काय परिणाम होईल. हे जाणून घेतले पाहिजे. दीड दशकाहून अधिक काळ सत्तेत राहिल्यानंतर हसीना यांना लष्करी उठावामुळे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या निदर्शनांमुळे पदच्युत करण्यात आले. बांगलादेशचे राजकारण आता स्वातंत्र्यानंतर कधीही न दिसलेल्या पातळीवर आहे. सध्या अंतरिम सरकार प्रभारी आहे. उठावानंतरच्या काही महिन्यांमध्ये युनूस यांच्या अंतरिम सरकारने निर्णय घेतला की देशातील सर्वात जुना आणि सर्वात मोठा पक्ष अवामी लीग निवडणुकीत भाग घेऊ शकणार नाही. पक्षाची नोंदणी रद्द करण्यात आली आणि त्यांच्या राजकीय कारवायांवर बंदी घालण्यात आली. आता बांगलादेशमध्ये सत्तेची पोकळी निर्माण झाली आहे. माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) हा पक्ष आणि 'जमात-ए-बांगलादेश' यांच्यात स्पर्धा होण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्ष अनिश्चित स्थितीत असल्याचे दिसून येते. 'अवामी लीग'ला निवडणूक रिंगणाच्या बाहेर ठेवल्यानंतर बीएनपी पक्ष बांगलादेशी राजकारणातील सर्वात प्रमुख विरोधी पक्षांपैकी एक आहे. या पक्षाचे नेतृत्व तारिक रहमान करतात. ते सध्या लंडनमध्ये आहेत आणि तेथून पक्षाचे व्यवस्थापन करत आहेत. त्यांनी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादीही जाहीर केली; पण हे वरवरचे दावे आहेत. एके काळी मजबूत असलेला हा पक्ष अंतर्गत संघर्षांना तोंड देत आहे.

बीएनपी पक्षाच्या खालिदा आणि तारिक यांच्यासह शीर्ष नेते लंडनमध्ये आहेत. खरे तर जवळ जवळ सर्वांवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. खटले आणि दबावामुळे ते लंडनला गेले आणि तेथून पक्षाचे नेतृत्व करत आहेत. ते स्वतः निवडणुकीत भाग घेऊ शकत नाहीत. त्यामुळे दूरवरून आदेश मिळवणे आणि विजय मिळवणे हे एक मोठे आव्हान असू शकते. 'जमात-ए-इस्लामी'ही रिंगणात आहे. हा एक धार्मिक राजकीय पक्ष आहे, ज्याचे काम शरिया कायद्याभोवती फिरते. ते इस्लामिक सामाजिक रचना निर्माण करण्यावर भर देतात. 'जमात-ए-इस्लामी' इस्लामी विचारसरणीवर चालत असल्याने देशात धार्मिक ध्रुवीकरण अपरिहार्य आहे. अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसाचार आधीच होत आहे. हा पक्ष सत्तेत आला तर हिंदू आणखी एकाकी पडतील. परिस्थिती आणखी बिघडल्यास बांगलादेशची अवस्था तालिबानशासित अफगाणिस्तानसारखी होऊ शकते. दोन्ही देशांची सीमारेषा आहे आणि तेथे मोठ्या प्रमाणात हिंदू लोकसंख्या असल्याने भारताशी असलेल्या संबंधांवर परिणाम होईल. 'जमात-ए-इस्लामी'ने यापूर्वी भारत सरकारविरुद्ध विधाने केली आहेत. १९९० च्या दशकात हा पक्ष राजकारणात सक्रिय झाल्यापासून भारत बांगलादेशच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करत असल्याचा आरोप करत आहे. 'नॅशनल सिटीझन्स पार्टी' (एनसीपी) हा विद्यार्थ्यांचा पक्ष आहे. हा पक्ष थेट मुख्य प्रवाहातील राजकारणात प्रवेश करू शकतो. या पक्षाकडे उत्साह आहे; पण अनुभव नाही. शिवाय, तो वैचारिकदृष्ट्या 'जमात-ए-इस्लामी'च्या जवळचा आहे. त्यामुळे, भारत-बांगलादेश संबंध पुनर्संचयित होण्याची शक्यता दिसत नाही.

✦✦✦



दैनिक
गोदातीर
समाचार
च्या ६५ व्या वर्धापना दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा
: शुभेच्छूक :
शाम चंद्रे
नगर सेवक न.प.मुदखेड - प्रभाग क्र. ४
विनोद चंद्रे
भा.ज.पा.सरचिटणीस,मुदखेड




दैनिक
गोदातीर
समाचार
च्या ६५ व्या वर्धापना
दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा
अभया लोहगावकर
उप प्राचार्य
महात्मा गांधी विद्यालय मुदखेड
बाबुराव नाईक
प्राचार्य तथा मुख्याध्यापक
म.गां. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुदखेड




दैनिक
गोदातीर
समाचार
च्या ६५ व्या वर्धापना
दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक :
संजय आऊलवार
नगर सेवक न.प. मुदखेड




दैनिक
गोदातीर
समाचार
च्या ६५ व्या वर्धापना
दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक :
मुजीब पठाण
युवक काँग्रेस शहराध्यक्ष, मुदखेड





दैनिक
गोदातीर
समाचार
च्या ६५ व्या वर्धापना
दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक :
प्रताप देशमुख
तालुका काँग्रेस कामीटी अध्यक्ष,मुदखेड




दैनिक
गोदातीर
समाचार
च्या ६५ व्या वर्धापना दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक:
सौ. आर्चना मधुकर हौसरे
ग्रामपंचायत कार्यालय
पार्डी (वै.) ता.मुदखेड जि. नांदेड




जिवेत् शरदः शतम्
आपली सारी स्वप्नं साकार व्हावी
आजचा वाढदिवस आपल्यासाठी
एक अनमोल आठवण ठरावी
आणि या आठवणींनी आपलं आयुष्य
अधिकाधिक सुंदर व्हावं
ह्याच सदिच्छा!
श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्था,
कापसी (गुंफा) चे अध्यक्ष
आदरणीय
मोहनराव
पाटील सुगावकर
यांना वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
वाढदिवस शुभचिंतन!
सौ.सुनिता गजानन तेलंगे
प्रल्हाद पुंडगे
विठ्ठल वाघमारे

लोकाभिमुख पत्रकारितेमुळे
वाचकांच्या मनात अढळ स्थान
निर्माण करणारे दैनिक
गोदातीर
समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा !
शुभेच्छुक :
■ धनंजय गुम्मलवार अध्यक्ष
■ राघवेंद्र मदनूरकर सचिव
■ मुकेश पाटील कार्याध्यक्ष
■ सचिन चौदंते कोषाध्यक्ष
■ रणजीत गजभारे संघटक
■ मंगेश ढेंबरे संघटक
महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी
युनियन (ओंकार) जिल्हा शाखा नांदेड



मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
हॉटेल गरुडा
व्हेज अँड नॉन व्हेज फॅमिली रेस्टॉरंट
प्रो.प्रा संदीप पाटील खराणे 9767490490
सुहास पाटील खराणे 8888588898, 9657578757
नांदेड-सिडको मेन रोड, डी मार्ट समोर, लातूर फाटा, नांदेड


गोपाळचावडी ग्रामपंचायत कार्यालय
ता.जि.नांदेडच्या वतीने
मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व
नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
संरपच
शुभेच्छूक -
सौ.सुरेखा प्रदिप लाखे
सरपंच,
साहेबराव बालाजी सेलूकर
उपसरपंच,
उपसंरपच
सर्व सदस्य : हणमंत मैलगे, सौ. गिरजाबाई डाकोरे, कविता कतुरे, सौ. छाया खदक, अशोक अंकुलवार, इंजि. अश्विनी लवटे, मयुरी नायगावे, नितेश कंधारे, संगिता तालीमकर
ग्रामपंचायत अधिकारी : पी. डब्ल्यू. भदरगे
आशीर्वाद डाकोरे (वरिष्ठ लिपिक) व कार्यालयीन कर्मचारी


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छूक -
प्रा.डॉ.रमेश नांदेडकर
सचिव, नांदेड जिल्हा खो-खो असोसिएशन



ग्रामपंचायत कार्यालय वांगी
ता.जि.नांदेडच्या वतीने
मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
: शुभेच्छूक :
दता पाटील जाधव
सरपंच
डि.डी.वडजे ग्रामपंचायत अधिकारी
सदस्य : गोविंदराव जाधव, पद्माकर तारू, गंगासागर जाधव, नंदाबाई जाधव, पार्वती खोडे, वंदना तारू.


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छूक :
के.ना. जेटेवाड
सेवानिवृत्त, भुमिअभिलेख
उपअधिक्षक राज्य उपाध्यक्ष,
आदीवासी कोळी समाज
समन्वय समिती महाराष्ट्र


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
राजपुरोहित वीरभद्र मठपती
उर्फ पिंटू महाराज
सिडको नवीन नांदेड


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छूक
संकेत पाटील
विभागीय अध्यक्ष : संभाजी ब्रिगेड नांदेड
संभाजी ब्रिगेड


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
व्यंकटराव इंगळे
सामाजिक कार्यकर्ते


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छूक -
सौ. कमलबाई लामदाडे पाटील संरपच,
सौ. गिरजाबाई चिंतोरे उपसंरपच,
ग्रा.पं. सदस्य : रामकिशन पांचाळ, दत्ता देवकांबळे, नंदाबाई लामदाडे, नंदाबाई मोरे, मीराबाई पुरी,
ग्रामपंचायत अधिकारी : अमृत शिंदे
संरपच
उपसंरपच
ग्रामपंचायत कार्यालय टाकळगाव ता. लोहा जिल्हा नांदेड


नांदेड वाघाळा शहर मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय क्र. 6
यांच्या वतीने
मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
डॉ. मिर्झा बेग
सहायक आयुक्त,
नांदेड वाघाळा, शहर महानगरपालिका
सिडको क्षेत्रीय कार्यालय, नवीन नांदेड
विलास गजभारे, कार्यालय अधीक्षक,
करनिरीक्षक, सादुल्ला शेख वसंत
कल्याणकर, नारायण आठवले,
व वसुली लिपीक, कार्यालयीन कर्मचारी

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



डॉ. गंगाधर सोनकांबळे
राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा
संविधान अॅकॅडमीचे प्रमुख, नांदेड

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

गुरुकुल पब्लिक स्कूल व
ज्यु. कॉलेज, पावडेवाडी नांदेड

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



शेख सईद बावजीर



शेख सालम बावजीर

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

प्रशांत तिडके
माजी नगरसेवक, नांदेड

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

: शुभेच्छुक :

संजय रुईकर
सचिव, व्होराईझन अॅकॅडमी, नांदेड

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

हार्दिक शुभेच्छा!



: शुभेच्छुक :

शिवराज पाटील होटाळकर
अध्यक्ष, नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस, नांदेड
अध्यक्ष- श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ
(माजी शिक्षण सभापती, जिल्हा परिषद, नांदेड)

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

हार्दिक शुभेच्छा!



संभाजी भिलवंडे पाटील
उपाध्यक्ष,
नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी, नांदेड
माजी सदस्य
दुरसंचार सल्लागार समिती, नांदेड

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

लक्ष्मीकांत गोणे
चेअरमन, व सर्व संचालक मंडळ
नांदेड जिल्हा मजुर सहकारी संस्था
फेडरेशन लि. नांदेड

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

वर्धापन दिन-२०२६



शंकर कन्स्ट्रक्शन, नांदेड

माधवराव पटणे
शासकीय कंत्राटदार, नांदेड

# शिक्षणक्षेत्रातील नवी कवाडे

**आधुनिक युगात शिक्षकांची भूमिका अधिक आव्हानात्मक झाली आहे. सध्याच्या तंत्रबदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहेत. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक, परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना ऑनलाइन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाईल ॲप्स आणि वेबसाइट्स यांचा खुबीने वापर करून अध्यापन करावे लागेल.**

तंत्रवेध
उर्मिला राजोपाध्ये

शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नाही, तर तो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा एक शिल्पकार असतो. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांची भूमिका अधिकच आव्हानात्मक आणि महत्त्वाची झाली आहे. विसाव्या शतकात शिक्षणाच्या कल्पना पारंपरिक होत्या. सध्याच्या तंत्रबदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहेत. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक (रोबोटिक), परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना बदलावे लागणार आहे. ऑनलाइन शिकवणे, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाईल ॲप्स आणि वेबसाइट्स यांचा वापर वाढला आहे. शिक्षकांना या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करावे लागेल. पारंपारिक शिक्षणपद्धती आणि नवीन तंत्रज्ञान यांचा मेळ घालणे हे आजच्या शिक्षकांपुढील मोठे आव्हान आहे. म्हणूनच आजच्या युगात शिक्षकांनी कसे असले पाहिजे, याबाबत सविस्तर विचार करणे गरजेचे आहे.

आजचे जग वेगाने बदलत आहे. माहितीचा महासागर इंटरनेटवर उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. त्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. नवीन शोध, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक आणि आर्थिक बदल याबद्दल त्यांना माहिती असणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी डिजिटल साक्षर असणे आवश्यक आहे. स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक ॲप्सचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवता येते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जागतिक घडामोडींची माहिती देणे, विविध विषयांवर ऑनलाइन संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे हे आधुनिक शिक्षकांचे कर्तव्य आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे होते, पण आजच्या युगात त्यांची भूमिका ज्ञान सोपे करून सांगणे आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे अशी झाली आहे. इंटरनेटमुळे आज माहिती सहज उपलब्ध असली तरी, त्या माहितीचे योग्य विश्लेषण करणे आणि तिचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणे महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. प्रश्न विचारण्याचे, वाद-विवाद करण्याचे आणि स्वतःची मते योग्य प्रकारे मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी आणि क्षमता ओळखून कारकिर्दीचा योग्य पर्याय निवडण्यास मदत केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि पद्धत वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांवर खूप शैक्षणिक आणि सामाजिक दबाव असतो. परीक्षेचा ताण, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमे आणि समवयस्कांकडून मिळणारा दबाव यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक ताण अनुभवतात. अशा वेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केवळ शैक्षणिकच नव्हे तर मानसिक आधारस्तंभ म्हणून काम केले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधला पाहिजे, त्यांच्या समस्या ऐकून घेत मानसिक पातळीवर मदत केली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे प्रोत्साहित करून आत्मविश्वास वाढवला पाहिजे. एखादा विद्यार्थी मागे पडत असल्यास शिक्षा न करता, त्याच्या अडचणी समजून घेऊन मदत करणे आवश्यक आहे. शाळेत किंवा वर्गात सकारात्मक आणि सुरक्षित वातावरण निर्माण करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. शिक्षण केवळ चांगले गुण मिळवण्यासाठी नाही, तर एक चांगला माणूस बनण्यासाठी असते. आधुनिक युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नैतिक आणि सामाजिक मूल्यांची शिकवण दिली पाहिजे. प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम, सहकार्य, इतरांचा आदर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यासारखी मूल्ये केवळ तोंडी सांगून चालणार नाही, तर शिक्षकांनी स्वतःच्या आचरणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. आपण बोलतो तसे वागतो, हे विद्यार्थी पाहतात, तेव्हा मूल्य अधिक गांभीर्याने घेतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये करुणा आणि संवेदनशीलता विकसित केली पाहिजे; जेणेकरून ते स्वतःचाच नव्हे तर समाजाचाही विचार करतील.



आजच्या काळात ज्ञान आणि तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःला सतत शिकत राहण्यास तयार ठेवले पाहिजे. नवीन शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम आणि अध्यापनाच्या पद्धती शिकून घेणे आवश्यक आहे. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांचे शिक्षकच नाही, तर स्वतःही एक विद्यार्थी असतात. नवीन तंत्रज्ञान, शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा समजून घेण्यासाठी त्यांनी कार्यशाळा, प्रशिक्षण आणि चर्चासत्रांमध्ये आवर्जून भाग घेतला पाहिजे. लवचिक वृत्तीमुळे ते विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात आणि त्यानुसार आपल्या अध्यापनाच्या पद्धतींमध्ये बदल करू शकतात. शिक्षण हे केवळ ज्ञान देणारे नाही तर, विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणारे माध्यम आहे. शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता निर्माण करतो. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. कोणताही विद्यार्थी कमजोर नसतो, फक्त त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लहान यशाचे कौतुक केले पाहिजे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते आणखी प्रयत्न करण्यासाठी प्रोत्साहित होतात. शिक्षण प्रक्रिया केवळ शाळेतच घडत नाही. ती पालक आणि समाजाच्या सहकार्याने पूर्ण होते. शिक्षकांनी पालकांशी नियमित संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल माहिती दिली पाहिजे. पालकांचे सहकार्य मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या अडचणी अधिक चांगल्या प्रकारे सोडवता येतात. याशिवाय, शिक्षकांनी समाजामध्ये होणाऱ्या बदलांची जाणीव ठेवून त्यानुसार आपल्या शिकवण्याच्या पद्धतींमध्ये बदल केले पाहिजेत. त्यांना सामाजिक समस्यांची जाणीव करून देणे महत्त्वाचे आहे.

आज शिक्षणसंस्थांनीही शिकवण्याची पद्धत बदलून प्रॅक्टिकलवर जास्त भर दिला पाहिजे. गुणांना कमी महत्व देऊन मूल्यांकनाला जास्त महत्व द्यायला हवे. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील तर आपल्या मुलामुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. जागतिक पातळीवरच्या रोजगारांची चाहूल आपल्याकडील युवकवर्गापर्यंत पोहोचली की ते इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी आदी भाषा शिकायला फक्त तयार होतील असे नव्हे, तर उत्सुकही बनतील. यासाठी प्रचंड प्रमाणावर शिक्षक लागतील हे खरे आहे परंतु नेमक्या याच ठिकाणी आपण इ-शिक्षण, आभासी शाळा (व्हर्च्युअल क्लासरूम) अशा बाबींचा वापर करू शकतो! माहिती तंत्रज्ञान-सक्षमित शिक्षणपद्धतीचा आपल्याला मोठा उपयोग होणार आहे. प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो आणि त्याला वेगळ्या पद्धतीने शिकवण्याची गरज असते. शैक्षणिक ज्ञान देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. कोरोनानंतरच्या 'न्यू नॉर्मल' मध्ये अनेक व्यक्ती डिजिटल तंत्रज्ञान वापरू लागल्या. यात इमेल, सोशल मीडिया, इ व्यापार, ऑनलाईन व्यवहार यांचा समावेश होतो. यामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक माहिती अनेक उद्योगांच्या हाती लागली आहे. या माहितीचा अनेक वेळा गैरवापर होताना आढळतो. या बाबतीत प्रचलित कायदे फारसे प्रभावी नाहीत. इथेच नैतिकतेचा मुद्दा महत्वाचा आहे. व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षणपद्धतीत अंतर्भूत केलेच पाहिजे .

शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र बदलायला हवे. पाया बळकट करून, प्रात्यक्षिकांवर भर देऊन, कार्यसंस्कृती अवलंबून रोजगारक्षम विद्यार्थी घडवणे हे आजच्या जमान्यात शिक्षकांचे खरे कार्य आहे. त्याचबरोबर मूल्ये, नीतिमत्ता, राष्ट्रप्रेम, सर्वसमावेशकता, संवेदनशिलताही महत्वाची आहे. स्वयंशिस्त आणि चांगला नागरिक घडणेही तितकेच महत्वाचे आहे. आजच्या युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, मित्र आणि तत्त्वज्ञ बनले पाहिजे. त्यांनी स्वतःला सतत अद्ययावत ठेवले पाहिजे, तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत.



# ऊर्जा क्षेत्रात डिजिटायझेशन

**'डिजिटायझेशन', 'फाईव्ह जी नेटवर्क्स'चा वापर, 'एआय'चा स्वीकार आणि वाढती क्लाउड मागणी यामुळे भारताचा डेटा सेंटर उद्योग अभूतपूर्व वाढीच्या मार्गावर आहे. २०३० पर्यंत देशातील डेटा सेंटर्स भारताच्या एकूण विजेपैकी सुमारे तीन टक्के वीज वापरतील. त्यामुळे भारत ऊर्जा क्षेत्रात डिजिटायझेशन आणि हरित ऊर्जेचे आव्हान पेलू शकेल का, याचा विचार करणे आवश्यक आहे.**

मिशन २०४७
रुपाली काळसकर


अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा अधिकाधिक वापर ही काळाची गरज बनली आहे.

आज जगभरात ऊर्जेची मागणी वाढत आहे. ऊर्जेच्या पुरवठ्यातील त्रुटी दूर करण्यावर, त्यात डिजिटलायझेशन आणण्यावर जगभरातील ऊर्जा वितरण कंपन्यांचा भर आहे. त्यातही आता ऊर्जेच्या निर्मितीतील संसाधनांना मर्यादा आल्याने जगभरात अक्षय ऊर्जा, हरित ऊर्जेचा वापर करण्याकडे कल वाढला आहे. जगभरात डाटा सेंटरचे महत्त्व वाढत आहे. त्यांना अखंडित विजेची गरज लागते. मुंबई, बेंगळुरू, चेन्नई आणि दिल्लीसारख्या महानगरांमध्ये हायपरस्केल डेटा सेंटर असतात. हायपरस्करेल डाटा सेंटर म्हणजे एखाद्या मोठ्या टेक कंपनीने बांधलेले आणि मालकीचे असलेले डेटा सेंटर. याला क्लाउड डेटा सेंटर असेही म्हणतात. एका हायपरस्केल सुविधेत ५० हजार चौरस फूट किंवा त्याहून अधिक जागेत हजारो सर्व्हर असू शकतात. या सुविधा बहुतेकदा मोठ्या शहरांच्या बाहेरील भागात असतात.

पारंपारिक ग्रीड्सना, विशेषतः महानगरीय क्षेत्रांच्या पलीकडे डेटा सेंटर्सना लागणारी अखंड, उच्च-गुणवत्तेची वीज पुरवण्यात अनेकदा अडचणी येतात. लहान शहरे आणि ग्रामीण भागातील अनेक उदयोन्मुख डिजिटल हबना वारंवार वीज खंडित होणे, व्होल्टेज अस्थिरता आणि मर्यादित ग्रीड क्षमता यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे ट्रान्समिशन पायाभूत सुविधांवर अतिरिक्त दबाव येतो. महत्त्वाच्या डिजिटल सेवांसाठी अपटाइम राखण्यासाठी वीज पुरवठा, वितरण आणि लवचिकता धोरणांचा मूलभूत पुनर्विचार करणे आवश्यक आहे. भविष्यातील विकेंद्रित, बुद्धिमान ऊर्जा परिसंस्था या आव्हानांना तोंड देण्यासाठी या क्षेत्राने स्वयंपूर्ण ऊर्जा परिसंस्थांकडे वळले पाहिजे. यासाठी मायक्रोग्रीड्स, बॅटरी ऊर्जा साठवण प्रणालींद्वारे वाढवलेल्या अक्षय ऊर्जा आणि रिअल-टाइम ऊर्जा ऑप्टिमायझेशन तंत्रांसह हायब्रीड ऊर्जा स्त्रोतांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. विकेंद्रित वीज वितरण संरचना अस्थिर ग्रीड्सवरील अवलंबित्व कमी करतात. त्यामुळे ग्रामीण डेटा नोड्स, टेलिकॉम टॉवर्स आणि स्मार्ट कारखाने यासारख्या प्रमुख संस्थांना उच्च गुणवत्तेसह स्वायत्तपणे ऑपरेट करता येते. पायाभूत सुविधांचे निरीक्षण आणि 'एआय' संचलित ऊर्जा व्यवस्थापन भार वितरण आणि भविष्यसूचक देखभाल सुधारू शकते. परस्परांशी जोडलेल्या डिजिटल साइट्सची ऊर्जा कार्यक्षमता वाढवू शकते.

२०३० पर्यंत ५०० गीगावॅट अक्षय क्षमता साध्य करण्याचे भारताचे महत्त्वाकांक्षी अक्षय ऊर्जा लक्ष्य आहे. सरकारी प्रोत्साहनांमुळे डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये हरित ऊर्जेचे एकत्रीकरण वेगाने होत आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ऑपरेटर रूफटॉप सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि प्रगत शीतकरण तंत्रज्ञानाचा वापर वाढवत आहेत. उल्लेखनीय म्हणजे केंद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहन अनुदानांमुळे ऊर्जा साठवण उपक्रमांनी बॅटरी स्टोरेजचा अवलंब करण्यास गती दिली आहे. ती पुरवठा-मागणी तफावत भरून काढण्यासाठी आणि अक्षय ऊर्जेची अनियमित उपलब्धता कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. धोरणात्मक उपक्रम गुंतवणूक आणि प्रगत उपाय धोरण पायाभूत सुविधा निश्चित करतात. गुंतवणूकदार आणि ऑपरेटर भारतातील अत्यंत पर्यावरणीय परिस्थितीत कार्य करण्यास सक्षम असलेल्या मॉड्यूलर, स्केलेबल पॉवर युनिट्ससह पायाभूत सुविधांचा विस्तार करत आहेत. उच्च-कार्यक्षमता अखंड वीजपुरवठा, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)-आधारित देखरेख प्लॅटफॉर्म आणि हायब्रीड ग्रीड-स्टोरेज संयोजन यासारख्या तंत्रज्ञानामुळे सातत्यपूर्ण वीज गुणवत्ता आणि लवचिकता सुनिश्चित होते. या प्रगतींमध्ये ऑपरेशनल लवचिकतादेखील समाविष्ट आहे. त्यामुळे डेटा सेंटर्सना मागणी आणि पुरवठ्यातील चढ-उतारांनुसार वीजेची गरज समायोजित करता येते. त्यामुळे एकूण खर्च आणि शाश्वततेचा धोका कमी होतो.

भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या आणि ऊर्जा पायाभूत सुविधांच्या सहजीवन वाढीमुळे जटिल आव्हाने निर्माण होतात. त्यासाठी नावीन्यपूर्ण आणि एकात्मिक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. सक्रिय गुंतवणूक आणि सक्षम धोरणांद्वारे डेटा सेंटर्सच्या उदयोन्मुख गरजांनुसार तयार केलेल्या विकेंद्रित, बुद्धिमान आणि हरित ऊर्जा प्रणालींचा विकास अत्यंत महत्त्वाचा असेल. या आव्हानांना यशस्वीरित्या तोंड दिल्यास भारताची डिजिटल परिसंस्था मजबूत आणि अनुकूल राहील आणि पुढील दशकात जागतिक तंत्रज्ञान महासत्ता म्हणून त्याचे स्थान सुरक्षित होईल. अक्षय ऊर्जा ही अनंत शक्ती आहे. पृथ्वीवर पारंपारिक ऊर्जेचे स्त्रोत अतिशय मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत या पारंपारिक ऊर्जेचे स्त्रोत मोठ्या प्रमाणात वापरले गेल्यास हे पारंपारिक स्त्रोत संपुष्टात आल्यावर एक गंभीर समस्या उदभवेल. म्हणूनच जगभरात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांना प्रोत्साहन देण्याची गरज भासू लागली आहे. अक्षय ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. अक्षय म्हणजे जी कधीही संपत नाही अशी. म्हणजेच अक्षय ऊर्जा ही प्रत्यक्षात ऊर्जेचा अमर्याद पर्याय आहे आणि आजच्या काळात कोणत्याही राष्ट्राच्या अक्षय विकासाचा मुख्य आधारस्तंभ देखील आहे. पर्यावरणीय चिंता लक्षात घेता, गेल्या काही वर्षांपासून अशी ऊर्जा आणि तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या वाढत्या समस्येपासून जगाला काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल.

आज कोणत्याही राष्ट्राला स्वत:ला विकसित करण्यासाठी प्रदूषणमुक्त अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा योग्य वापर करण्याची आवश्यकता आहे. आज केवळ भारतच नाही, तर संपूर्ण जगाकडे विजेसारख्या महत्त्वाच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मर्यादित नैसर्गिक संसाधने आहेत आणि पर्यावरणीय असंतुलन आणि विस्थापनासारखी गंभीर आव्हाने आहेत. गंभीर समस्या आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी अक्षय ऊर्जा हा एकमेव सर्वोत्तम पर्याय आहे, जो पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्याबरोबरच ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यात प्रभावी ठरेल; परंतु अक्षय ऊर्जेच्या मार्गात अनेक आव्हाने उभी आहेत. देशभरात अक्षय ऊर्जा उत्पादनाची अनेक लहान युनिट आहेत, त्यांना एका ग्रीडमध्ये आणणे हे एक अतिशय आव्हानात्मक काम आहे. याचा परिणाम विजेच्या गुणवत्तेवर होतो. भारतात अक्षय ऊर्जेच्या विविध स्त्रोतांचा प्रचंड साठा आहे; परंतु त्यापासून ऊर्जा निर्माण करणारी बहुतेक उपकरणे परदेशातून आयात केली जातात. देशात ऊर्जेची मागणी आणि पुरवठ्यातील फरकदेखील वेगाने वाढत आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार देशातील एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४५० गीगावॉटपेक्षा जास्त झाली आहे. त्यापैकी २३० गीगावॉटपेक्षा जास्त उर्जा अक्षय ऊर्जेच्या स्त्रोतांद्वारे मिळवली जात आहे. त्यात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जैव-शक्ती आणि लघु जल प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय, मोठ्या जलविद्युत प्रकल्प आणि अणुऊर्जेतूनही अक्षय ऊर्जानिर्मिती केली जात आहे. एकूण वीज निर्मितीमध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा सतत वाढत आहे. त्यामुळे भारत जगातील आघाडीच्या देशांमध्ये स्थान मिळवतो. २०४० पर्यंत भारतातील एकूण ऊर्जेची मागणी सध्याच्या तुलनेत जवळजवळ दुप्पट होईल.

घरगुती आणि कृषी क्षेत्रांव्यतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात विशेषतः वीज आणि इंधनाच्या स्वरूपात वापरल्या जाणाऱ्या ऊर्जेची मागणी सतत वाढत आहे. वीज आणि पेट्रोलियमसारख्या महत्त्वाच्या ऊर्जेच्या सुमारे ५५ टक्के स्त्रोतांचा वापर केवळ औद्योगिक क्षेत्रात केला जातो. ज्या विजेने आपण आपली घरे, दुकाने किंवा कार्यालये उजळवतो, ती वीज किंवा पेट्रोलियम आणि ऊर्जेचे इतर स्त्रोत देशाला विकासाच्या मार्गावर पुढे नेण्यासाठी वापरले जातात. आपल्याला ती वीज किंवा इतर ऊर्जेचे स्त्रोत किती मोठी किंमत देऊन मिळतात, याचा विचार कुणीच करत नाही. ही किंमत केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पाहताही खूप जास्त आहे. जगभरातील ऊर्जा क्षेत्रातील सुमारे ७५ टक्के कार्बन उत्सर्जन वीज उत्पादनातून होते, म्हणूनच आता सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जा स्त्रोतांना विशेष महत्त्व दिले जात आहे. आता भारतात 'ग्रीन हायड्रोजन मिशन', 'स्मार्ट ग्रीड', 'बॅटरी स्टोरेज' आणि 'इलेक्ट्रिक मोबिलिटी'सारखी पावलेदेखील वेगाने पडत आहेत. त्यामुळे अक्षय ऊर्जा व्यावहारिक आणि शाश्वत होईल. ग्रीन हायड्रोजन मिशनअंतर्गत २०३० पर्यंत पाच दशलक्ष टन उत्पादन करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, जेणेकरून भारत केवळ त्याच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करणार नाही, तर निर्यात करणारा देश बनेल. खऱ्या अर्थाने पाहता, आज भारतात विविध स्वरूपातील ऊर्जेच्या गरजांसाठी अक्षय ऊर्जा हा मुख्य पर्याय आहे, जो पर्यावरणपूरक तसेच शाश्वत आहे. भारत हळूहळू या दिशेने वाटचाल करत आहे. आज आपण आर्थिक संकट आणि प्रचंड पर्यावरणीय विनाशाच्या किंमतीवर थर्मल, हायड्रो आणि अणुऊर्जा यासारख्या पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांवर अवलंबून राहत आहोत. त्याऐवजी तुलनेने अतिशय स्वस्त आणि कार्बनमुक्त पर्यावरणपूरक ऊर्जास्त्रोतांच्या विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करण्याची वेळ आली आहे.


ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपूरी तर्फे
मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
ग्राम पंचायत कार्यालय
सरपंच
उपसरपंच
ग्रा.पं.अधिकारी
शुभेच्छूक :-
•सौ. सिंधुताई विलास हंबर्डे सरपंच
•सौ. अर्चना विश्वनाथ हंबर्डे उपसरपंच
•संजय कानोडे ग्रामपंचायत अधिकारी
सर्व सन्माननीय सदस्य,
कर्मचारीवृंद, विष्णुपूरी ग्रा.पं.का.ता.जि.नांदेड


नांदेड वाघाळा म.न.पा कर्मचारी पतसंस्था मर्यादीत नांदेडच्या वतीने
मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
श्री. गणेश नागरगोजे
(अध्यक्ष)
सौ. आशाताई घुले
(उपाध्यक्ष)
श्री. विशाल सोनकांबळे
(सचिव)
: शुभेच्छूक :
संचालक : साहेबराव जोंधळे, श्याम कानोटे, रणजीत जाधव, ओमकार स्वामी, निर्मला पत्तेवार,
जमील अहेमद मोवजीर, सतपाल सिंघ कोल्हापुरे, सुमेध बनसोडे, स.जकेर अली महमुद अली , दिलीप वंदने
कर्मचारी वर्ग : आनंद सरोदे, सुनीता गोरे ,कविता खुपसे ,संदिप वाघमारे


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा
साहेबराव सेलुकर
उपसरपंच,
ग्रा. प गोपाळचावडी
- शुभेच्छूक -
रमेश तालिमकर
सामाजिक कार्यकर्ते तथा
ग्रा.प.,गोपाळचावडी, सदस्य प्रतिनिधी


मराठवाड्यातील पहिले
अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
श्रध्दाताई विजयकुमार खटके
महिला पोलीस पाटील,
गोपाळ चावडी ता. जि. नांदेड


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक -
मनोहर पाटील शिंदे
माजी जिल्हा परिषद,
सदस्य वाजेगाव सर्कल, नांदेड


मराठवाड्यातील पहिले
अक्षेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
चॅनेल पार्टनर,
विमल महा - ई- सेवा केंद्र
विजय एस. जोंधळे
DTDC
SBI
www.dtdc.com | nanded_cidco.pnq@fr.dtdc.com
मेन रोड, संभाजी चौक, सिडको नवीन नांदेड - 431603



ज्योतीबा फुले सेवा ट्रस्ट नांदेड संचलित,
निवासी विद्यालय वसरणी नांदेड यांच्या वतीने
मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
मुख्याध्यापक- बाबाराव इबितवार
विशेष शिक्षक- संजय पाटील रामराव जोजार, वसुधा निकम ,
संगीत शिक्षक- पंकज शिरभाते ,
कलाशिक्षक- सुरेश कोळंबे, भास्कर आनेराये, बलभीम केंद्रे ,मनोज कलवले,
नामदेव इंगळे,नागनाथ कुचेवार, अक्षय तोटेवार.


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा
:: शुभेच्छुक ::
गुंडेगावकर मल्टीसर्व्हिस,
सिडको, नविन नांदेड
श्रीकांत लक्ष्मणराव पाटील घोगरे
जय विजय कॉम्प्लेक्स, शिवमंदिर रोड,
सिडको, नविन नांदेड
मो. 8830533693,
9673457475


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर
स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
-शुभेच्छुक -
साईनाथ लोंढे पाटील
साई झेरॉक्स अँण्ड मल्टीसर्व्हिसेस
मेन रोड सिडको नवीन नांदेड मो. 9503437400


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर
स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
श्री.शिवाजी जाधव
अध्यक्ष जनता शिक्षण
प्रसारक मंडळ, उमरदरी तथा
अध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मुखेड
- शुभेच्छुक -
श्रीमती एकुंडवार व्ही.ए.
(मुख्याध्यापिका)
श्रीमती संगेवार एस. आर, पोहरे व्ही. एन, वाडीकर पी. के,
श्रीमती झाडे एल. बी, क्षीरसागर जी. बी, चौलवाड एम. बी,
कोनापुरे डी. व्ही. ,बस्वदे जी. टी, श्रीमती वाघमारे एम. व्ही,
वडजे. जी. बी., यादव के. व्ही, सिंगनवाड व्ही. व्ही.
नरसिंह विद्यामंदीर प्राथमिक शाळा, सिडको, नवीन नांदेड


मराठवाड्यातील पहिले
अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
पुन्हा एक नविन वर्ष,
पुन्हा एक नवी आशा,
तुमच्या कर्तृत्वाला पुन्हा,
एक नवी दिशा,
नवी स्वप्ने, नवी क्षितीजे,
सोबत नव्या शुभेच्छा !
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
खंडेराव बकाल
राज्यपाल पुरस्कार प्राप्त
पोलीस पाटील
असर्जन, ता.जि.नांदेड


मराठवाड्यातील पहिले
अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
-: शुभेच्छुक :-
डॉ.नरेश रायेवार
डॉ.सौ.नीता नरेश रायेवार
साई नर्सिंग होम,
सिडको


मराठवाड्यातील पहिले
अक्षेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
बाळासाहेब नागोराव मोरे
• माजी स्वीय सहाय्यक,
• पालक मंत्री नांदेड,
• माजी जिल्हाध्यक्ष,
महाराष्ट्र एसटी इंटक कॉंग्रेस.


ग्रामपंचायत कार्यालय बाभुळगाव
ता.जि.नांदेडच्या वतीने
मराठवाड्यातील पहिले
अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापन
दिनानिमित्त व
नवीन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:
पुंडलिक बळीराम मस्के संरपच
सुंदरबाई राजु मस्के उपसरपंच
रमेश पाटील कदम ग्रामविकास अधिकारी
सदस्य : सौ. पार्वती माधवराव बोडके,
सौ.रेखा आनंदा गिरी, काळेश्वर मस्के,
संजय निवृत्ती लांडगे, बाळु प्रकाश जाधव,
सौ. मल्लुकाबाई किशन पवार,
झालाबाई किशन आडे,
कर्मचारी : मुर्तीजी नागोराव मोरे,
माधव बाबाराव जाधव


मराठवाड्यातील पहिले अग्रेसर स्थानिक दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापनदिनानिमित्त
व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक -
गंगाप्रसाद धोंडिबाराव काकडे
माजी जिल्हा परिषद,
सदस्य बळीरामपूर सर्कल, नांदेड



# साहित्य मैफल

**निवडणूक आयोगाला महसूल आणि शिक्षण विभागाकडून मदत घेऊन मतदार नोंदणी, दुरुस्ती, पुनरीक्षण, मतदान आदी कामे करावी लागतात; ही कामे नियोजित वेळेत आणि पध्दतीने होते का, हे पाहिले जात नाही. त्यातच कामाचा ताण सहन न झाल्याने ब्लॉक लेव्हल दर्जाचे कर्मचारी आत्महत्या किंवा हृदयविकारासारख्या आपत्तीला सामोरे जातात. लोकशाहीत पारदर्शकता आणण्याचे काम करणाऱ्यांनाच अपारदर्शकतेचे बळी व्हावे लागते.**

# ‘एसआयआर’ची दहशत

वेध

**शिवाजी कराळे**

एलओ’ (बूथ लेव्हल ऑफिसर) चे मृत्यू आणि आत्महत्यांनी आगीत तेल ओतले आहे. विरोधी पक्षांनी या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून निवडणूक आयोग तसेच केंद्रातील सत्ताधारी भाजपला लक्ष्य केले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांनी या मुद्द्यावर निवडणूक आयोगावर टीका केली आहे. अशक्य मतदार पडताळणी लक्ष्ये पूर्ण करण्यासाठी आयोगाने ‘बीएलओं’वर जास्त दबाव आणल्याचा त्यांचा आरोप आहे. राजकीय पक्षांच्या दबावामुळे ‘बीएलओं’वर दररोज किमान मतदार पडताळणी पूर्ण करण्याचा दबाव वाढला आहे. या ‘अमानवी’ कामामुळे ‘एसआयआर’ प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली. अर्थात ‘एसआयआर’ प्रक्रिया थांबवणे हा त्यावरचा उपाय नाही. जादा पैसे, जादा मानधनासाठी कुणी निवडणूक आयोगाचे काम करत असल्यास त्यांनी हा भ्रम प्रथम दूर केला पाहिजे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये आतापर्यंत २५ ‘बीएलओं’चा बळी गेला आहे. दोन राज्ये भाजपशासित आणि एक राज्य तृणमूल काँग्रेसचे असले, तरी ‘बीएलओं’मध्ये सारखाच रोष आहे. निवडणूक आयोग सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या हातचे बाहुले बनला आहे. निवडणूक आयोगावरची टीका भाजपला का झोंबते, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. ‘बीएलओ’चे मृत्यू अधिक चिंताजनक आहेत. कारण पुढील वर्षी देशभर जनगणना सुरू होणार असून या महत्त्वाच्या कामाचा भार पुन्हा एकदा शिक्षकांवर पडणार आहे. वस्तुत: ‘बीएलओ’ घरोघरी जाऊन कागदपत्रे गोळा करत आहेत आणि मतदार यादी अद्ययावत आहे का, याची खात्री करत आहेत. त्यांना लोकशाहीचे खरे सैनिक म्हणता येईल.

ममता बॅनर्जी यांच्या सरकारने बंगालमध्ये ‘एसआयआर’दरम्यान मोठे प्रशासकीय फेरबदल केले आहेत. दहा जिल्ह्यांचे पोलिस अधीक्षक बदलले आहेत. अनेकांनी अनेक निवडणुका पाहिल्या आहेत आणि कोणत्याही प्रश्नाशिवाय सरकारी आदेशांचे पालन केले आहे; परंतु या वेळी जमिनीवरील गैरव्यवस्थापन इतके आहे, की ही मंडळीही त्रस्त आहेत. एकीकडे, ‘एसआयआर’ प्रक्रियेला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे, तर दुसरीकडे, अधिकारी त्यांच्यावर ‘एसआयआर’ प्रक्रिया वेळेवर पूर्ण करण्यासाठी दबाव आणत आहेत. निर्धारित लक्ष्य पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास ‘बीएलओं’वर फिर्याद दाखल करण्याची धमकी देण्यात येते. उत्तर प्रदेशमधील एक प्रकरण तर फारच गंभीर आहे. एका ‘बीएलओ’चे लग्न होते. त्याने लग्नाच्या अगोदरच्या दिवसापर्यंत काम करून लग्नासाठी सुट्टी मागितली, तर वरिष्ठ अधिकाऱ्याने त्याला निलंबित केले. लग्न एक दिवसावर आले असताना निलंबित केल्याने ‘बीएलओ’ने आत्महत्या केली. एखादी व्यक्ती आवश्यक कागदपत्रे गोळा करू शकत नसली, तरी ‘बीएलओ’ला दोष दिला जातो. कोणी आपल्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत समाविष्ट करू इच्छित नसले, तरी ‘बीएलओ’ला प्रश्न विचारले जातात. या दुर्दैवी कथा कोणत्याही एका राज्यापुरत्या मर्यादित नाहीत. राज्ये बदलत आहेत; पण या ‘बीएलओं’ना भेडसावणाऱ्या समस्या सारख्याच आहेत.

मध्य प्रदेशमध्ये दोन ‘बीएलओ’ हृदयविकाराने मरण पावले. पश्चिम बंगालमध्ये एका महिला ‘बीएलओ’ने आत्महत्या केली. पश्चिम बंगालमधील नादिया येथेही एका ‘बीएलओ’चा मृतदेह घराच्या छताला लटकलेल्या अवस्थेत आढळला. जयपूरमध्ये एका ‘बीएलओ’ने ट्रेनसमोर उडी मारून आपला जीव गमावला. गुजरातमध्येही चार बीएलओंचे निधन झाले आहे. या मृत्यूंबद्दल सरकारकडे कोणतेही स्पष्टीकरण नाही. त्यांचा मृत्यू दीर्घकालीन आजारामुळे झाला, असे म्हणणे सोपे आहे; परंतु या ‘बीएलओं’ची कुटुंबे ‘एसआयआर’च्या तणावाने आणि अधिकाऱ्यांच्या धमक्यांमुळे ग्रस्त होते, असे कुटुंबीय सांगतात. या वादाबद्दल एक महिला ‘बीएलओ’ सांगते, मी वैयक्तिकरित्या ‘एसआयआर’ प्रक्रियेत सहभागी झाली आहे आणि अनेक लोकांच्या घरी भेट दिली आहे. मला अनेक अडचणी येत आहेत. मी भेट देत असलेल्या भागामध्ये अनेक लोकांनी फॉर्मही भरलेले नाहीत आणि आपली कोणतीही माहिती शेअर करू इच्छित नाहीत. सरकार हे सर्व का करत आहे हे मला त्यांना समजावून सांगावे लागते. शिवाय आपण हा सर्व डेटा ऑनलाइन ॲपमध्ये प्रविष्ट करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ते काम करत नाही. आता ॲप काम करत नसेल, तर ती आमची चूक नाही; परंतु आमच्या कामापुढे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या कामासाठी एक अंतिम मुदत देण्यात आली असून हे काम कोणत्याही किंमतीत पूर्ण केले पाहिजे, असा अधिकाऱ्यांचा आग्रह आहे.



अधिकाऱ्यांच्या या वृत्तीमुळे नाराज झालेले आणखी एक ‘बीएलओ’ म्हणतात, आम्ही सध्या संकलन प्रक्रियेवर काम करत आहोत, गावोगावी जाऊन डेटा गोळा करत आहोत; पण लोक अजिबात सहकार्य करत नाहीत. या ‘एसआयआर’बद्दल इतका गोंधळ आहे की तो समजणे कठीण आहे; पण तरीही आम्ही आमचे शंभर टक्के योगदान देत आहोत. मतदार यादीत विवाहित महिलांचा समावेश करणे हे एक वेगळे आव्हान ठरत आहे. एका घरातून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या महिलांचा डेटा समाविष्ट करण्याकामी एक समस्या आहे. ‘एसआयआर’ प्रक्रियेदरम्यान लग्न करून दुसऱ्या नगर पंचायतीत स्थलांतरित झालेल्या महिलांचे कॉलम भरले जात नाहीत. काही प्रमाणात शिक्षित महिला ऑनलाइन नोंदणी करतात; परंतु सर्वांना हे माहीत नसते. ‘एसआयआर’बद्दल जागरूकतेच्या अभावामुळे ‘बीएलओ’ चिंतित आहेत; परंतु मतदार मदतीसाठी पुढे येत नाहीत याची त्यांना अधिक चिंता आहे. हिंदू मतदार ‘एसआयआर’ प्रक्रियेचे पालन करत नाहीत. त्यांना त्यांच्या मतदानाची जाणीव नाही. दुसरीकडे, मुस्लिम मतदार पुढे येत आहेत आणि स्वतःसाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी फॉर्म भरत आहेत, हा ‘बीएलओं’ चा अनुभव विचारात घेण्यासारखा आहे. येथील समस्या मतदार पातळीवर आहेत; परंतु तरीही ‘बीएलओं’ना प्रश्न विचारले जात आहेत. ‘बीएलओ’ संथ गतीने काम करतात, असा आक्षेप घेऊन उपजिल्हाधिकारी दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देतात. केवळ अंतिम मुदत दिली जात नाही, तर अपशब्ददेखील वापरले जात आहेत, असे बहुतांश ‘बीएलओं’ सांगतात.

एका महिला ‘बीएलओं’ चा अनुभव थोडा वेगळा आहे. कोणत्याही अधिकाऱ्याने तिच्याशी गैरवर्तन केलेले नाही आणि तिला कोणत्याही धमक्या मिळालेल्या नाहीत; परंतु मतदार हलगर्जीपणा करत आहेत. ते ‘एसआयआर’ प्रक्रियेचे महत्त्व समजून घेत नाहीत. या महिला बीएलओला मतदारांच्या घरी वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. काम पुढे ढकलले जात आहे. कमी वेळेत ठराविक फॉर्म भरण्याचा अतिरिक्त दबाव आहे; परंतु एखाद्याच्या जीवापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही, असे त्या सांगतात. या महिला बीएलओने सरकारच्या ॲपवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. सर्व्हर डाऊन आहे आणि ॲप काम करत नाही असा संताप व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीमध्ये फॉर्म कसे भरता येतील, असा तिचा सवाल आहे. बीएलओ ‘एसआयआर’च्या विरोधात नाहीत; आपले कर्तव्य बजावू इच्छितात. त्यांना फक्त प्रशासनाकडून काही पाठिंबा आणि आदर हवा आहे. धमक्या मिळू नयेत, आपल्या वेदना आणि समस्या समजून घ्याव्यात, एवढीच त्यांची अपेक्षा आहे. निवडणूक आयोग हे समजून घेणार का, हा खरा प्रश्न आहे.

■■■

# कालमर्यादा नाही; पण जबाबदारीचे भान हवे



**मध्यंतरी काही राज्यपालांनी लोकनियुक्त सरकारची अडवणूक करत विधेयके रोखून धरली. उच्च न्यायालयांनी दिलेल्या आदेशांचीही अंमलबजावणी केली नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती आणि राज्यपालांना ठराविक कालावधीत निर्णय घेण्याचे आदेश दिले. अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने कालमर्यादा हटवली असली, तरी लोकनियुक्त सरकारांचे अधिकार निश्चित करून राज्यपालांना जबाबदारीची जाणीव करून दिली.**

दखल

**मधुरा कुलकर्णी , विधिज्ञ**

सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने दोन सदस्यीय घटनापीठाचा निर्णय रद्द करत स्पष्ट केले, की कायदेमंडळाने मंजूर केलेल्या प्रस्तावांवर राज्यपाल किंवा राष्ट्रपतींना वेळेत निर्णय घेण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. तामिळनाडू सरकारने दाखल केलेल्या याचिकेवरील अलीकडील निर्णयावर राष्ट्रपतींच्या कार्यालयाने १४ मुद्यांवर स्पष्टीकरण मागितले होते. न्यायालय राष्ट्रपती आणि राज्यपालांना ठराविक दिवसांमध्ये विधेयकावर निर्णय घ्यावा, असे सांगू शकत नाही. न्यायालयाचा तो अधिकार मर्यादाभंग आहे; परंतु हा मर्यादाभंग करण्यास सर्वोच्च न्यायालयाला कुणी भाग पाडले, हे ही विचारात घेतले पाहिजे. राज्यांच्या विधिमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यांवर राज्यपाल वर्षानुवर्षे सहीच करत नसतील, राज्यांची अडवणूक करत असतील, तर त्यावर दाद मागण्यासाठी सर्वोच्च न्यायालय हा एकच पर्याय असतो. राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी विधेयकावर किती दिवसांमध्ये निर्णय द्यावा, याचा स्पष्ट उल्लेख घटनेमध्ये नाही. त्याचा गैरफायदा राज्यपाल घेत होते. आता राष्ट्रपतींच्या पत्रानंतर सर्वोच्च न्यायालयाने एक घटनापीठ स्थापन करून निर्णय सुनावला. राज्यांनी मंजूर केलेल्या विधेयकावर राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी किती दिवसांमध्ये निर्णय घ्यावा, याबाबतचा पूर्वीचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला असला, तरी सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांना दिलेला राज्यांची अडवणूक न करण्याचा सल्ला तितकाच महत्त्वाचा आहे. लोकनियुक्त सरकार राज्यपालांपेक्षा महत्त्वाचे आहे. त्याला राज्यपालांपेक्षा जास्त अधिकार आहेत. अशा सरकारने घेतलेले निर्णय राज्यपालांना रोखता येणार नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच बजावले आणि चर्चा सुरु झाली.

सर्व संबंधित बाबींचा विचार केल्यानंतर मावळते सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील पाचसदस्यीय घटनापीठाने निर्णय दिला, की पूर्वीचा निर्णय न्यायपालिकेच्या अधिकारक्षेत्राबाहेरचा असून न्यायपालिका सर्वोच्च घटनापीठ असलेल्या व्यक्तीचे मर्यादित विवेकाधीन अधिकार कमी करू शकत नाही. तथापि, घटनापीठाने दोन सदस्यीय घटनापीठाच्या निर्णयातील एका मुद्द्याशी सहमती दर्शवली आणि घटनापीठदेखील विधेयक अनिश्चित काळासाठी थांबवू शकत नाही आणि असे झाल्यास संबंधित पक्षांना न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे, असे म्हटले. आता पुढे जाण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांसाठी अधिक जबाबदारीची आवश्यकता आहे. राज्य सरकारे घटनापीठांकडून केवळ रबर स्टॅम्प म्हणून काम करण्याची अपेक्षा करू शकत नाहीत. संविधानानुसार राष्ट्रपती आणि राज्यपालांची भूमिका ‘विवेकबुद्धी आणि संतुलन’वर आधारित आहे. हा निर्णय अधिकारांच्या पृथक्करणाच्या तत्त्वाला बळकटी देतो. लोकशाही केवळ निवडणुकांवर नाही, तर संस्थांमधील सुसंवाद आणि स्पष्ट सीमांवर आधारित आहे. न्यायपालिका आपल्या मर्यादा ओळखते आणि कार्यकारी मंडळाला तिच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देते, तेव्हा संविधान चैतन्यशील राहते.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय या चैतन्यशीलतेला बळकटी देतो. तो एक अशी संवैधानिक व्यवस्था मजबूत करतो, ज्यात कोणतीही एक संस्था सर्वोच्च नसते; परंतु सर्व मिळून सर्वोच्च सुव्यवस्था राखतात. हा निर्णय अशा वेळी आला आहे, जेव्हा अनेक राज्य सरकारे राज्यपालांशी संघर्ष अनुभवत आहेत. राज्यपालांच्या दीर्घकाळ मौन किंवा विधेयकांवर विद्यापीठांच्या नियुक्त्यांवर किंवा प्रशासनाशी संबंधित निर्णयांवर विलंब झाल्यामुळे अनेकदा राजकीय आणि प्रशासकीय वाद उद्‌भवले आहेत. घटनापीठाने कालमर्यादा लादून संवैधानिक प्रमुखांच्या स्वातंत्र्याचे समर्थन केले; परंतु ‘अनिश्चित’ हा शब्द वाढवू नये. या निरीक्षणामुळे लोकशाही प्रक्रिया गतिरोधित होण्यापासून रोखण्याचा प्रयत्न होतो. हे संतुलन नाजूक आहे; परंतु आवश्यक आहे.

आदेशाद्वारे शासित सरकारे नियंत्रण आणि संतुलनाशिवाय काम करत असली, तरी सत्तेच्या केंद्रीकरणाचा धोका नेहमीच निर्माण होतो. हे सर्व असूनही मूलभूत प्रश्न अनुत्तरीत आहे. एखाद्या राज्याचे संवैधानिक प्रमुख सर्वोच्च न्यायालयाच्या ‘अनिश्चित’ सल्ल्याचे पालन करत नसतील, तर त्याच्याकडे कोणता मार्ग असेल? सर्वोच्च न्यायालयाच्या पाचसदस्यीय संवैधानिक खंडपीठाने स्वतःच्या दोनसदस्यीय खंडपीठाचा निर्णय रद्द करत स्पष्ट केले, की राज्यपाल किंवा राष्ट्रपतींना कायदेमंडळाने मंजूर केलेल्या ठरावांवर वेळेवर निर्णय घेण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. हा संवैधानिक प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारच्या याचिकेवरील अलिकडच्या निर्णयातून समोर आला, ज्यात राज्यपाल आणि राष्ट्रपतींना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी वेळ मर्यादा निश्चित करण्यात आली होती.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या विषयावर सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागितला होता. पूर्वीचा निर्णय न्यायव्यवस्थेच्या अधिकारक्षेत्राबाहेर आहे आणि न्यायव्यवस्था सर्वोच्च संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीचे मर्यादित विवेकाधीन अधिकार कमी करू शकत नाही. राज्य विधिमंडळांनी मंजूर केलेल्या विधेयकांना मान्यता देण्याबाबत राज्यपाल आणि राष्ट्रपतींचे संवैधानिक अधिकार सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, की राज्यपालांच्या मान्यतेशिवाय कोणतेही विधेयक कायदा बनू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांनी राष्ट्रपतींच्या प्रश्नावर एकमताने मत मांडताना घोषित केले, की राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्याचा अधिकार आहे आणि ते मंत्रिमंडळाच्या सल्ल्याला बांधील नाहीत. तथापि, न्यायालयाने म्हटले आहे, की राज्यपाल विधेयकांना जास्त काळ विलंब करू शकत नाहीत. न्यायालयाने राज्यपालांच्या निष्क्रियतेचा मर्यादित न्यायालयीन आढावा घेत वाजवी वेळेत पर्याय वापरण्याचे आवाहन केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा देशभरातील राज्यांवर व्यापक परिणाम होईल, कारण तो गेल्या एप्रिलपासून दोन न्यायाधीशांनी घेतलेले निर्णय रद्द करतो. त्या निर्णयामुळे राज्यपाल आणि राष्ट्रपतींना राज्य विधेयकावर निर्णय घेण्यासाठी अंतिम मुदत निश्चित झाली.




तमिळनाडूच्या राज्यपालांनी रोखून धरलेली दहा विधेयके मंजूर झाल्याचे सर्वोच्च न्यायालयाने घोषित केले होते. न्यायालयाच्या आदेशाने विधेयके थेट मंजूर होण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी १४ कायदेशीर प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयाचे मत मागितले होते. न्या. गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती पीएस नरसिंह आणि न्यायमूर्ती एएस चांदुरकर यांच्या खंडपीठाने १४ पैकी १३ प्रश्नांची उत्तरे दिली आणि एक प्रश्न अनुत्तरीत परत केला. तो अनावश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. प्रत्येक विधेयकावर राष्ट्रपतींचे मत मागण्याची गरज नाही. हा प्रश्न राज्य आणि केंद्र सरकारमधील वाद सोडवण्यासाठी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित होता. राष्ट्रपतींनी विचारले, की संविधान राज्यपाल आणि राष्ट्रपतींना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी वेळमर्यादा निर्दिष्ट करत नसताना सर्वोच्च न्यायालय अंतिम मुदत ठरवू शकते का? या संदर्भात विचारण्यात आलेले प्रश्न कलम २०० आणि २०१ अंतर्गत राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्याच्या राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या अधिकारांशी संबंधित होते. सर्वोच्च न्यायालयाने यावर उत्तर दिले. त्यांच्या मते, पाच न्यायाधीशांनी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना राज्य विधेयके मंजूर करण्यासाठी आणि वैध संमती देण्यासाठी वेळमर्यादा निश्चित करण्याबाबतचा दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा निर्णय फेटाळून लावला.

सर्वोच्च न्यायालयाने विधेयकांच्या मंजुरीबाबत कलम २०० च्या अधिकारांबाबत राज्यपालांची भूमिका स्पष्ट करताना नमूद केले, की राज्यपालांकडे तीन पर्याय आहेत. ते एक तर विधेयक मंजूर करू शकतात, राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठवू शकतात किंवा आपल्या टिप्पण्यांसह विधिमंडळाकडे परत करू शकतात. राज्यपालांना या तीन पर्यायांपैकी कोणताही पर्याय निवडण्याचा अधिकार आहे. ते मंत्रिमंडळाच्या सल्ल्याला बांधील नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, की कलम २०० अंतर्गत राज्यपालांनी घेतलेल्या निर्णयाच्या गुणवत्तेचा आढावा न्यायालय घेऊ शकत नाही. तथापि, दीर्घकाळ, अनिश्चित आणि अस्पष्ट निष्क्रियतेच्या स्पष्ट परिस्थितीत, न्यायालय मर्यादित निर्देश देऊ शकते. त्यात राज्यपालांना कलम २०० अंतर्गत त्यांची कर्तव्ये वाजवी वेळेत पार पाडण्यास सांगता येते. संविधान कालमर्यादा निश्चित करत नाही, तेव्हा न्यायालय करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले, की राष्ट्रपती कलम २०१ अंतर्गत आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेच्या मर्यादेने बांधील नाहीत. राष्ट्रपतींना प्रत्येक विधेयकावर सर्वोच्च न्यायालयाचे मत घेण्याची आवश्यकता नाही. न्यायालयाने असेही म्हटले, की न्यायालय विधेयक कायदा होण्यापूर्वी त्यातील मजकुरावर न्यायालयीन निर्णय घेऊ शकत नाही.

■■■


दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
आमचे प्रेरणास्थान
नुतन वर्षाच्या सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...!
HAPPY NEW YEAR 2026
शुभेच्छुक :
मोगलाजी ईरन्ना शिरशेटवार
मा.नगराध्यक्ष - नगर परिषद देगलूर
शहराध्यक्ष - काँग्रेस कमिटी देगलूर


नुतन
वर्षाच्या सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...!
Happy New Year 2026
दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शिक्षणमहर्षी
व्यंकटराव पाटील गोजेगावकर
मा. शिक्षणसभापती, जिल्हा परिषद, नांदेड


HAPPY NEW YEAR 2026
दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
: शुभेच्छुक :
व्यंकटेश्वरा दाल इंडस्ट्रीज
खानापूर ता.देगलूर


२१ दिवस, ४२ पैठणी !
२५ डिसेंबर ते १४ जानेवारी
UPTO 50 % OFF
महासेल
भरपूर ऑफर्स!
महासेल
संक्रांत महोत्सव
खेळ पैठणीचा
सन्मान लाडक्या बहिणीचा
* नियम व अटी लागू
अनुप विजया वस्त्रालय ग्रुप
नारायणी THE BOUTIQUE
फॅमिली शॉपिंग मॉल
तळगल्ली, देगलूर
703 822 2444
02463-255195



Happy New Year
2026
सुभाष कलेटवार
शासकीय कंत्राटदार
देगलूर जि.नांदेड मो.9423437446


HAPPY NEW YEAR 2026
Vivek Kapratwar
Shri Krishna Pulses
Mill : Plot No. C-3, MIDC,
KHANAPUR, Tq. Degloor -431717
Dist. Nanded (M.S.)


इंडियनऑयल IndianOil
मे. बिरादार गॅस सर्व्हिस
दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
2026 Happy New Year
: मुख्य वितरक :
इंडेन गॅस एजन्सी,देगलूर


दैनिक
गोदातीर
समाचार
2026 Happy New Year
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
बालाजी रोयलावार
नगरसेवक तथा मा.उपनगराध्यक्ष
देगलूर नगर परिषद, देगलूर
सौ. जयश्री बालाजीराव रोयलावार
माजी नगराध्यक्षा, देगलूर नगर परिषद, देगलूर


HAPPY NEW YEAR
2026
दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
शुभेच्छा
गिरीष किशनराव चिद्रावार
देगलूर जि.नांदेड


सर्व जनतेस नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!
दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
: शुभेच्छुक :
संजय चिन्नमवार
माजी नगरसेवक
देगलूर नगर परिषद देगलूर


HAPPY NEW YEAR 2026
दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
हॉटेल अलंकार
बार अँण्ड रेस्टॉरंट व परमीट रूम
मच्छी मार्केट,देगलूर जि.नांदेड


HAPPY NEW YEAR 2026
लक्ष्मी स्टील सेंटर
भांडी मार्केट, देगलूर जि.नांदेड
तांबा, पितळ, स्टेनलेस, स्टील व जर्मनची भांडी योग्य दरात मिळण्याचे ठिकाण
प्रो.प्रा.योगेश नंदकिशोर शाखावार
९७६३५४५००६
निलेश नंदकिशोर शाखावार
९९२१६२१०११


HAPPY NEW YEAR 2026
दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
मारोतीराव व्यं. मोटरगेकर पाटील
मोटरगेकर प्रॉपर्टी कन्सल्टन्ट Mob.9421489111


दैनिक
गोदातीर
समाचार
वर्धापन दिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा...!
Happy New 2026
गेल्या ४१ वर्षा पासून उत्कृष्ट व सुंदर छपाई चे तालुक्यातील एकमेव ठिकाण
उत्कृष्ट दर्जा व अर्जंट सुविधा हिच आमचे वैशिष्ट्ये
प्रभात
डिजिटल अँन्ड बॅनर प्रिंटर्स
डिजिटल बॅनर प्रिंटींग उपलब्ध
शाखा क्र. १
गांधी चौक, देगलूर जि.नांदेड
9175666689, 9975415580
फक्त १ तासात मिळेल...
शाखा क्र. २
शासकीय गोदाम च्या बाजूला, आझाद कॉलोनी, देगलूर
8421434333, 7058466339

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

वर्धापन दिन-२०२६

हार्दिक शुभेच्छा !



: शुभेच्छुक :

**जी. नागय्या**

माजी नगरसेवक, मनपा, नांदेड

अध्यक्ष, आंध्र शिक्षण समिती, नांदेड

**Hotel G.N. Executive**

Airport road, Nanded.

Ph: 02462-224650

---

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

वर्धापन दिन-२०२६

हार्दिक शुभेच्छा

**जिनियस पब्लिक स्कूल**

वसंत नगर नवीन मोंढा नांदेड



**प्रा. संजय पाटील बेटमोगरेकर**

संचालक : जिनियस पब्लिक स्कूल नांदेड

समन्वयीका : शरणजीत कौर,

प्राचार्या : सौ. रागिणी बन्नोरे,

उप प्राचार्य : हाश्मी एच.

सर्व शिक्षक व शिक्षकतेर कर्मचारी

---

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

**संभाजीराव धुळगंडे**

(माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद, नांदेड)

ॲड. शिवाजीराव हाके, प्रा. डॉ.मुरारी कुंभारगावे, इंजिनीयर बालाजीराव काळे, रथयात्रा चालक संभाजी धुळगंडे निळकंठ उराडे, कोषाध्यक्ष परशुराम वडजे, पांडुरंग धुळगंडे पिराजी धुळगंडे, एकनाथराव ऊराडे, बालाजीराव वडजे गुरुजी कलंबर

**माळेगाव-चोंडी रथयात्रा समिती**

---

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

वर्धापन दिन-२०२६

हार्दिक शुभेच्छा!



: शुभेच्छुक :

**शेषराव चव्हाण**

माजी सरचिटणीस, महाराष्ट्र काँग्रेस कमिटी

प्रदेशाध्यक्ष, अखिल भारतीय बंजारा सेवा संघ, मुंबई



**स्वप्नील चव्हाण**

मा. सभापती, समाज कल्याण जि.प. नांदेड



**सौ.वैशालीताई चव्हाण**

माजी जि.प. अध्यक्षा



**सुशांत चव्हाण**

संचालक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

---

मराठवाड्यातील सर्वात जुने व सर्वंकश बातम्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त वाचकांना

वर्धापन दिन-२०२६

हार्दिक शुभेच्छा!



: शुभेच्छुक :

**डॉ. अंकुश देवसरकर**

भगवती हॉस्पीटल, शिवाजीनगर, नांदेड

---

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दै. गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



**दिलीप पाटील गणेशपुरकर**


(सचिव, राजर्षी पब्लिक स्कूल, लातूर रोड, नांदेड)

---

वर्धापन दिन-२०२६

मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक गोदातीर समाचारच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



**विमुक्त जाती सेवा समिती, वसंतनगर ता.मुखेड जि.नांदेड**

: शुभेच्छुक :

**श्रीमती चक्रावतीबाई गोविंदराव राठोड**

अध्यक्षा, (विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर)



**आ.डॉ. तुषार राठोड**

मुखेड विधानसभा मतदार संघ



**गंगाधर गोविंदराव राठोड**

सचिव, विमुक्त जाती सेवा समिती


मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना १९६२ संपादक- केशव घोणसे पाटील
वर्धापन दिनानिमित्त
•हा•र्दि•क• •शु•भे•च्छा•
शुभेच्छुक : संजय देशमुख लहानकर
(सभापती,कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड)


मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना १९६२ संपादक- केशव घोणसे पाटील
वर्धापन दिन व नववर्षाच्या
आपणास सर्वांना मनापासून
हार्दिक शुभेच्छा..!
: शुभेच्छुक :
पुंडलिक उर्फ छत्रपती मारोतराव कानोडे
माजी नगराध्यक्ष तथा
नगरसेवक नगरपंचायत,अर्धापूर
गुरूराज लक्ष्मणराव रणखांब
श्री बसवेश्वर ट्रेडर्स अॅन्ड सॅनेटरी,
माऊली निवास तामसा रोड,अर्धापूर


२०२६ नववर्ष शुभेच्छा!
सर्वांना नवीन वर्षाच्या
हा र्दि क शु भे च्छा
मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना १९६२ संपादक- केशव घोणसे पाटील
वर्धापन दिनानिमित्त
•हा•र्दि•क• •शु•भे•च्छा•
●शुभेच्छुक : अरविंद पाटील बेलसरकर


२०२६ नववर्ष शुभेच्छा!
सर्वांना नवीन वर्षाच्या
हा र्दि क शु भे च्छा
मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना १९६२ संपादक- केशव घोणसे पाटील
वर्धापन दिनानिमित्त
•हा•र्दि•क• •शु•भे•च्छा•
● शुभेच्छुक : श्री प्रविण सखारामजी देशमुख
(नगराध्यक्ष प्र.नगरपंचायत अर्धापूर)


दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
नूतन वर्ष २०२६
आपणांस नूतन वर्षाच्या
शुभेच्छा
शुभेच्छुक : ओमकार वटमे


मराठवाड्यातील सर्वात जुने दैनिक
गोदातीर समाचार
स्थापना १९६२ संपादक- केशव घोणसे पाटील
२०२६ नववर्ष शुभेच्छा!
सर्वांना नवीन वर्षाच्या
हा र्दि क शु भे च्छा
वर्धापन दिनानिमित्त
•हा•र्दि•क• •शु•भे•च्छा•
•शु•भे•च्छु•क•
अभिषेक गुरखेल
•भाजपा युवा नेते, अर्धापूर


दैनिक
गोदातीर समाचार
च्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक
बळीराम राठोड
व
दैनिक लोकमत तालुका प्रतिनिधी
गोंविदराव टेकाळे
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : शुभेच्छुक मित्र मंडळी अर्धापूर